नावीन्यपूर्ण उपक्रम ■ बांबू संशोधन ■ दुर्मीळ वन्यजीव ■ नोंदी

जुलै २०१८/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## ॥ एकच लक्ष्य १३ कोटी वृक्ष ॥

# वृक्षप्रतिज्ञा

भारत माझा देश आहे
वृक्ष माझे बांधव आहेत
त्या कोटी कोटी वृक्षांवर माझे प्रेम आहे
या सृष्टीतील विविध वृक्षांचा मला अभिमान आहे
या वृक्षांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून
सन २०१७ ते सन २०१९ या वर्षात
मी माझ्या अंगणात, मोकळ्या जागेत, शाळेच्या आवारात,
रस्त्यांच्या कडेला, गायरानात, गावठाणात ५० कोटी वृक्षलागवड करीन
आणि त्या प्रत्येक वृक्षाचे संरक्षण करीन
मी व माझे वृक्षप्रेमी बांधव यांच्या सहकार्याने
राज्यामध्ये या वर्षी १ ते ३१ जुलै या कालावधीत
१३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रम यशस्वी करण्याची प्रतिज्ञा करीत आहे
वृक्षांचे संगोपन व संवर्धन यातच माझे हित सामावले आहे.

वन विभाग, महाराष्ट्र शासन

# अंतरंग


| | |
|---|---|
| संकल्प महावृक्षलागवडीचा | ६ |
| एक तरी झाड लावू या... | १० |
| हवा सर्वांचा सहभाग | ११ |
| झाडे अशी लावा.. | १२ |
| मिशन १३ कोटी | १४ |
| लक्ष्यपूर्तीची दिशा | १६ |
| नावीन्यपूर्ण आणि प्रेरणादायी | १८ |
| नवे उपक्रम, नवी दिशा | २०-२६ |
| लावा शेतबांध, शेतजमिनीवर वृक्ष | २७ |
| वेगळी 'हरित'क्रांती | २८ |
| पथदर्शी महाराष्ट्र | ३१ |
| कांदळवनाचे वरदान | ३२ |
| फोन करा, मदत मिळवा... | ३४ |
| वृक्षारोपणाला डिजिटल आधार | ३६ |
| बांबू : जीवनदायी कल्पतरू | ३८ |
| बहुगुणी बहुपर्यायी | ४० |
| गाव तिथे वनराई | ४२ |
| शिवरायांचे आज्ञापत्र | ४३ |
| वन विकास : व्याघ्र संवर्धन | ४४ |
| माहेरची झाडी, मायेची गोडी | ४६ |
| समृद्ध वने आणि वन्यजीव | ४७ |
| वन भ्रमंती | ५२ |
| नोंदी | ५५-५७ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |


**संकल्प महावृक्षलागवडीचा** ६

महाराष्ट्रात १ ते ३१ जुलै, २०१८ या कालावधीत महावृक्षलागवड अभियानांतर्गत १३ कोटी झाडे लावली जातील. मागील दोन वर्षी या अभियानांतर्गत उद्दिष्टांपेक्षा अधिक झाडे लावण्यात आली. यंदासुद्धा उद्दिष्टापेक्षा अधिक झाडे लावली जातील, असा विश्वास **वनमंत्री सुधीर मुनगंटीवार** यांना व्यक्त केला असून, राज्यातील जनतेने हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.





**झाडे अशी लावा..** १२

रोपे लावताना मातीचा पोत, तिथे पडणारा पाऊस आणि तिथले वातावरण यांचा विचार करून ती लावली तर रोपे जगण्याचे प्रमाण निश्चित वाढते. कोणता वृक्ष कोणत्या कारणासाठी उपयुक्त ठरू शकतो, याचादेखील अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**मिशन १३ कोटी** १४

१३ कोटी वृक्षलागवडीची मोहीम यशस्वी करण्याचा निर्धार शासनाने केला आहे. त्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. समाजातील सर्व घटकांनासुद्धा या मोहिमेत सहभागी करून घेतले जाणार आहे.





**वेगळी 'हरित'क्रांती** २८

जल, अन्न आणि पर्यावरण यांची सुरक्षितता ही वनांवर अवलंबून असते. उत्तम वन, वन्यजीव, जैवविविधता, निसर्ग आणि पर्यावरण यांच्या वाढीसाठी आणि त्यातून मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी वन विभाग हा प्राधान्यक्रमावरील विभाग असला पाहिजे, या संकल्पनेतून वन मंत्रिमहोदयांच्या नेतृत्वाखाली वनविभागाने वाटचाल सुरू ठेवली आहे.

**बांबू : जीवनदायी कल्पतरू** ३८

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना २०१४ रोजी करण्यात आली. परंपरागत सुपे, टोपल्या, ताटवे तयार करणाऱ्या बुरूड समाजातील लोकांना एक आशेचा किरण या माध्यमातून दिसला.





**वन भ्रमंती** ५२

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळामार्फत वन्यजीव क्षेत्र, निसर्गसंपन्न वनक्षेत्र, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, जैवविविधता उद्याने, निसर्ग पर्यटन केंद्र इत्यादी ३२० निसर्ग पर्यटन स्थळांची यादी तयार करण्यात आली आहे.

वर्ष ७० वे | अंक १ | जुलै २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, धनश्री पाठारे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# एकच लक्ष्य १३ कोटी नवीन वृक्ष

विविध क्षेत्रांतील विकासासोबतच पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी शासन विशेषत्वाने प्रयत्नशील आहे. सर्वच पातळ्यांवर केलेल्या उपाययोजनांमुळे वनाच्छादित क्षेत्रात वाढ झाली आहे. यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सुरू असलेल्या आमच्या प्रयत्नांच्या यशस्वितेवर शिक्कामोर्तबच झाले आहे. राज्यातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी गरजेनुरूप नियोजन करून, त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यंदा १ ते ३१ जुलै या कालावधीत ठरवण्यात आलेले १३ कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य पूर्ण होईल, याची खात्री आहे. शासनाच्या या प्रयत्नांना विविध व्यक्ती आणि संस्थांकडून मिळत असलेले पाठबळ उत्साह वाढवणारे आहे.

गेल्या अनेक वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्यामुळे प्रदूषणाचे मोठे संकट उभे राहिले. जमिनीची धूप झाल्यामुळे तिची उत्पादकता कमी होत गेली. दुष्काळाचे सावट निर्माण झाले. जलसंवर्धनाअभावी नद्या आटल्या. तसेच त्यांचे नाल्यांमध्ये रूपांतर झाले. जल-जमीन-जंगल या तीन गोष्टींचा प्रचंड विनाश झाला. परिणामी अतिवृष्टी, अवर्षण आणि तापमानवाढ अशा आपत्तींचा सामना करावा लागतो आहे. ही आपत्ती नैसर्गिक म्हटली जाते परंतु खरे तर ती मानवनिर्मित आहे. आपणच ओढवून घेतलेल्या आपत्तीतून आपल्यालाच मार्ग काढावा लागणार आहे. त्यासाठी जल-जमीन-जंगल यांचे संरक्षण आणि संवर्धनाशिवाय पर्याय नाही. म्हणूनच त्या दिशेने व्यापक पातळीवर काम करण्याचा शासनाने निश्चय केला आहे. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने आम्ही ५० कोटी वृक्ष लावून, राज्यातील वृक्षाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत नेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबत केवळ घोषणा नव्हे तर नियोजनपूर्वक अंमलबजावणीही केली.



वृक्षारोपणानंतर झाडाला पाणी घालताना राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोबत सचिव विकास खारगे

गेल्या दोन वर्षांपासून वृक्षारोपणादरम्यानच्या प्रत्येक खड्ड्याचा, लावलेल्या प्रत्येक झाडाचा हिशेब ठेवण्यात आला आहे. उत्स्फूर्त लोकसहभागामुळे पहिल्या वर्षी दोन कोटी वृक्षलागवडीच्या उद्दिष्टापेक्षा अधिक, म्हणजेच अडीच कोटी वृक्षलागवड करण्यात आली. तर दुसऱ्या वर्षी ४ कोटींचे उद्दिष्ट ठेवले असताना ५.४३ कोटी वृक्षलागवड करून, नवा विक्रम स्थापित करण्यात आम्हाला यश आले.

यंदाच्या १३ कोटी वृक्षलागवडीसाठी योग्य नियोजन करण्यात आले आहे. या वर्षीही लावल्या जाणाऱ्या वृक्षांसाठी खड्डा कोठे खणण्यात आला आहे, त्या ठिकाणी कुठला वृक्ष लावला जाणार आहे, इथपासून त्या रोपट्याच्या संपूर्ण संवर्धनापर्यंतच्या बाबींचा हिशोब तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ठेवला जात आहे. रोपवाटिकेच्या माध्यमातून पुरेशा रोपांची निर्मिती केली गेली आहे. त्यांचे रोपण करून २०१९ पर्यंत ५० कोटी वृक्ष लावले जातील आणि ते जगवले जातील, असा मला विश्वास आहे.

**- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

# अमृतापरी लाभदायी



**सुधीर मुनगंटीवार,** वनमंत्री

भगवान श्रीकृष्णाने भगवद्‌गीतेत असे सांगितलेय की, जगात अमर फक्त वृक्षच आहेत. ते कधी मृत्यू पावत नाहीत. कारण त्यांच्या अवतीभवती बी-बिया पडून नवे झाड उगवत राहते. वृक्षांनीच या पृथ्वीचे तेज आणि सत्त्व कायम राखले आहे.

नीतिशतक असं म्हणतंय की,

*वृक्ष फार लवती फळभारे ।*
*ताप साहुनी देती निवारे ।।*
*थोर ना करी विभवाचा ।*
*हा स्वभाव उपकारी जनांचा ।।*

वृक्षांची महती या चार ओळींमध्ये अतिशय प्रभावीपणे सांगण्यात आली आहे. फळे देणारा, विसावा देणारा, सावली देणारा, पृथ्वीवरच्या सर्व प्रकारच्या जीवनाच्या वाढीसाठी हातभार लावणारा, निसर्गाचे रक्षण करणारा, हा वृक्ष सदैव माणसांच्या साहाय्यालाच आला आहे. मात्र आपण कृतघ्नतेने आपले जीवन सुरक्षित करणाऱ्या वृक्षावर कुऱ्हाड चालवली. आपल्या जन्मदात्यावरच वार करण्यासारखे हे आहे. पण आपण हे लक्षात घेतले नाही. त्यामुळे आज आपल्यासमोर अस्तित्वाचे संकट उभे राहिले आहे. दुष्काळापासून ते हवामान बदलापर्यंतच्या अनेकानेक संकटांना आपण आमंत्रण देत आहोत. हे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. आपल्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या संकटाची तीव्रता कमी करणे आणि पुन्हा सारा आसमंत हिरवागार करणे ही काळाची गरज आहे.


या संकटाची तीव्रता कमी करण्यासाठी १ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत महाराष्ट्रात १३ कोटी वृक्षलागवडीची मोहीम राबवली जात आहे. ही मोहीम यशस्वी करणे हे आपल्या सर्वांचे प्रथम कर्तव्य आहे.

वृक्षच आपले खरे सखेसोबती आहेत. आपले जीवन आहे. ही वृक्षलागवड महाराष्ट्रास हरित महाराष्ट्राकडे घेऊन जाणार आहे. सुखी, समृद्ध महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

छत्तीसगडमध्ये वृक्षाच्छादन ४१ टक्के तर ईशान्येकडील राज्यात ८० टक्क्यांपर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि राष्ट्रीय वननीतीनुसार राज्याचे वनाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी, वनक्षेत्राबरोबर वनेतर क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणे गरजेचे आहे. राज्याचे वनाच्छादन जर ३३ टक्क्यांपर्यंत वाढवायचे असेल तर हे काम एकटा वनविभाग करू शकत नाही. त्यासाठी जनआंदोलन उभे करावे लागेल.

लोकांना वातावरणीय बदलाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. त्यांच्या मनात झाडे लावण्याची सुप्त इच्छा आहे. त्यांना वनांचे महत्त्व पटले आहे. त्यामुळे काहीजण वैयक्तिक स्वरूपात तर काहीजण संस्थात्मक स्वरूपात वृक्ष लावून, त्यांच्या संगोपनाचे काम करताना दिसत आहेत. पण एका व्यापक जनआंदोलनासाठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण करण्याची आवश्यकता होती. हे व्यासपीठ महावृक्षलागवडीच्या रूपाने महाराष्ट्रातील जनतेला मिळाले आहे.

वृक्षलागवड हे ईश्वरीय कार्य आहे. वृक्षलागवडीचा कार्यक्रम महाराष्ट्राला संपन्न करणारा, महाराष्ट्राचा दुष्काळ हटवण्यास मदत करणारा कार्यक्रम आहे. यंदाचा १३ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प राज्याच्या हिताचा आहे. त्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लोकांनी अधिकाधिक योगदान दिले पाहिजे.



'महावृक्षलागवड' हे पर्यावरण रक्षणाचे मिशन आहे. या प्रक्रियेत वृक्ष लावणे एवढीच जबाबदारी नसून त्यांचे संवर्धन करणे, जोपासना करणे हेसुद्धा महत्त्वाचे आहे. वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन हे ईश्वरीय कार्य आहे. पुढील पिढीला स्वच्छ, सुदृढ पर्यावरण देणे हे आपले कर्तव्य आहे. ग्रामगीतेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहून ठेवले आहे.-

*वनस्पती आदिंचा सहवास । सूर्य किरणातील सत्वांश ।।*
*शुद्ध हवेतील श्रम सर्वास । अमृतापरी लाभदायी ।।*

याचा अर्थ असा की, वनस्पतींच्या सहवासामुळे मानवास अमृतासारखे आयुष्य जगता येते. सूर्यकिरणातील सत्त्वांशाचे शोषण वनस्पती करते. त्यामुळे शुद्ध हवा निर्माण होऊन मानवास चांगले आरोग्य मिळते.

मानवी जीवनात वृक्षांच्या महत्त्वाचे इतके प्रभावी वर्णन दुसरे सापडणार नाही. खरे अमृत कसे होते हे फक्त देवांनाच ठाऊक. पण तुमच्या माझ्यासाठी अमृताचे कार्य करणाऱ्या वृक्षांना आपण मायेचा हात दिला पाहिजे. १ जुलैला जमेल तितकी झाडे लावली पाहिजेत व इतरांना वृक्षलागवडीसाठी प्रेरित केले पाहिजे.

या विशेषांकात वृक्षलागवड मोहिमेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. ही माहिती आपणास नक्कीच उपयुक्त ठरेल व अंक आवडेल, असा विश्वास व्यक्त करतो.

**सुधीर मुनगंटीवार**
**(अतिथी संपादक)**

**सुधीर मुनगंटीवार,** वित्त व नियोजन, वनमंत्री

'एकच लक्ष्य १३ कोटी वृक्ष' हा आमच्यासाठी इव्हेंट नाही, हे आमच्यासाठी मिशन आहे. जनता, पर्यावरणप्रेमी बंधु-भगिनी आणि अधिकाऱ्यांच्या सहभागातून, विविध विभागांच्या सहकार्यातून १३ कोटी वृक्ष लावण्याचे हे मिशन आहे. दोन वर्षांपूर्वी १ जुलै २०१६ ला एकाच दिवशी दोन कोटी वृक्ष लावण्याचा आपण संकल्प केला. पाहता पाहता जनतेच्या सहभागातून २ कोटी ८२ लाख वृक्ष लावत लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये याची नोंद झाली. मग मागच्या वर्षी संकल्प केला ४ कोटी वृक्ष लावण्याचा. जनता सहभागी झाली, अधिकाऱ्यांनी मनावर घेतले. पर्यावरण क्षेत्रात काम करणारे नामवंत पुढे आले आणि ४ कोटींचे लक्ष्य गाठताना ५ कोटी ४३ लाख वृक्ष राज्यात लागले.

### पारदर्शकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञान

या कामात पारदर्शकता असावी असा आपला नेहमी प्रयत्न राहिला. त्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग केला पाहिजे हे विचारात घेऊन आपण मागच्या दोन वर्षात वृक्षलागवडीसंबंधीची सर्व

# संकल्प महावृक्षलागवडीचा

**महाराष्ट्रात १ ते ३१ जुलै, २०१८ या कालावधीत महावृक्षलागवडीचे अभियान राबवले जाणार आहे. या काळात १३ कोटी झाडे लावली जातील. मागील दोन वर्षी या अभियानांतर्गत उद्दिष्टांपेक्षा अधिक झाडे लावण्यात आली. या विक्रमाची नोंद 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'ने घेतली. यंदासुद्धा उद्दिष्टापेक्षा अधिक झाडे लावली जातील, असा विश्वास वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना व्यक्त केला असून, राज्यातील जनतेने हे अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.**



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना वृक्षलागवडीसंबंधी माहितीपत्रक भेट देताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार.

जिल्ह्यांची सर्व माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर नोंदवली. वृक्ष लावण्याची जागा, त्याचे क्षेत्रफळ, वृक्ष कोणत्या विभागाने लावले, वृक्ष लावण्यासाठी कोणत्या संस्था पुढे आल्या, किती वृक्ष लावले या सगळ्याची अचूक माहिती या संकेतस्थळावर भरण्याचे काम आपण केले.

मिशन संदर्भात जर एखाद्या व्यक्तीच्या मनात शंका निर्माण झाली तर त्या सगळ्या शंका दूर करण्याची व्यवस्था आपल्याला करता आली पाहिजे म्हणून आपण नागपूरला कमांड रूम विकसित केली आहे. महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यांत, ३५८ तालुक्यांत आणि २८,८६५ ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात जेवढ्या जागांवर वृक्ष लागणार आहेत त्याच्या चित्रफिती तयार करून, आपण त्या अपलोड करणार आहोत. समजा महाराष्ट्रात १ लाख स्थळांवर वृक्ष लागणार असतील तर त्या प्रत्येक स्थळाची चित्रफीत करून आपण त्या स्थळाच्या अक्षांश-रेखांशासह ती पब्लिक डोमेनमध्ये देणार आहोत. एखाद्या व्यक्तीने एखादा जिल्हा क्लिक केला तर त्या जिल्ह्यात किती वृक्षारोपण झाले, तालुका क्लिक केला तर किती गावांमध्ये वृक्षारोपण झाले आणि गाव क्लिक केले तर कोणत्या जागांवर किती वृक्ष लागलेत हे पाहता येईल, अशी व्यवस्था आपण करत आहोत. पुढे दर सहा महिन्यांनी ही सर्व माहिती अशाच पद्धतीने अपलोड होऊन लावलेले झाड जगले का, वाढले का, वाढले तर किती वाढले हेही आपल्याला पाहता येईल. अशा दोन वर्षांची वाढ आपण येथे कमांड रूमच्या माध्यमातून नोंदवणार आहोत.

### वृक्षलागवडीची मधुर फळे

लोक आपल्याला प्रश्न विचारतात, गोष्टी तर मोठ्या करता, त्या दोन कोटी वृक्षांचे काय झाले, खरेच जगलेत का, मोठे झालेत का ते वृक्ष? की हे नुसते सरकारी आकडे आहेत? आता दोन किंवा चार कोटी वृक्ष लागवडीचा खरेच काय परिणाम झाला हे मला स्वत:ला सांगण्याची आवश्यकता वाटत नाही कारण याचे उत्तर भारत सरकारच्या पर्यावरण विभागाच्या अहवालातून मिळाले आहे. हा अहवाल दर दोन वर्षांनी प्रकाशित



होतो. हा सॅटेलाईट सर्व्हे आहे. याची आकडेवारी भारत सरकारच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या आकडेवारीवरून आपल्या लक्षात येते की, मागच्या दोन वर्षात जे मिशन आपण हाती घेतले त्याचा परिणाम म्हणून वन आणि वनांशी संबंधित चार क्षेत्रांत महाराष्ट्र देशात क्रमांक एकवर आला.

वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादन महाराष्ट्रात २७३ चौ.कि.मी ने वाढले. कांदळवनक्षेत्र समुद्रजीवांसाठी, त्यांच्या अनेक प्रजननासाठी महत्त्वाचे आहे. त्यात ८२ चौ. कि.मी.ने वाढ झाली आहे. यासाठी कोकण आणि ठाणे समुद्रकिनाऱ्यालगत असणाऱ्या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना, जनतेला मी धन्यवाद देईन, कारण त्यांनी या मिशनच्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नामुळे कांदळवनक्षेत्र वाढण्यात महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आला.

आपण सर्वांनीच लहानपणी कल्पवृक्षाची कथा ऐकलीय, पण कुणीच कल्पवृक्ष अजून तरी पाहिला नसेल. बांबू हा कदाचित कल्पवृक्षच तर नसेल ना, असे वाटते. कारण बांबूपासून मोठा रोजगार प्राप्त करता येतो. यासाठी बांबू क्षेत्र वाढवण्याचा निर्णय घेतला.

बांबूसाठी लागणारा वाहतूक परवाना ज्याला टीपी म्हणतो तो सर्वप्रथम रद्द केला. बांबू रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग सेंटर सुरू केले. ज्याची दखल नुकतीच सिंगापूरच्या माध्यमांनी घेतली. आता पुण्यातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यापीठ, राहुरीचे कृषी विद्यापीठ, अमरावतीचे संत

## वृक्षलागवडीचे उद्दिष्ट

२ कोटी वृक्षारोपणाची यशस्विता लक्षात घेऊन, लोक स्वत:हून पुढे आले आहेत. ही वृक्षारोपण चळवळ जी लोक चळवळीत रूपांतरित झाली आहे, त्याची गती तुटू न देता पुढे सुरू ठेवावी; असा अनेकांकडून प्रतिसाद मिळाला. समाज माध्यमावर देखील या आगळ्यावेगळ्या कामाचे कौतुक झाले. अनेकांनी वृक्षारोपणाचे काम पुढे सुरू ठेवण्याबाबत प्रतिक्रिया व्यक्त केल्या. लोकांचा उदंड प्रतिसाद पाहून, २०१७ ते २०१९ या ३ वर्षांकरिता ५० कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्याचे आम्ही ठरवले. त्यामध्ये २०१७, २०१८ आणि २०१९ मध्ये अनुक्रमे ४ कोटी, १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्षलागवड करण्याचे नियोजन केले आहे. तसेच २०१७, २०१८ आणि २०१९ या वर्षामध्ये ग्रामपंचायतींनादेखील अनुक्रमे १ कोटी, ३ कोटी आणि ८ कोटी असे एकंदरीत १२ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट दिले आहे.

२०१७ मध्ये १ ते ७ जुलै असा आठवडाभर वृक्षलागवडीच्या कार्यक्रम राबवला. लोकांनी भरभरून प्रतिसाद दिली. १० ऑक्टोबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जवळपास २६ शासकीय विभाग आणि केंद्र शासनाच्या रेल्वे, रस्ते महामार्ग, संरक्षण, नाबार्ड इत्यादी संस्थांनादेखील बरोबर घेण्याचे ठरवले. या सर्वांच्या मदतीने ४ कोटी ऐवजी ५.४३ वृक्षलागवड झाली. हे कामदेखील विक्रम करणारे ठरले. समाजातील सर्वच घटकांनी या कामाला भरभरून प्रतिसाद दिला. २०१८ आणि २०१९ मध्ये देखील प्रचंड प्रतिसाद मिळेल, असा विश्वास आहे.

## हरित लोकचळवळ

मी अधिकाऱ्यांना सुद्धा सांगितले की, सरकारी उपक्रम म्हणून तुम्ही या कामाकडे पाहू नका. कदाचित हे वृक्ष लावल्याने किंवा मिशन राबवल्याने तुमची वेतनश्रेणी वाढणार नाही पण पर्यावरण चांगले असेल तर तुमची आयुष्यवाढ निश्चित होईल. हा कार्यक्रम सर्व जातीचा, धर्माचा आणि पक्षाचा आहे. सर्व पक्षांना मी आवाहन केले की, तुम्ही तुमच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून, पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून हे मिशन पुढे नेण्याचा प्रयत्न करा.

मराठवाड्यात वनक्षेत्र कमी होते. लातूरला पाण्याची ट्रेन जाणे हा काही राज्याच्या कौतुकाचा विषय असू शकत नाही आम्ही तिथे भारत सरकारच्या आर्मीची इको बटालियन स्थापन केली. देशाच्या सीमेची सुरक्षा करणाऱ्या या जवानांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यायची जबाबदारी हाती घेतली. आपण महाराष्ट्रात हरित सेना स्थापन केली. ५२ लाखांहून अधिक सदस्य आज या सेनेचे सदस्य झाले आहेत. आपला एक कोटीचा संकल्प आहे. पुढच्या चार महिन्यात ही ग्रीन आर्मी जगातील सर्वात मोठी आर्मी असेल असा मला विश्वास आहे. प्रत्येक राष्ट्राची स्वत:च्या सीमेचे रक्षण करणारी सेना



आहे. पण या वसुंधरेचे रक्षण करणारी ही हरित सेना आगळीवेगळी आहे.

वनाचे नाते जनतेच्या मनाशी जुळावे, यासाठी आपण हॅलो फॉरेस्ट १९२६ ही वनाशी संबंधित देशातील पहिली हेल्पलाईन महाराष्ट्रात सुरू केली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत एखादा वनवणवा पेटला तर सजग पर्यावरणप्रेमी व्यक्तीला तो पाहिल्यानंतर वन विभागाला कळवण्याची सोय व्हावी अशी व्यवस्था आपण निर्माण केली. आपल्याकडे १ हजार हेक्टरच्या मागे एक वनमजूर आहे. वणव्याची माहिती त्याच्यापर्यंत पोहोचेपर्यंत जंगल जळून खाक होईल. पण वणवा लागल्याचे पहाताच जर सामान्य माणसाने ते हॅलो फॉरेस्ट १९२६ वर कळवले तर वनातील आग लवकर विझवणे शक्य होईल. या व्यासपीठाच्या माध्यमातून आता प्रत्येकजण पर्यावरणाचा सेनापती होऊ शकेल. अवैध शिकार, अवैध वृक्ष कटाई, लाकडाची चोरी, वन क्षेत्रातील अवैध खनिज उत्खनन, झाड पडले, पाडले असे वाटत असेल तर ते वन विभागाला कळवून प्रत्येक व्यक्तीला वनाशी त्याचे मन जोडण्याची संधी आपण दिली.

क्लिन सिटी व क्लिन व्हिलेजसोबत ग्रीन सिटी आणि ग्रीन व्हिलेज हा कार्यक्रम जनतेच्या सहकार्याने पुढे नेण्याचा शासनाचा मानस आहे, हे लोकआंदोलन आहे.

गाडगेबाबा विद्यापीठ या तीन विद्यापीठांत बांबू प्रशिक्षण केंद्र सुरू होणार आहे. बांबू ते रोजगार असा प्रवास आता या तीन विद्यापीठांत सुरू होईल. बांबूच्या प्रजाती वाढवण्यासाठी बांबू उद्याने तयार केली. जगामध्ये बांबूच्या १२५० प्रजाती आहेत, देशात १२३ आहेत, पण महाराष्ट्रात प्रामुख्याने आठ प्रजातींचाच बांबू उपलब्ध होतो. यात संशोधन करून हा एक व्यावसायिक वनोत्पादनाचा भाग व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचा परिणाम म्हणून 'फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया'च्या २०१७ च्या अहवालात राज्याचे बांबू क्षेत्र फक्त दोन वर्षात ४४६२ चौ.कि.मी.ने वाढल्याची नोंद घेण्यात आली आहे.

जलयुक्त शिवार हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. वनविभाग यात मागे राहिला नाही. वनविभागाने जलयुक्त शिवाराला सहकार्याचा हात दिल्याने वनक्षेत्रातील जलव्याप्त क्षेत्रात ४३२ चौ.कि.मी.ची वाढ केवळ दोन वर्षात झाली.

### अभिनव उपक्रम

शुभेच्छावृक्ष, आनंदवृक्ष, स्मृतिवृक्ष, लेक सासरी जाताना तिच्या हातून लावलेली माहेरची झाडी अशा अनेक प्रसंगांची आठवण वृक्ष लावून चिरंतन करण्याचा प्रयत्न करणे; असे अनेक अभिनव उपक्रम हाती घेतले. काही कार्यालयांनी 'कार्यालय तिथे श्रीफळ' हा उपक्रम राबवताना नारळाची झाडे लावण्याचे निश्चित केले. आरोग्य उपकेंद्रात वनौषधी लावण्याचे काम होत आहे. महात्मा गांधीजींनी सेवाग्राममध्ये लावलेल्या पिंपळाच्या वृक्षाच्या सालीपासून कलमे तयार करून ती रोपे आपण पुढच्यावर्षी २०६ शहीद स्मारकांमध्ये लावणार आहोत.

वृक्षलागवडीत बचतगटांना आपण मदतीला घेत आहोत. ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर व चंद्रपूर जिल्ह्याच्या औष्णिक ऊर्जा केंद्रात बचतगटांना जागा देऊन तिथे वृक्षलागवड करण्याची एक उत्तम योजना तयार केली आहे. तसेच पंकजाताईंचा ग्रामविकास विभाग वृक्षलागवडीमध्ये आघाडीवर आहे. ज्या कुटुंबाकडे शेती आहे,

अशा शेतकरी कुटुंबात जर एखादी मुलगी जन्माला आली तर आपण त्यांना १० वृक्ष भेट देण्याची योजना आणत आहोत. या १० वृक्षांत पाच वृक्ष फळांचे तर पाच सागवानाचे असतील. आपण अत्याधुनिक रोपवाटिकांमधून मोठ्या प्रमाणात रोपे तयार केली. आपल्याला १३ कोटी वृक्ष लागणार आहेत. आपल्याकडे सध्या २५ कोटींहून अधिक रोपे उपलब्ध आहेत. रोप लावण्यासाठीचे खड्डे खोदून तयार आहेत. रस्त्याच्या दुतर्फा, टेकड्यांवर, कालव्याकाठी, जलसिंचन प्रकल्पाच्या बॅक वॉटरमध्ये, जलयुक्त शिवार कार्यक्रमातील कामांच्या काठांवर अशा विविध ठिकाणी आपण १५७ वृक्षप्रजाती लावणार आहोत. औरंगाबादमध्ये ४३३ टेकड्यांवर वृक्ष लागणार आहेत. एक टेकडी-एक अधिकारी अशी व्यवस्था त्यांनी केली आहे. रॅली फॉर रिव्हरचे जग्गी वासुदेव यांच्या सोबतीने आपण नदी-नाल्यांच्या काठावर वृक्ष लावत आहोत. सोलापूरमध्ये झाडांची भिशी निघत आहे. लग्नात कोणी सप्तपदीऐवजी अष्टपदी घेत आहेत. आठवे वचन हे पर्यावरण रक्षणाचे आहे.

## आर्थिक तरतूद

प्रत्येक विभागाला वन संवर्धन आणि संरक्षणासाठी त्यांच्या विभागाच्या एकूण तरतुदीच्या ०.५ टक्क्याच्या मर्यादेत काही रक्कम खर्च करण्याची परवानगी दिली. काही विभागांनी यामध्ये रुची घेत पिंपळ वन, बांबू वन, बेल वन, सीताफळ वन, आंबा वन, चिंच वन, नक्षत्र वन, ऑक्सिजन पार्क, त्रिमूर्ती पार्क असे विविध उपक्रम प्रस्तावित केले आहेत. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातून २५ लाख रुपयांपर्यंतची रक्कम वृक्षलागवड आणि संवर्धनाच्या


**महावृक्षलागवड मोहिमेंतर्गत वृक्षारोपण करताना विद्यार्थी.**

जनजागृतीसाठी वापरण्याची परवानगी दिली. शेतजमीन आणि शेतबांधावर रोजगार हमी योजनेंतर्गत फळझाड लागवड करण्यास मान्यता दिली. वन विभागाने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्याऐवजी वन आणि वनाशी संबंधित एखादे पुस्तक किंवा रोप देऊन स्वागत करण्याची परंपरा पाडली. शहराचा जसा डी.पी प्लान असतो तसा टी.पी (ट्री प्लान) करण्याच्या सूचना दिल्या. ही लढाई आता सर्वांना एकत्र घेऊन लढायचे ठरवले आहे. धन माणसाच्या शेवटच्या श्वासापर्यंत कामी येते, पण वन पुढच्या जन्मांसाठीही कामाला येते, ही भावना समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण काम करत आहोत.

प्राणवायू फुकट आहे म्हणून कदाचित आपल्याला त्याचे महत्त्व जाणवत नाही. २४ तासात आपण साधारणत: २१,९९९ वेळा श्वास घेतो. म्हणजे निसर्ग आपल्याला आजच्या बाजारभावाप्रमाणे २१०० रुपयांचा प्राणवायू रोज देतो. आपण आपले आयुष्य ८० वर्षांचे आहे असे मानले तर या संपूर्ण आयुष्यात साधारणत: ६ कोटी १३ लाख २० हजार रुपयांचा प्राणवायू निसर्गाकडून आपण फुकट घेतो. मग पैसे खर्च करून वृक्ष लावण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी नाही का?

## मोफत रोपे का नको?

अनेकदा लोक म्हणतात, वनविभागाने आम्हाला मोफत रोपे द्यावीत. महाराष्ट्रात एकूण १२.५ कोटी मोबाइल आहेत. त्यापैकी ७.५ कोटी स्मार्ट फोन आहेत. यापैकी ३ कोटी लोक जर २ तास व्हॉट्सॲपसाठी खर्च करत असतील असे गृहीत धरले तर २,१९० कोटी तास खर्च होतात. त्याची किंमत ४३,८०० कोटी रुपये आहे. साधारणत: ९० हजार कोटी रुपयांचे पेट्रोल, डिझेल आपण महाराष्ट्रात वापरतो. ज्यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रदूषणात भर पडते. मात्र आठ रुपयांचे झाड आपल्याला मोफत पाहिजे असते, असे का? हा प्रश्न वनमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून माझ्यासमोर निर्माण होतो. त्यामुळेच मोफत वृक्ष द्यायचा नाही, हा निर्णय मी जाणीवपूर्वक घेतला आहे.

## उचलू या, वृक्षगोवर्धन

या दृष्टिकोनातून मागील दोन वर्षांपासून वनविभाग काम करत आहे. ज्या राज्यात शुद्ध हवा आणि पर्यावरण असेल तिथे शुद्ध विचार निर्माण होईल. शुद्ध विचारांच्या शुद्ध कृतीतून प्रत्येक माणूस महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देईल. हे लक्षात घेऊन, वृक्ष लावण्याची इच्छा असणाऱ्या माणसाच्या मनात वृक्ष लावण्याच्या मानसिकतेचे बीजारोपण करणे हे या मिशनचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

संत तुकारामांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षी ही सुस्वरे आळविती' असे म्हटले. संत ज्ञानेश्वरांनी 'वने ही निर्मावी, जलाशये बांधावी, मानव तथा प्राणिमात्र कल्याणार्थ' असे सांगितले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनीसुद्धा वनाची आज्ञावली जगासमोर ठेवली. त्यातून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. या सर्वांची प्रेरणा डोळ्यासमोर ठेऊन जात, धर्म, पक्ष, रंग, वय, उंची, वजन, गरीब-श्रीमंत याचा विचार न करता पर्यावरण रक्षणाचे कर्तव्य पूर्ण केले पाहिजे; पर्यावरणाच्या ऱ्हासाचे दर्शक न होता पर्यावरणाचे रक्षक म्हणून काम केले पाहिजे.

मला विश्वास आहे की, १३ कोटी वृक्षलागवडीचे लक्ष्य महाराष्ट्र गाठेलच. हे वृक्षधनुष्य, हा वृक्षगोवर्धन मागच्या दोन वर्षांप्रमाणे या वर्षीही जनतेच्या सहभागातून आम्ही यशस्वीपणे उचलू शकू.

**शब्दांकन: डॉ. सुरेखा मधुकर मुळे**
वरिष्ठ साहाय्यक संचालक (माहिती)

**राज्याचे वृक्ष व वन आच्छादन वाढवण्याच्या दृष्टीने पुढील तीन वर्षांमध्ये राज्य शासनामार्फत लोकसहभागातून ५० कोटी झाडे लावली जाणार आहेत. यापूर्वी दोन व चार कोटी वृक्षलागवडीच्या उद्दीष्टापेक्षा अधिक वृक्ष लावण्याचा विक्रम राज्याने केला आहे. या वर्षीदेखील ही विक्रमाची परंपरा कायम राहील, असा विश्वास आहे.**

# एक तरी झाड लावू या...

**राजे अम्ब्रीशराव आत्राम,** राज्यमंत्री, वने



निसर्गावर आपले जीवनमान अवलंबून आहे. त्याच्या सान्निध्यातच आपण निरोगी जीवन जगू शकतो. परंतु आपल्या सभोवताली असलेले डोंगर, नद्या, झाडे-वेली, पशु-पाखरे यांची साथसंगत दुर्मीळ होत चालली आहे. अमाप वृक्षतोड आणि त्यामुळे उद्ध्वस्त होत चाललेली वने-जंगले यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. त्याची झळ आपल्याला मोठ्या प्रमाणात सोसावी लागत आहे. हे चित्र बदलण्यासाठी वृक्षलागवडीचे जनआंदोलन उभारण्याची वेळ आता आली आहे.

पर्यावरणाचे संतुलन सांभाळण्यासाठी, वृक्षलागवडीच्या माध्यमातून जनआंदोलन उभे केले पाहिजे, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१६ मध्ये आकाशवाणीवरील ‘मन की बात’ या कार्यक्रमाद्वारे केले होते. याला साद देत राज्याने वृक्षलागवडीचे विक्रम मोडीत काढत मैलाचा टप्पा गाठण्याची तयारी केली आहे. या वर्षीचे १३ कोटी वृक्षलागवडीचे नियोजन व पुढील वर्षीचा ३३ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प ही नव्या विश्वविक्रमाची नांदी आहे.


(छायाचित्रः विद्याधर राणे)

**वृक्षारोपणात आमचाही सहभाग..**

अलीकडच्या काळात ‘निसर्गचक्र’ विस्कळीत झाल्याचे आपल्याला अनेकदा जाणवते. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, कधी गोठवणारी थंडी तर कधी अक्षरशः भाजून काढणारे ऊन... अशा अनेक बाबींवरून निसर्ग बदलत असल्याचे आणि त्यातून हे ‘निसर्गचक्र’ बिघडत असल्याचे वारंवार दिसते आहे. या बदलांचे दुष्परिणाम कमीअधिक प्रमाणात संपूर्ण जगाला सोसावे लागत आहेत. ही बाब गांभीर्याने घेतली नाही, तर पुढील काळात ते अधिक तीव्र बनत जाणार आहेत. आपली शेती पूर्णपणे नैऋत्य मौसमी पावसावर अर्थात मान्सूनवर अवलंबून असते. पण हवामान बदलामुळे पावसाचे वेळापत्रकही कोलमडले आहे. प्रमाण कमीअधिक होते आहे. बेभरवशाच्या मान्सूनमुळे शेती संकटात सापडली आहे. भूजलसाठे वारेमाप उपस्यांमुळे आटत चालले आहेत. या साऱ्या बाबी थेट तुमचे-आमचे रोजचे जगणे अधिक कठीण बनवणाऱ्या आहेत. त्यामुळे या समस्यांच्या पार्श्वभूमीवर, येणारा काळ हा पर्यावरणदृष्ट्या आव्हानात्मक आणि साऱ्या जगाची कसोटी पाहणारा असेल, यात शंका नाही.

पृथ्वीवर शांत, स्वस्थ जीवन जगायचे असेल तर जंगलांचे प्रमाण ३३ टक्के असायला हवे. महाराष्ट्रात सध्या २० टक्के जमीन ही वनांखाली आहे. म्हणजेच आणखी १३ टक्के जमीन वनांखाली यायला हवी. खरे तर, महाराष्ट्रात १३ टक्क्यांनी वृक्षलागवड वाढवायची तर त्यासाठी अजून ४०० कोटी झाडे लावण्याची गरज आहे. पण या आव्हानाने डगमगून न जाता महाराष्ट्र शासनाने तीन वर्षांत ५० कोटी झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. वृक्षलागवड व हरित महाराष्ट्रासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. वनसमृद्ध अभयारण्यासाठी निसर्ग पर्यटन मंडळाची स्थापना, वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी वन्यजीव विकास निधीची स्थापना, शहरी वनीकरणावर भर, झाडे लावण्यासाठी राज्याच्या कुठल्या भागात किती जागा उपलब्ध आहे याची माहिती मिळावी, यासाठी लॅण्ड बँकेची निर्मिती आदी उपक्रमांचा यात समावेश आहे. ‘त्रिपक्षीय करार’ हा आणखी एक महत्त्वाकांक्षी उपक्रम राज्य सरकारने सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत विविध संस्था, कंपन्यांना वनविभागाची जमीन ७ वर्षांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून कंपन्या त्यासाठी निधी उपलब्ध करून देतील आणि स्वयंसेवी संस्था वृक्षसंवर्धनाच्या उद्दिष्टाची अंमलबजावणी करतील, असा हा त्रिपक्षीय करार आहे. १ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत १३ कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट आपणाला यशस्वीरीत्या पूर्ण करायचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी अधिकाधिक सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. चला तर मग निर्धार करू या, एकतरी झाड लावू या...

**झाडे लावण्याची, जगवण्याची आस्था प्रत्येक सर्वसामान्याच्या मनात आहे, त्या आस्थेला खतपाणी घालण्याची जबाबदारी शासनाने उचलली आहे. शासनस्तरावर महावृक्षलागवड अभियानाला आकार देत असताना, सर्वांचा सहभाग हवा आहे. झाडे लावणारे आणि ते जगवणारे हात हवे आहेत.**

# हवा सर्वांचा सहभाग

**विकास खारगे,** सचिव, वने



पृथ्वीचे सतत वाढत जाणारे तापमान, हवामान, ऋतू, वातावरण बदल, पाण्याचे दुर्भिक्ष, दुष्काळ, कार्बनचे मोठ्या प्रमाणातील उत्सर्जन, समुद्रपातळीत होणारी वाढ, ओझोनचा विरळ होत चाललेला थर आणि इतर अनेक नैसर्गिक आपत्ती यामुळे मानवी समूहासमोर खूप मोठे आव्हान उभे राहिले आहे. या सर्व बाबींची तीव्रता आणि दाहकता कमी करून, निसर्गाचा समतोल आणि जैवविविधतेची स्थिरता टिकवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी अनेक पर्यायांपैकी वृक्षलागवड आणि संगोपन हा सर्वात परिणामकारक पर्याय जागतिक स्तरावर समोर आला आहे.

### पाठिंबा व समर्थन

वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या दूरदर्शी विचारधारेतून ५० कोटी वृक्षारोपणाचा अतिशय महत्त्वाकांक्षी, आगळावेगळा आणि नावीन्यपूर्ण उपक्रम २०१७ ते २०१९ या ३ वर्षाच्या कालावधीमध्ये हाती घेण्यात आला आहे. त्यास प्रधानमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, महाराष्ट्राचे केंद्रातील मंत्री आणि समाजातील सर्व घटकांचा मोठा पाठिंबा आणि समर्थन मिळाले आहे. वृक्षारोपणाचा कार्यक्रम जनचळवळीतून सातत्यपूर्वक पुढे सुरू राहील, अशी अपेक्षा आहे.

### विक्रमी वृक्षलागवड

प्रथम टप्प्यात आम्ही १ जुलै, २०१६ रोजी २ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट ठरवले असताना प्रत्यक्षात २.८२ कोटी वृक्ष लावले गेले. या उपक्रमाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने घेतली. २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट असताना जनतेच्या प्रचंड उत्साहामुळे आम्ही ५.४३ कोटी झाडे लावू शकलो. या उपक्रमाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने दुसऱ्यांदा घेतली आणि राज्य शासनास प्रमाणपत्र दिले.

### सर्वांचा सहभाग

२०१८ मध्ये १३ कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. त्यामध्ये सर्व ३० प्रशासकीय विभाग, रेल्वे, संरक्षण, राष्ट्रीय महामार्ग, केंद्र शासनाच्या इतर आस्थापना, नाबार्ड इत्यादींचा सहभाग घेण्यात येत आहे. त्या दृष्टीने नियोजन आणि पूर्वतयारी आम्ही जुलै, २०१७ पासून सुरू केली आहे. आधीपासून तयारी सुरू केल्याने नियोजन उत्तम रितीने होत आहे. शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांमध्ये वृक्षलागवड कार्यक्रमाबाबत उत्साहवर्धक वातावरण आहे. समाजातील सर्व घटकांपर्यंत आम्ही टीव्ही, रेडिओ व इतर प्रचार आणि प्रसिद्धी माध्यमांतून पोहोचलो आहोत. घराघरांत आता वृक्षलागवड आणि संगोपन याबाबत चर्चा घडू लागल्या आहेत.

### प्रेरणादायी

कोणतीही गोष्ट आपल्या संस्कृतीचा, जगण्याचा भाग झाली तर यशाचे प्रमाण केव्हाही जास्त असते, हे प्रत्येक वेळी दिसून येते.

काही उदाहरणे. छोटीशी, पण महत्त्वाची, प्रेरणा देणारी.. पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातले रानमळा हे एक छोटसे गाव. पी.टी. शिंदे हे तिथले माजी सरपंच. आपल्या गावात त्यांनी एक उपक्रम सुरू केला. स्वत:पुरता. गावात कोणाचा जन्म झाला की, ते लगेच त्यांच्या घरी जातात, कुटुंबाचे अभिनंदन करतात आणि त्यांच्या हातात एक रोपटे ठेवून सांगतात.. हा 'जन्मवृक्ष'.. आपल्या अंगणात लावा. गावात लग्न असेल, लग्नात नवदांपत्याला रोपटे भेट देऊन सांगतात, हा 'शुभमंगल वृक्ष'.. गावातल्या कोणाच्याही घरी कुठला आनंदाचा प्रसंग असो की दु:खाचा, ते तिथे हजर होतात आणि कुटुंबीयांना 'आनंद वृक्ष' किंवा 'स्मृतिवृक्ष' भेट देतात.



आंबा, फणस,जांभूळ,सीताफळ.. आजपर्यंत जेवढी रोपटी या गृहस्थांनी भेट दिली, ती सारीच्या सारी शंभर टक्के जगली आहेत. कारण त्यामागे होती आपुलकी, जिव्हाळा, संस्कार. ज्यांना ही रोपटी भेट दिली त्यांनीही ती अतिशय निगुतीने वाढवली. ही झाडे मरण्याचा प्रश्नच नव्हता.. म्हटली तर अगदी छोटीशी कृती, पण त्यामागची भावना आणि प्रेम अतिशय सच्चे. त्यामुळे त्याचा परिणामही अत्यंत सकारात्मक, प्रेरणादायी झाला. अशा चांगल्या गोष्टी मर्यादित प्रमाणात राहू नयेत म्हणून राज्याच्या ग्रामविकास विभागाने नुकताच एक अध्यादेश काढलाय.. आता राज्यातल्या २८,५०० ग्रामपंचायतींमध्ये १ जुलै २०१८ पासून हा उपक्रम सुरू होणार आहे.

झाडे लावायचीत, पण त्यासाठी जागा कुठे कुठे उपलब्ध आहे, या संदर्भात 'लॅण्ड बँक' ही तयार केली जातेय. त्यामुळे अगदी जिल्हा आणि गाव पातळीपर्यंत उपलब्ध असलेल्या जागांची नोंद केली गेली आहे. या उपलब्ध जागेवर आता झाडांची लागवड केली जाईल. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून हे महाअभियान आपण नक्की यशस्वी करू..

**रोपे लावताना आपल्या मातीचा पोत, तिथे पडणारा पाऊस आणि वातावरण या सगळ्याच गोष्टींचा विचार करून लावली तर रोपे जगण्याचे प्रमाण निश्चित वाढते. कोणता वृक्ष कोणत्या कारणासाठी उपयुक्त ठरू शकतो, याचादेखील अभ्यास महत्त्वाचा ठरतो.**

# झाडे अशी लावा..

रोप लावताना ते कोणत्या उद्देशाने लावायचे आहे हे निश्चित करून रोपाची प्रजाती निवडावी. त्या प्रजातीनुसार जागेची निवड करावी. आपण रोप लावताना खड्डे करतो आणि रोपे लावतो. पण रोपांसाठी खड्डे करणे हीदेखील अभ्यासपूर्ण गोष्ट आहे. रोपांसाठी शास्त्रोक्तपद्धतीने खड्डे करून, रोप लावल्यास ते रोप रुजण्यास निश्चित मदत होते.

## असे लावावे रोप

१.५ x १.५ x १.५ फूट खड्डा करावा. त्या खड्ड्यातील सर्व माती आणि दगडगोटे बाजूला काढावेत. रोप खड्ड्यात ठेऊन खड्डा शेणखत आणि सुपीक मातीचे समप्रमाण ठेवून जमिनीच्या पातळीपर्यंत पूर्ण भरून घ्यावा. नंतर हलक्या हाताने माती दाबून लावलेल्या रोपाला पाणी घालावे.

रोपे सहसा प्लास्टिकच्या पिशवीत असतात. अतिशय काळजीपूर्वक प्लास्टिकची पिशवी बाजूला करून मातीसह रोप अशा प्रकारे धरावे की, ज्यामुळे त्यांची गळपट्टी बाजूच्या जमिनीच्या पातळीत येईल व संपूर्ण मूळ सरळ राहील ते दुमडले जाणार नाही. शक्यतोवर रोपे सकाळी किंवा संध्याकाळी लावावीत. रोपे लावल्यानंतर त्याला नियमित खत, पाणी द्यावे, त्याची नियमित निंदणी व कोळपणी करावी, रोप चांगल्या पद्धतीने वाढण्यासाठी फांद्याची प्रमाणात छाटणी करावी.

## झाडे आणि त्यांचे उपयोग

**इमारतीच्या लाकडासाठी–** सागवान, बिजा, हळदू, शिवण, सिरस, किन्ही, ऐन (साजड), तिवस, कळस, खडसिंगी, रोहण, मोहीन, धामण, शिसम, बाभूळ, धावडा, केकड, महोगनी.

**चाऱ्यासाठी–** बाभूळ, महारुख, पिंपळ, अरंग, चिंच, अंजन, सुबाभूळ, बोर, शेवगा, वड, खैर, बेल, चिंचवा, कडुनिंब, कचनार, उंबर, धामन, कुसुम, मुरुडशेंग, मोहिन, विलायती चिंच.

**गवतप्रजाती–** शेडा, मोठा मारवेल, मारवेल, मुशी, डोंगरी, बेर, दिनानाथ, धामणा, गिनी, ऱ्होडस, हरळी, काळी कुसळी,



| पर्जन्यमानानुसार झाडे | | |
|---|---|---|
| **पर्जन्यमान** | **मातीची आवश्यक खोली** | **लावणीयोग्य झाडे** |
| सुमारे २५० ते ५०० मि.मी | ५० सें.मी किंवा अधिक | शिवण, शिरस, शिसू, खैर इ. |
| | २५ सें.मी ते ५० सें.मी | शिवण, शिरस, शिसू, खैर, कडुनिंब, चंदन, ऑस्ट्रेलियन बाभूळ इ. |
| | २५ सें.मी.हून कमी (निकृष्ट जमीन) | कडुनिंब, खैर, सागवान, घायपात, इ. |
| सुमारे १८०० मि.मी पर्यंत | २५ सें.मी.हून कमी (निकृष्ट जमीन) | सागवान, हळदू, सावर, बिजा, बांबू इ. |
| १८०० मि.मी.हून अधिक व जमिनीची उंची समुद्र सपाटीपासून ८०० मीटरपर्यंत असलेल्या प्रदेशात | २५ सें.मी.हून कमी (निकृष्ट जमीन) | सुरू, कदंब, बांबू, सिल्वर ओक, सोनचाफा, सप्तपर्णी, निलगिरी |

फूली, पोकळ्या, फोराडी, पॅरा, घाण्या मारवेल.

**फळांसाठी–** आंबा, चिंच, चिकू, नारळ, फणस, जांभूळ, कवठ, करवंद, सीताफळ, आवळा, तेंदू, बोर, काजू, खिरणी, विलायती चिंच, पेरू, बैल, कुसुम, चारोळी, बेहडा, हिरडा.

**इंधनासाठी–** बाभूळ, ऑस्ट्रेलियन बाभूळ, सुबाभूळ, गिलरीसिडीया, रान शेवरी, जंगली बदाम, महारूख, केशिया सेनेगल, कॅशिया सायमिया, अडुळसा, धावडा, विलायती चिंच, घाटबोर, प्रोसिफिसच्या प्रजाती, बोर, भिर्रा, बकान, विलायती मेहंदी, कुसुम, चिचवा, कखम, गराडी, शिसू, अंजन, हिवर, करंज, पार्किनसोनिया.

**शेती अवजारे व शेतीकामासाठी–** बाभूळ, सागवान, शिवण, जांभूळ, बांबू, निलगिरी, आंबा, खैर, तिवस, किनी, सेमल, धावडा, धामण.

## प्रदूषण नियंत्रणासाठी

**वातावरणात प्राणवायूचे प्रमाण वाढवण्यासाठी–** पिंपळ, अमलतास, सेमल, कदंब, गुलमोहर, बांबूसा वल्गॅरिस.

**वातावरणातील प्रदूषित कण शोषून घेण्यासाठी–** उंबर, सीताफळ, जांभूळ, सप्तपर्णी, आवळा, चिंच, मोह, बेल, कडुनिंब, पुत्रंजीवा, तेंदू, आंबा, चारोळी, अमलतास, जारुळ, लेंडिया, अशोक, सेनल, पळस, गुग्गळ.

**वातावरणात सुगंध पसरवून हवेतील प्रदूषण थांबवण्यासाठी–** बेल, अमलतास, लेमनग्रास (गवती चहा), बांबूसा ट्रायोनिटिस, सफेद कचनार (अमोनियाचे प्रमाण कमी करण्यासाठी).

**सांडपाण्याच्या जागेत लावावयाची झाडे–** बोर, चिंच, जांभूळ, साजड, अर्जुन. **जैविक इंधनासाठी (बायोडिझेल) उपयुक्त झाडे–** मोहा, करंज, जट्रोफा (रान एरंडी), कडुनिंब, सिमारुबा.

**रस्त्याच्या दुतर्फा लावण्यासाठी झाडे–** छाया देणारे, जलद व प्रतिकूल परिस्थितीत वाढणारे तसेच वाहतुकीला अडथळा न येण्याइतके उंच वाढणारे वड, शिसू, कडुनिंब, आंबा, कुसुम, निलगिरी, करंज, गुलमोहर, पेल्टोफोरम, बाभूळ, अमलतास, अंजन, जॅकरांडा, विलायती चिंच, बकान, जांभूळ, चिंच, पिंपळ, बेहडा, अर्जुन इत्यादी वृक्ष.

**जमिनीच्या प्रकारानुसार झाडं**

| जमिनीचा प्रकार | लागवडयोग्य प्रजाती |
|---|---|
| करड्या व काळ्या रंगाची विविध पोताची जमीन | सिरस, कडुनिंब, अंजन, शिसू, सुबाभूळ, भेंडी, ऑस्ट्रेलियन बाभूळ, करंज, आंबा, निलगिरी, शेवगा इ. |
| ट्रप दगडापासून तयार झालेली मध्यम ते खोल चुनखडीयुक्त तपकिरी व काळ्या रंगाची जमीन | सागवान, बांबू, खैर, निलगिरी, सुबाभूळ, शिसू, सिरस, चिंच, बाभूळ, सीताफळ, आंबा इ. सिरस, चिंच, बाभूळ, सीताफळ, आंबा इ. |
| रेताळ जमीन | खैर, शिसू, सिरस, बकान, करंज, कडुनिंब, इ. |
| चिकन मातीची जमीन | हिवर, बाभूळ, महारुख, सिरस, जांभूळ, अर्जुन, करंज. इ. |
| क्षार व आम्लयुक्त जमीन | सिरस, करंज, अर्जुन, निलगिरी, ऑस्ट्रेलियन बाभूळ, इ. |
| तांबूस मातीची जमीन | ऑस्ट्रेलियन बाभूळ, मोहा, बिजा, सागवान, अंजन, सेमल, कांचन, शिवण, काजू, इ. |
| रुक्ष क्षेत्र(रीड क्षेत्र) | बाभूळ, सिरस, कडुनिंब, शिसू, निलगिरी, सुरू, आवळा, बोर, कांचन इ. |

**शोभेसाठी लावावयाची झाडे–** गुलमोहर, पळस, कदंब, स्पॅथोडिया, कम्पॅन्यूलेटा, कांचन, अमलतास, कॅशिया प्रजाती, जॅकरांडा, नागचाफा, सोनचाफा, शंकासूर, पेल्टोफोरम, जारुळ, ग्लिरिसिडिया, सेमल, बॉटल ब्रश, रेन ट्री, बकान, केशिया प्रजाती, बाहुनिया प्रजाती, सिल्वर ओक, सुरू, थुजा, निलगिरी, अशोक, चंदन, महोगनी, जंगली बदाम, पुत्रंजीवा.

**शेताच्या बांधावर लावावयाची झाडे–** वैरणासाठीच्या झाडात अंजन, कचनार, चिंच, बकान, बाभूळ, बिजा, बोर, वड, शिरस, शिसू, सुबाभूळ, पिंपळ. कुंपणासाठी लावावयाच्या झाडात एरंड, ग्लिरिसिडिया, चिल्लार, मेंदी, विलायती बाभूळ.

**पाट आणि विहिरीजवळ लावावयाची झाडे –** आंबा, बाभूळ, उंबर, रिठा, बेल, बांबू.

**रस्ता– रेल्वेमार्ग, कालवे यांच्या दुतर्फा लावावयाची झाडे –** अशोक, आंबा, करंज, काशिद, कुसूम, चिंच, जांभूळ, निम, रेन ट्री, पिंपरी, बकूळ, मोहगणी, मोहा, वड, सिरस, शिसू, पेल्टोफोरम या झाडांबरोबरच सरळ उंच वाढणाऱ्या झाडांमध्ये अशोक, आकाशनीम, निलगिरी, सिल्व्हर ओक, सुरू यांचा समावेश होतो.

**धार्मिक स्थळाजवळ लावावयाची झाडे–** अर्जुन, आंबा, आवळा, उंबर, कदंब, कवठ, कांचन, कवठीचाफा, पारिजातक, बकूळ, बेल, रुद्राक्ष, वड, सोनचाफा, चंदन, चिंच, नारळ, पांढराचाफा.


**शाळा महाविद्यालयाच्या मैदानात लावायची झाडे–** सावलीसाठी अमलतास, आंबा, निम, गुलमोहर, चिंच, वड, शिसू–बकूळ, शोभेची झाडे– बहावा, कचनार, कपोक, गुलमोहर, जॅकरांदा, पळस, पांगारा, सोनचाफा, सोमल, शेंद्री, कांचन, लाल सावर, टेबीबुया, बॉटलब्रश.

**सुवासिक फुलांसाठी–** पारिजातक, बकूळ, मधुकामिनी, रातराणी, सोनचाफा, सातविण, हिरवाचाफा इ.



# मिशन १३ कोटी

**१३ कोटी वृक्षलागवडीची मोहीम यशस्वी करण्याचा निर्धार शासनाने केला आहे. त्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. समाजातील सर्व घटकांनासुद्धा या मोहिमेत सहभागी करून घेतले जाणार आहे.**



- पर्यावरण संरक्षणात वृक्षांचे महत्त्व पटवून सांगण्यासाठी तसेच १ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत राज्यात होणाऱ्या वृक्षलागवडीचे महत्त्व समजून सांगण्यासाठी महाराष्ट्र दिनी म्हणजे १ मे २०१८ रोजी राज्यात सर्व ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन.
- जिल्हानिहाय ३३ टक्के वृक्षाच्छादनाच्या आराखड्याची निर्मिती.
- या वर्षीच्या १३ कोटी वृक्षलागवडीमध्ये वन विभाग ७.५ कोटी, इतर प्रशासकीय विभाग २.५ कोटी आणि ग्रामपंचायती ३ कोटी वृक्ष लावणार.
- 'रोप आपल्या दारी'सारखा नावीन्यपूर्ण उपक्रम यावर्षीही राबवण्यात येणार आहे. महत्त्वाच्या शहरांमध्ये वृक्ष/रोपे उपलब्ध करून देणारे स्टॉल्सदेखील लावले जातील.
- कोणते वृक्ष कुठे लावावेत, कसे लावावेत, त्याचे उपयोग काय, शोभेसाठी कोणते वृक्ष, सावलीसाठी कोणते वृक्ष, फळबागेसाठी कोणते वृक्ष, इमारतीच्या लाकडासाठी कोणते वृक्ष लावावेत, त्यासाठी कशा प्रकारचा पोत असलेली जमीन लागते, या सर्व गोष्टींचे मार्गदर्शन करणारी पुस्तिका वन विभागाने प्रकाशित केली आहे.
- वृक्षलागवड मोहिमेत मार्गदर्शन मिळवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील संपर्क आणि समन्वय अधिकाऱ्यांची नावे, त्यांचे संपर्क नंबर असलेली पुस्तिका वन विभागाने प्रसिद्ध केली आहे.
- औरंगाबाद विभागात 'माझी शाळा–माझी टेकडी' हा नावीन्यपूर्ण उपक्रम. २२०० टेकड्यांवर शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येईल. प्रत्येक विद्यार्थ्याकडून एक याप्रमाणे ३५ लाख झाडे यातून लागतील. १५०० शाळांमध्ये कॅम्पांतर्गत रोपवाटिका हा उपक्रम. प्रत्येक शाळेत १ हजार रोपांची नर्सरी. औरंगाबादमध्ये मोठ्या प्रमाणावर तुती लागवड.
- पुणे विभागात १०,७०८ कि.मी लांबीच्या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड. नदीकाठी वृक्षलागवडीचा बृहत्आराखडा तयार. देहू–आळंदी, पंढरपूर मार्गावर पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्यांत ३ लाख झाडे वारीमार्गाच्या दुतर्फा लावण्याचे नियोजन. गणेशमंडळांचा सहभाग.
- नाशिक विभागात धरणाच्या बॅक वॉटर क्षेत्रात वृक्षलागवड.
- पालघरमध्ये वनहक्क कायद्यांतर्गत दिलेल्या जागेवर फळझाड लागवड.
- सिंधुदुर्गमध्ये २ हजारांहून अधिक हेक्टरवर वृक्षलागवड.
- ठाणे महानगरपालिका क्षेत्रात गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये वृक्षलागवडीची स्पर्धा आयोजित. यातून दीड लाख रोपे लागतील असा अंदाज. ठाण्यात पहिला ट्री क्लबदेखील स्थापन.
- मराठवाड्यात बांबू क्लस्टर विकसित करण्यात येत आहे.
- शाळा–महाविद्यालयांमध्ये वृक्षलागवड– जतन संवर्धन आणि पर्यावरण रक्षण या विषयांवर विविध स्पर्धांचे आयोजन.
- पर्यावरण दिंडी, वृक्ष दिंडी, प्रभातफेऱ्या, शाळेत पहिले पाऊल–झाडे लावून, झाडांची भिशी, लग्नात आलेल्या पाहुण्यांचे रोपे देऊन स्वागत, असे उपक्रम.
- त्रिपक्षीय करार करून सात वर्षांच्या कालावधीसाठी वन जमिनीवर वृक्षलागवड करता येऊ शकते (वन जमिनीचा ताबा वन विभागाकडेच राहील). त्याचा लाभ अधिकाधिक स्वयंसेवी संस्थांनी, कंपन्यांनी घ्यावा, असे करार करून राज्यातील वृक्षाच्छादनवाढीत योगदान द्यावे, अशी व्यवस्था वन विभागाने विकसित केली आहे.
- स्मार्ट सिटी–क्लिन सिटी संकल्पनेबरोबर ग्रीन सिटी संकल्पना अमलात आणण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांनी सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी, लावलेल्या रोपांचे जतन आणि संवर्धन करावे, असे वनमंत्र्यांचे बांधकाम व्यावसायिकांच्या बैठकीत आवाहन.
- सामाजिक दायित्व निधीतून आसपासच्या गावात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करावी, हरित सेनेत सहभागी व्हावे,

'ग्रो फॉरेस्ट' ही संकल्पना विकसित करण्यासाठी कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात, शेतजमिनीवर फळबाग लागवड करण्यासाठी योगदान द्यावे, असे राज्यातील उद्योग–व्यापार क्षेत्रातील मान्यवरांच्या बैठकीत वनमंत्र्यांचे आवाहन.

- वृक्षलागवड मोहिमेत सहभागी होऊन १३ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प यशस्वी करावा, असे सिनेजगतातील मान्यवरांना वनमंत्र्यांचे आवाहन.
- मोठ्या स्वयंसेवी संस्थांनी गावे दत्तक घेऊन, तिथे लोकसंख्येएवढी झाडे लावावीत; अशी अपेक्षा वनमंत्र्यांनी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधीसोबत झालेल्या बैठकीत व्यक्त केली.
- राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नगरपालिकांचे सीईओ, महानगरपालिकांचे आयुक्त, वन विभागाचे विभागीय तसेच जिल्हास्तरीय अधिकारी यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संवाद साधून वनमंत्र्यांनी मार्गदर्शन केले.

## प्रत्येक माणसाला रोप मिळेल...

महावृक्षलागवड कार्यक्रमासाठी ऊंच वाढलेली, उत्तम दर्जाची रोपे उपलब्ध व्हावीत म्हणून वन विभागाने अतिशय नियोजनपूर्वक पावले टाकली. सामाजिक वनीकरण शाखेच्या ५५४, वन विभागाच्या १५६९, वनविकास महामंडळाच्या १३ अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका विकसित केल्या असून त्यात रोपे लावू इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसाला रोप मिळेल, इतकी रोपे उपलब्ध आहेत.



- जिल्हा नियोजन आणि विकास समितीकडे उपलब्ध असलेल्या निधीतून जिल्हाधिकारी वृक्षलागवडीसाठी निधी देऊ शकतात. नावीन्यपूर्ण योजनेतूनही हा निधी देता येईल. त्याशिवाय आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम यातून २५ लाख रुपयांपर्यंतचा निधी वृक्षलागवड आणि वृक्षदिंडीसारख्या प्रचार–प्रसारासाठी खर्च करता येईल.
- पाणी फाऊंडेशनने निवडलेल्या गावांमध्ये त्यांच्या सहकार्यातून वृक्षलागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. वन विभाग त्यांना रोपे पुरवणार आहे.
- जलयुक्त शिवाराला वनयुक्त शिवाराची जोड मिळणार असून सर्व जलयुक्त शिवाराच्या कामाच्या ठिकाणी वृक्षलागवड करून मृदा, जलसंधारण आणि वृक्षाच्छादनाचा तिहरी उद्देश साधला जाणार आहे.
- वनशेतीस प्रोत्साहन देण्याचा निर्णय राज्य अर्थसंकल्प २०१८ मध्ये घोषित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना पीक आणि पशुधनाबरोबरच उत्पन्नाचा एक नवा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी; या योजनेंतर्गत वृक्षारोपणासाठी दर्जेदार बियाणे, नवीन रोपटे, क्लोन्स, संकरित व सुधारित जातीचे लागवड साहित्य, शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले जाईल. वृक्षलागवड व रोपवाटिकांसाठी एकूण खर्चाच्या ५० टक्के एवढे अनुदान या योजनेतून मिळेल.
- महाराष्ट्र राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतात, शेतबांधावर फळबाग लागवड करण्यात येणार असून, यासाठी सामाजिक वनीकरण शाखा सहकार्य करील. यासाठी अनुदान देण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे.
- ज्या शेतकऱ्यांच्या घरात मुलगी जन्माला येईल, त्या कुटुंबांना १० रोपे ग्रामपंचायतींमार्फत भेट दिली जातील. ही नवीन योजना लवकरच सुरू होत आहे. त्यापैकी ५ रोपे ही सागाची आणि ५ रोपे ही फळझाडाची असतील. ती रोपे लावून जगवल्यास १८ वर्षांपर्यंत येणाऱ्या उत्पन्नातून मुलीचे शिक्षण आणि लग्न यासाठी उत्पन्न मिळू शकेल.
- प्रत्येक प्रशासकीय विभागास वृक्षलागवड आणि संगोपनासाठी त्यांच्या एकंदर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या कमीत कमी ०.५ टक्के तरतूद प्रस्तावित.
- प्रत्येक प्रशासकीय विभागांतर्गत होणाऱ्या बैठकांमध्ये, घेण्यात येणाऱ्या आढाव्यांमध्ये वृक्षलागवड आणि वृक्ष संगोपन हा विषय प्राधान्यक्रमावर घेण्यात यावा, केलेल्या वृक्षलागवडीची अधिकारी–कर्मचाऱ्यांनी पाहणी करावी, लावलेले वृक्ष जिवंत राहतील हे पाहावे असे आदेश सर्व विभागांतर्फे क्षेत्रीय कार्यालयांसाठी निर्गमित.
- महावृक्षलागवड मोहिमेंतर्गत होणारी वृक्षलागवड ही विश्वासार्ह, पारदर्शक व्हावी, यासाठी वन विभागाच्या नागपूर येथील कार्यालयात कमांड रूम सुरू करण्यात आली आहे. जीपीएस तंत्रज्ञानाच्या आधारे राज्यात होणाऱ्या वृक्षलागवडीची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून; कुठला वृक्ष कुणी लावला, कोणत्या प्रजातीचा लावला, आता त्याची स्थिती काय अशी सर्व माहिती राज्यभरातील लोकांना मिळू शकेल.
- वनक्षेत्राबरोबर राज्यात वनेतर क्षेत्रामध्ये लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होते. या सर्वांनी लावलेल्या वृक्षांची नोंद वन विभागाकडे व्हावी, म्हणून वन विभागाच्या संकेतस्थळाबरोबर गुगलच्या प्ले स्टोअरमध्ये 'माय प्लांट' नावाचे ॲप विकसित करण्यात आले आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील वन विभागाच्या कार्यालयात पाच ते सहा व्यक्तींचा आय.टी सेल स्थापन.
- http://www.greenarmy.mahaforest.gov.in या तसेच http://www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर डॅश बोर्ड तयार करण्यात आला असून, येथून हरित सेनेचे सदस्य होण्याची तसेच वृक्षलागवडीची माहिती मिळण्याची व्यवस्था विकसित करण्यात आली आहे.

**महावृक्षलागवड अभियानांतर्गत ५० कोटी वृक्षलागवडीसाठी राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांना वृक्षलागवडीचे विशिष्ट लक्ष्य ठरवून देण्यात आले आहे. यंदाच्या १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमासाठी विविध प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या उद्दिष्टांचा त्यात समावेश आहे.**

# लक्ष्यपूर्तीची दिशा



महसूल व वन विभागाने १० ऑक्टोबर, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, प्रत्येक प्रशासकीय विभागास दिलेल्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने स्वतंत्र निर्देश; त्यांच्या आधिपत्याखालील क्षेत्रीय यंत्रणांना देण्याबाबत विनंती करण्यात आली. त्यानुसार प्रत्येक प्रशासकीय विभागाने स्वतंत्र परिपत्रक निर्गमित केले.

प्रत्येक प्रशासकीय विभागांनी त्यांच्या आधिपत्याखालील जिल्हानिहाय समन्वय अधिकाऱ्यांची यादी व पुस्तिका ३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंत प्रसिद्ध करण्याबाबत विनंती करण्यात आली. संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्रत्येक जिल्ह्याचा वृक्षलागवडीचा सूक्ष्म नियोजन आराखडा ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत तयार करण्याबाबत सूचित करण्यात आले. प्रत्येक प्रशासकीय विभागास दिलेल्या उद्दिष्टानुसार वृक्षलागवडीसाठी खड्डे तयार करणे आणि ते माती, खत आणि कीटकनाशके यांनी भरून तयार करून ठेवण्याबाबत ३१ मार्च, २०१८ पर्यंत कार्यवाही करण्याबाबत सांगण्यात आले.

## रोपवाटिका विकास कामे

वृक्षलागवडीसाठी उंच, दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण रोपांची उपलब्धता होण्यासाठी; मनरेगा, राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय आराखडा, कॅम्पा विविध योजनांमार्फत रोपवाटिका विकसनाची कामे १ ऑक्टोबर, २०१७ पासून सुरू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

प्रस्तावित ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत वृक्षलागवड आणि त्यानंतरचे संगोपन आणि त्याचबरोबर वन आणि इतर विषयांशी संबंधित कामे करण्यास लोकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे यावे, या दृष्टीने हरित सेनेची स्थापना करण्यात आली आहे. त्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ आणि मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. हरित सेनेंतर्गत नोंदणी जलद गतीने व्हावी म्हणून प्रत्येक कार्यालय, गर्दीची ठिकाणे, यात्रास्थळे, पर्यटनस्थळे, शाळा आणि महाविद्यालये इत्यादी ठिकाणी प्रशिक्षित पथक पाठवून नोंदणी कार्यक्रमास चालना देण्यात आली.

## समन्वय अधिकारी

विविध प्रशासकीय विभागांतर्गत मंत्रालयातील सचिव/उप सचिव दर्जाच्या समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. सचिव (वने) हे दर महिन्याला त्यांच्या सोबत बैठका घेऊन, १३ कोटी वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणीबाबत

आढावा घेत आहेत. प्रशासकीय विभागांचे सचिव यांच्याबरोबर मुख्यत्वेकरून कृषी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि नगरविकास यांच्यासमवेत बैठका घेऊन, त्यांच्याकडे वृक्षलागवडीस वाव असल्याने; लॅण्ड बँकेची माहिती संकलित करण्यात आली.

सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण आणि महाराष्ट्र वन विकास महामंडळ यांच्या अधिकाऱ्यांसमवेत ९ फेब्रुवारी ते २४ मार्च, २०१८ या कालावधीमध्ये विभागीय स्तरावर बैठका आयोजित करून; वृक्षलागवड कार्यक्रमाचे नियोजन आणि तयारीबाबत आढावा घेण्यात आला. त्यानंतर विभागीय आयुक्त (महसूल) यांच्यास्तरावर विविध प्रशासकीय विभागांनी वृक्षलागवडीसाठी केलेली तयारी आणि नियोजनाबाबत ४ ते २५ एप्रिल, २०१८ या कालावधीत सचिव (वने) यांनी बैठका घेऊन आढावा घेतला.

## पुढाकार आणि नेतृत्व

तिसऱ्या टप्प्यात पालकमंत्री, आमदार, खासदार, महापौर, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, नगरपालिकांचे नगराध्यक्ष, तालुका पंचायत समित्यांचे सभापती इत्यादी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका आयुक्त यांच्यासमवेत बैठका आयोजित करण्यात आल्या.

आध्यात्मिक संस्था, उद्योजक, विकासक, रिक्षा आणि मोटार ट्रान्सपोर्ट पदाधिकारी, शिक्षणाधिकारी इत्यादी समाजातील सर्व घटकांना वृक्षलागवडीच्या कार्यक्रमात सामावून घेण्याबाबत वनमंत्र्यांनी बैठका आयोजित केल्या. केंद्र शासनाचे रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग, संरक्षण आणि इतर केंद्र शासनाच्या संस्था आणि कार्यालये यांना वृक्षलागवड कार्यक्रमात सामावून घेण्याबाबत; मंत्रिमहोदयांच्या स्तरावरून विनंती करण्यात आली.

वनमंत्र्यांनी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पालकमंत्री, आमदार, खासदार, महापौर, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, नगरपालिकांचे नगराध्यक्ष, तालुका पंचायत समित्यांचे सभापती यांना पत्र पाठवून; वृक्षलागवड कार्यक्रमामध्ये पुढाकार आणि नेतृत्व द्यावे आणि कार्यक्रम यशस्वी करावा, म्हणून सातत्याने संपर्क ठेवला आहे.

**आयटी प्रणालीचा वापर :** वृक्षलागवड कार्यक्रम पारदर्शकपणे आणि विश्वासार्हतेने जनतेपुढे ठेवण्यासाठी आयटी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली. त्या प्रणालीवर जिओ टॅगिंगसह वृक्षारोपणाच्या स्थळांची माहिती, रोपवाटिका विकसन, तयार करण्यात येत असलेले खड्डे, प्रत्यक्ष वृक्षलागवड कार्यक्रमाचे संनियंत्रण आणि वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण इत्यादीबाबतची माहिती वेळोवेळी भरण्यात येईल.

## जनजागृती

जनतेच्या मनामध्ये हा कार्यक्रम बिंबवण्यासाठी जिल्हानिहाय प्रसिद्धी आणि प्रचार मोहीम हाती घेण्यात आली आहे.

१ मे, २०१८ रोजीच्या ग्राम सभेमध्ये आणि त्यानंतर वेळोवेळी होणाऱ्या ग्रामसभांमध्ये, ग्राम पंचायतींमार्फत राबवण्यात येणाऱ्या वृक्षलागवड कार्यक्रमासंदर्भात ग्रामस्थांसमवेत चर्चा घडवून आणली. जिल्हा नियोजन आणि विकास समितीकडे उपलब्ध असणाऱ्या निधीतून वृक्षलागवड आणि संगोपनासाठी आणि वार्षिक जिल्हा नियोजन आणि विकास निधीतून वृक्षलागवड आणि संगोपन संदर्भातील नावीन्यपूर्ण योजनांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत, वनमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत. आमदार निधीतून वृक्षदिंडी, वृक्षारोपण आणि संगोपन आणि त्यासंबंधित कार्यक्रमांना २५ लाख रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करून देण्याबाबत, त्यांनी आदेश दिले आहेत. वनमंत्री आणि सचिव (वने) हे या कार्यक्रमाचे प्रशासकीय नियोजन आणि तयारी उत्तम रीतीने व्हावी म्हणून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका आयुक्त यांच्याशी सातत्याने संवाद साधत आहेत.



वृक्षारोपणासाठी तयार रोपे



**वृक्ष का लावायचे, ते जगतात का, त्यांचा काय उपयोग अशा नाना शंका मनात ठेवून, सातत्याने यासंबंधी प्रश्न विचारले जातात. परंतु समाजात असेही लोक आहेत, ज्यांनी वृक्षलागवडीचे महत्त्व ओळखले आणि आपापल्या स्तरावर शक्य होईल तसे काम सुरू केले. ही बदललेली मानसिकता वृक्षलागवडीचे एक सुचक्र आहे. हळूहळू पण स्थायी स्वरूपात होणारा हा मानसिक बदल स्वागतार्ह आहे.**

# नावीन्यपूर्ण आणि प्रेरणादायी

## भांडणाची अनोखी शिक्षा

**औरंगाबाद** जिल्ह्यातील पैठणखेडा गावची ही गोष्ट .... या गावात घुले आणि घुंगार्डे यांची शेती आहे. शेताच्या मालकी हक्कातून त्यांची नेहमी भांडणे होत असत. एक दिवस तर भांडण पराकोटीला गेले. घुंगार्डे यांनी शेतातली बोराची झाडे तोडली. त्याचा घुगे यांना प्रचंड राग आला. त्यातून दोन्ही गटात तुंबळ हाणामारी झाली. भांडण थेट पोलीस ठाण्यात पोहोचले. दोन्ही गटाविरोधात तक्रारीही दाखल झाल्या. न्यायालयापर्यंत वाद पोहोचला. तब्बल दोन वर्षे खटल्याचे काम सुरू होते. त्यात दोन्ही गट दोषीसुद्धा सिद्ध झाले. मात्र दोन्ही गटातल्या सातही आरोपींचा हा पहिलाच गुन्हा असल्याने न्यायालयाने त्यांना शिक्षा दिली ती झाडे लावण्याची. या आरोपींना गावात येणाऱ्या मुख्य रस्त्यावर डाव्या आणि उजव्या बाजूला लिंबाची आणि वडाची झाडे लावण्याची शिक्षा न्यायालयाने सुनावली. आरोपींना झाडे लावण्याचे आणि त्यांचे संगोपन करण्याचेही आदेश न्यायालयाने दिलेत. तसेच पोलिसांना या सगळ्याचा अहवाल प्रत्येक ६ महिन्याला न्यायालयात सादर करण्याचेही आदेश दिले. या प्रकरणात पोलिसांना आरोपींच्या वर्तनावर, तसेच हे आरोपी झाडे लावून त्यांची निगा राखत असल्याबाबत लक्ष ठेवायचे होते. न्यायालयाच्या आदेशाचे पालन न केल्यास आरोपींसाठी ३ वर्षांची शिक्षेची तरतूदही न्यायालयाने केली आहे. जी झाडे तोडल्यामुळे भांडणे उद्‌भवली. त्याच झाडांची सेवा करण्याची अनोखी शिक्षा म्हणजे न्यायालयाच्या माध्यमातून निसर्गाने केलेला न्यायच जणू..

**विशाल करोळे**, झी मीडीया, औरंगाबाद



## शुभ मंगल..... समाजभान

**पर्यावरण** वाचवा, स्वच्छता राखा, बेटी बचाओ-बेटी पढाओ यासारखे सामाजिक संदेश आणि लग्नपत्रिकेवर? होय, बोहल्यावर चढणारे अनेक वधू-वर समाजभान दाखवत आहेत. आपल्या लग्नपत्रिकांमध्ये लग्नाच्या आमंत्रणाबरोबरच एखादा सामाजिक संदेशही आवर्जून छापला जातोय.

बेटी बचाओ बेटी पढाओ, स्वच्छ भारत अभियानात सहभागी व्हा, पर्यावरण वाचवा अशा प्रकारचे सामाजिक संदेशही आवर्जून दिले जाऊ लागले आहेत.

शहरी भागाच्या तुलनेत विशेषतः ग्रामीण भागांत याचे प्रमाण जास्त दिसून येतेय. संदेशाबरोबर काही वेळा त्या उद्देशासाठी काम करणाऱ्या संस्थेचे नावही दिलेले असते. आहेरापोटी येणारी रक्कम त्या सामाजिक संस्थेला दिली जाते. हळूहळू हे प्रमाण वाढतेय. मुंबईत दादर, गिरगाव, बोरिवली या भागांमध्ये अशा या लग्नपत्रिका तयार करून मिळतात. अशा प्रकारच्या लग्नपत्रिकांचे हजारो नमुने याठिकाणी बघायला मिळतात. सध्या पेपरमध्ये वेल्वेट आणि मेटॅलिक प्रकार लोकप्रिय आहेत. कधी पर्यावरण वाचवा असे लिहिलेले झाडाचे डिझाईन तयार केले जाते, तर कधी वधूच्या चित्राखाली 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' असा संदेश देण्यात येतो. अशा प्रकारे पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न होताना दिसतोय.

**मृण्मयी नातू**, झी मीडीया, औरंगाबाद

## जंगलात विवाहसोहळा

**बीडमधील** सिद्धार्थ सोनावणे आणि सृष्टी सोनावणे हे दोघेही प्राणी व पक्षीप्रेमी. त्यांच्या विवाहाला लग्नमंडप, ढोल-ताशे काहीही नव्हते. हा विवाहसोहळा चक्क जंगलामध्ये पार पडला. विवाहाच्या दिवशी त्यांनी सुमारे १२५ झाडे लावली. अक्षता म्हणून त्यांनी दुर्मीळ होत चाललेल्या वनस्पतींच्या बियांचे वाटप केले. जोडप्याने कुठलाही आहेर न घेता वऱ्हाडींना वड, पिंपळाची रोपटी भेट म्हणून दिली. वधू-वरांनी पुष्पहाराऐवजी अजगर आणि धामण गळ्यात घातले होते. काहीतरी जगावेगळे केले की, लोकांचे लक्ष वेधून घेता येते. त्यामुळे या माध्यमातून नागरिकांचे लक्ष वेधून, वन्यजीवांविषयी लोकांच्या मनात आपुलकी निर्माण व्हावी हा त्यांचा उद्देश होता. लोकांच्या मनातील सापांविषयीची भीती दूर व्हावी, त्यांना ठार मारू नये यासाठी जनजागृती करण्याचा हा प्रयत्न होता, असे सिद्धार्थ सांगतो.



**सिद्धार्थ व सृष्टी सोनावणे यांचा अनोखा विवाहसोहळा.**

आनंदवन मित्र मंडळातर्फे काही विवाहसोहळ्यांमध्ये, त्या कुटुंबांच्या परवानगीने आनंदवनात तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीचे स्टॉल्स लावले जातात. लग्नाला येणाऱ्या मंडळीना आनंदवन, लोकबिरादरी प्रकल्प, तेथे सुरू असलेल्या कार्याची माहिती दिली जाते. एका जोडप्याने आणि त्यांच्या कुटुंबीयांनी विवाहापूर्वी लोकबिरादरी प्रकल्पाला भेट




दिली होती. तेथे सुरू असलेल्या समाजकार्याची माहिती त्यांनी घेतली. त्यानंतर, लग्नामध्ये येणाऱ्या आहेराची रकम या प्रकल्पाला देण्यात येईल, असा स्पष्ट उल्लेख त्यांनी त्यांच्या लग्नपत्रिकेत केला. त्यानुसार विवाहसोहळ्यानंतर त्यांनी ५ लाख रूपये लोकबिरादरी प्रकल्पाला देणगी म्हणून दिले.

शास्त्रीय गायिका स्वरांगी मराठे आणि तिचा पती निखिल काळे यांनी लग्नसोहळ्यामधील वायफळ खर्च टाळून तो पैसा समाजोपयोगी कामासाठी नक्कीच देता येऊ शकतो, असे निदर्शनास आणले. सध्या अशी खूप उदाहरणे पाहायला मिळताहेत. सोशल मिडियामुळे याबाबत जागरूकता वाढते आहे.

## आमचाही खारीचा वाटा...

■ **कोल्हापूरमधील** डॉक्टर, व्यावसायिक, नोकरदार आणि विद्यार्थी यांनी ग्रीन व्हीजन व्हॉटस्‌ॲप ग्रुप तयार करून वृक्षलागवड उपक्रम सुरू केला आहे. पर्यावरणाचे महत्त्व घेऊन काही घरांमध्ये एसी कमीत कमी वापरला जाईल याचा प्रयत्न केला जात आहे.

■ 'ट्री गणेशा' ही संकल्पना मुंबईमध्ये गणेशोत्सव काळामध्ये अमलात आणली गेली.

■ पुण्यामधील तळजाई टेकडीवर ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन वृक्षलागवड केली. प्रत्येकी एक झाड दत्तक घेऊन त्याचे संगोपन केले जात आहे.

■ दशक्रिया विधीच्या वेळी आपल्या प्रिय व्यक्तीचे स्मरण झाडे लावून सतत ठेवण्याबाबत संगमनेर तालुक्यातील एका गावाने नुकताच निर्णय घेतला आहे.

■ काळदरी (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील गावाने प्रत्येक घरात परसबाग निर्माण करण्याचा ठराव मंजूर केला आहे.

■ गुरुपौर्णिमेनिमित्त केडगाव (जि. अहमदनगर) येथील सिद्ध समाधी योगच्या साधकांनी गुरुदक्षिणा म्हणून टेकडीवर २४० रोपे लावली.

■ दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने शिंदेवाडी (ता. हवेली, जि. पुणे) गावाने 'लक्ष्मीतरू' या झाडाचे वृक्षारोपण केले.

■ महागड्या लग्नपत्रिका कागदावर छापून जंगलाचा नाश टाळण्यासाठी हातरुमालावर लग्नपत्रिका छापण्याचा उपक्रम जातेगाव (ता. शिरुर, जि. पुणे) येथील पर्यावरणप्रेमी श्री. दिगंबर कामठे यांनी गेल्या डिसेंबरमध्ये केला.

■ डहाणू येथील वन गुन्हेगारांना अवैध वृक्षतोड प्रकरणात न्यायालयाने नुकतीच शिक्षा दिली आहे. त्यानुसार १ वर्ष जेल, ५० हजार रुपये दंड व प्रत्येक आरोपीने किमान १५ झाडे जेल किंवा शेतीमध्ये लावून ती जगवावित, अशी शिक्षा दिली आहे.

■ मढ (ता. जुन्नर, जि. पुणे) येथे वृक्षमित्र कट्टा तयार करून त्यामार्फत झाडांची लागवड केली जाते.

■ अंबरनाथ येथील मॉर्निंग वॉक करणारे लोक फेकून दिलेल्या बाटल्या गोळा करतात. त्यात पाणी भरून आजूबाजूच्या झाडांना घालतात आणि त्यातून वृक्ष वाढवतात.

■ मांजरी ग्रामपंचायत (ता. हवेली, जि. पुणे) येथे घरांच्या नोंदणीसाठी निधी नको, झाडे द्या अशी नावीन्यपूर्ण योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. या संकल्पनेमुळे गावातील वृक्षराजींची संख्या वाढून सुंदर, स्वच्छ व हरितग्राम म्हणून गावाला नवीन ओळख मिळत आहे.

■ हिंजेवाडीतील आयटी व्यावसायिक अधिक स्वच्छ, हिरवेगार आणि उत्साही जीवन जगण्यासाठी, रस्त्याच्या कडेला आणि जंगलाच्या क्षेत्रावर झाडे लावणार आहेत. प्रत्येक आठवड्याच्या शनिवार आणि रविवारी, प्रत्येक गावासाठी एक तास हे आयटी तंत्रज्ञ गावांच्या लोकांसोबत काम करतील.



ट्री गणेशा

■ झाडे लावा, झाडे जगवा.. पाणी वाचवा, मुली वाचवा हा दिव्य संदेश देत सोलापूर जिल्हा न्यायालयात कार्यरत असणारे लिपिक सुनील पवार यांनी, सायकलवर १२ मे २०१८ पासून राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये फिरत; १०५१ कि.मी चा प्रवास केला. त्यासाठी त्यांनी १६ हजार रुपयांची सायकल विकत घेतली. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये घर चालवण्याची संपूर्ण जबाबदारी सुनील पवार यांच्यावर होती. घरच्या सर्व समस्या सोडवत त्यांनी समाजासाठी वेळ दिला. आपल्यावर समाजाची जबाबदारी आहे हे भान ठेवून; 'मुली वाचवा, झाडे लावा व पाणी वाचवा' असा संदेश देण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामधून सायकल प्रवास सुरू झाला.

**गेल्या ४ वर्षात वनविभागाने अनेक नावीन्यपूर्ण योजना कार्यान्वित केल्या, काही महत्त्वाचे निर्णय घेतले. त्याअनुषंगाने विविध वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राज्यात ठिकठिकाणी राबवण्यात येत आहेत.**

# नवे उपक्रम, नवी दिशा

## बोटॅनिकल गार्डन, विसापूर, चंद्रपूर



■ **नॅशनल** बोटॅनिकल रिसर्च इन्स्टिट्यूट, लखनौ आणि बोटॅनिकल गार्डन, बंगळुरू यांच्या धर्तीवर विसापूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॉटनिकल गार्डन विकसित करण्यात येत आहे. ■ ताडोबा व्याघ्र प्रकल्पास भेट देणारे पर्यटक या वनस्पती उद्यानास आवर्जून भेट देतील असे अपेक्षित आहे. ■ या प्रकल्पांतर्गत बोटॅनिकल गार्डन, कन्झर्वेशन झोन आणि रिक्रिएशन झोन अशा ३ विभागांमध्ये उद्यान विकसित केले जाणार आहे. नॅशनल बोटॅनिकल रिसर्च इन्स्टिट्यूट, लखनौ यांच्यामार्फत देखील काही कामे केली जाणार आहेत. ■ योजनेंतर्गत विविध घटकांची कामे प्रगतिपथावर आहेत. ■ वन / वनेत्तर क्षेत्रातील जैविक साठा जतन करणे.

■ वन/ वनेतर क्षेत्रातील दुर्मीळ, अस्तित्व धोक्यात आलेल्या वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव इ.चे कमी झालेले प्रमाण वाढवण्यासाठी तसेच पूर्ववत करण्यासाठी उपाययोजना करणे.■ दुर्मीळ व धोकाग्रस्त प्राणी, वनस्पतींचे भविष्यातील पिढ्यांसाठी संरक्षण व संवर्धन करणे.■ जनसामान्यांना जैवविविधतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी जनजागृती करणे.
■ निसर्ग संवर्धन आणि पर्यावरण शिक्षण कार्यक्रम परिणामकारकरीत्या करणे.
■ स्थानिक लोकांसाठी रोजगार निर्मिती करणे इत्यादी फायदे होणार आहेत.

## कौशल्य विकास विद्यापीठ



**चंद्रपूर** येथे वनाधारित रोजगाराचे प्रशिक्षण देणारे कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासंबंधी जागेचा तसेच रोजगारसंधी असलेल्या क्षेत्रांची निश्चिती करून प्रशिक्षण देण्यासाठीचा अभ्यासक्रम तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. वनक्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात रोजगार संधी दडल्या आहेत. तेंदूपत्ता, मधुमक्षिका पालन, मध, डिंक गोळा किंवा मोहफुले गोळा करणे, वनौषधींचे संकलन आणि त्यावरील प्रक्रिया, इको टुरिझम, वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाचे क्षेत्र अशा प्रत्येक क्षेत्रात रोजगार संधी दडल्या आहेत. त्या साध्य करण्यासाठी आवश्यक कौशल्य स्थानिकांमध्ये निर्माण करणे, त्या माध्यमातून त्यांना स्वंयरोजगारासाठी प्रोत्साहित करणे आणि पर्यायाने त्यांच्या उत्पन्नात वाढ करून; जीवनमानात बदल घडवून आणणे हा उद्देश आहे. मोहफुले, बांबूला वन विभागाच्या वाहतूक परवान्यातून मुक्त करण्यात आले आहे. राज्यात बांबू आधारित उद्योगातूनच हजारो हातांना काम मिळू शकतो. राज्यात निसर्ग पर्यटन मंडळाच्या माध्यमातून जवळपास ३२० निसर्ग पर्यटनस्थळे विकसित होत आहेत. वनेतर क्षेत्रातील पाणथळे, सरोवरे यांसारख्या ठिकाणची जैवविविधता जपण्यासाठी ६ स्थळांची निवड करण्यात आली आहे.

# बांबू उद्योग

**पारंपरिक** अभ्यासक्रमाला व्यवसाय अभ्यासक्रमाची जोड मिळाली तर स्वयंरोजगाराच्या वाटा अधिक प्रशस्त होत जातात. हेच लक्षात घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या तीन विद्यापीठांत १ ऑगस्ट २०१८ रोजी बांबू हॅण्डिक्राफ्ट ॲण्ड आर्ट युनिट सुरू करण्यात येणार आहेत.



बांबूपासून तयार होणाऱ्या विविध वस्तू, जागतिक पातळीवरील त्याचे स्वरूप, बाजारपेठ या सर्व गोष्टी लक्षात घेऊन या केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. उत्पादन ते बाजारपेठ अशी साखळी विकसित करताना बाजारपेठ संशोधनावर जसा भर देण्यात येणार आहे तसाच तो स्वयंरोजगारासाठी लागणाऱ्या अर्थसाहाय्यावरदेखील. प्रधानमंत्री मुद्रा योजनेशी याची सांगड घालून स्वयंरोजगारासाठी लागणारे अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल. या तीन केंद्राना चंद्रपूर येथील बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र तसेच संपूर्ण बांबू केंद्राकडून सहकार्य करण्यात येणार आहे. कौशल्य विकास विभागाकडून या तीन केंद्रांमध्ये द्यावयाच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम निश्चित करण्यात येत आहे. विद्यापीठ परिसर हा रोजगार निर्मितीचे माध्यम झाला पाहिजे ही या मागची भूमिका आहे. बांबूचे महत्त्व लक्षात घेऊन; बांबूच्या प्रजाती, त्याचा उपयोग आणि त्यापासून होणाऱ्या विविध वस्तू यांची माहिती देणारी एक बांबू डिक्शनरी तयार करण्याच्या सूचना बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राला देण्यात आल्या आहेत. या केंद्राचा विकास आराखडा तयार होत आहे. केंद्र शासनाने नुकतेच बांबू मिशनसाठी १२९० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. यातील अधिकाधिक निधी महाराष्ट्राला मिळेल या दृष्टीने वन विभाग प्रयत्न करत आहे.

## बुरुडांना साहाय्य

■ बुरुड या गरीब आणि आदिवासी प्रवर्गातील लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध.■ प्रतिकुटुंब प्रतिवर्षी १५०० बांबू पुरवणे व त्यास स्वामित्व शुल्कातून संपूर्ण सूट. ■ या कुटुंबियांना नोंदणीसाठी लोकहक्क कायद्यांतर्गत ऑनलाइन नोंदणीसाठी सुविधा. अर्ज केल्यापासून १५ दिवसात सेवा उपलब्ध करण्याचे शासनावर बंधन. आतापर्यंत ४२२ कुटुंबांची नोंदणी. ■ बांबूपासून अधिक नावीन्यपूर्ण साहित्य, सामग्री, वस्तू तयार करण्यास प्रोत्साहन. ■ सामाजिक आणि आर्थिक उन्नती आणि उपजीविकेचे मोठे साधन या निर्णयामुळे उपलब्ध.

# बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली

■ **आंतरराष्ट्रीय** दर्जाचे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली येथे स्थापन करण्यात येत आहे. ■ टाटा ट्रस्टबरोबर ५ जानेवारी, २०१७ रोजी बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रांतर्गत आधुनिक संकुल स्थापन करण्याबाबत सामंजस्य करार. ■ विविध पर्यावरणपूरक इमारतींचे बांधकाम सुरू. ■ बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्था तसेच आयआयटी मुंबई यांच्यामध्ये सामंजस्य करार. ■ शास्त्रोक्त पद्धतीने बांबू लागवड व औद्योगिक वापरासाठी प्रशिक्षण व प्रसार केला जाईल. ■ बांबूवर आधारित उद्योगांना चालना देणे व बांबूचा मूल्यवर्धित उपयोग वाढवणे. ■ बांबू वस्तू तयार करण्याकरिता चंद्रपूर जिल्ह्यामध्ये बचतगटातील २०० महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. त्या स्वयंरोजगाराकडे वळल्या आहेत. ■ नजीकच्या काळात चंद्रपूर जिल्ह्यातील १००० बचतगट महिलांना तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील ५०० बचतगट महिलांना प्रशिक्षण व स्वयंरोजगार देण्याचा प्रस्ताव प्रक्रियेखाली आहे. ■ अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त बांबू शेतीकरिता बांबूच्या विविध ६३ प्रजातीचे बांबू रोपवन चिचपल्ली येथे ४ हेक्टरमध्ये प्रस्तावित. ■ बांबू वस्तूंच्या विक्री व प्रसाराकरिता ऑनलाइन मार्केटिंगकरिता फ्लिपकार्ट, ॲमेझॉन यांच्याशी सल्लामसलत. आयकेई-इंटेरिअर डेकॉरेटर या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीसोबत सहकार्याबाबत चर्चा सुरू. ■ बांबूवर आधारित मान्यता प्राप्त अभ्यासक्रम सुरू. उदा. बांबू प्रोसेसिंग, बांबू हॅण्डीक्राफ्ट वस्तू निर्मिती, बांबू टर्निंग प्रोडक्ट आणि बांबू फाइन प्रोडक्ट.



**बांबूपासून बनवलेल्या वस्तू**



# उपवनांची निर्मिती

**राज्यात** प्रत्येक जिल्ह्यात दोन या पद्धतीने ६८ वन उद्यानांची निर्मिती होत आहे. या वनांना स्व. उत्तमराव पाटील वन उद्यान या नावाने संबोधले जाणार आहे. या वनांमधून फळवन, चंपकवन, कदंबवन, अशोकवन, आम्रवन, जंबुवन, वंशवन, मदन वृक्षवन, चरकवन, लतावन, सारिकावन मगृसंचारवन, अतितिवन यांसारखी विविध प्रकारची वने साकारत आहेत. प्रिय व्यक्तीच्या नावे वृक्षारोपण करून; उद्यानांमधून स्मृतिवनेही निर्माण केली जात आहेत. निरनिराळ्या वृक्षप्रजातींचे समूह निर्माण करण्यासाठी उद्यानात वेगवेगळी उपवने निर्माण करण्याला प्रोत्साहन देण्यात आले आहे. या माध्यमातून दुर्मीळ, औषधी आणि सुंदर वृक्षप्रजातीचे जतन आणि संवर्धन होत आहे. शहरांमधील नागरिकांमध्ये विशेषत: विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रजाती आणि वन्यजीवांविषयी आस्था निर्माण व्हावी, त्यांचे या गोष्टींकडे लक्ष आकर्षित व्हावे यासाठी त्यांना या उद्यानात अभ्यासाबरोबर क्रीडा-व्यायाम आणि मनोरंजनाची साधने उपलब्ध करून दिली जात आहेत. वृक्ष-लतांचे महत्त्व आणि उपयोगिता सांगणारे पुस्तक संग्रहालय निर्माण करण्याचे व त्याद्वारे या सर्व माहितीचा प्रचार आणि प्रसार करण्याचेही यात नियोजित आहे. अशी विविध प्रकारच्या वृक्ष प्रजातींची वने निर्माण केल्यास भावी पिढीला आपण सुरक्षित आणि संपन्न वृक्षप्रजातींचा ठेवा देऊ शकू. हा या विविध वनांच्या निर्मितीमागील उद्देश आहे.

| जिल्हा | वन उद्यानाचे स्थळ | जिल्हा | वन उद्यानाचे स्थळ |
|---|---|---|---|
| ठाणे | माजिवडा (ठाणे) कानविंदे (शहापूर) | रायगड | कार्लेखिंड, चौले, ता. अलिबाग |
| पालघर | टेन, पापडखिंड | पुणे | नऱ्हे आंबेगाव (हवेली), रामलिंग (शिरूर) |
| सोलापूर | कुंभारी, मळोली | सातारा | गुरेघर महाबळेश्वर, पारगांव-खंडाळा |
| सांगली | बोलावड, खांबले | कोल्हापूर | कागल, पेठवडगाव |
| सिंधुदुर्ग | रानबामबुली, मुलडे | रत्नागिरी | चिखली, खानु |
| नाशिक | पारेगाव (चांदवड) मानिकपुंज (नांदगाव), कंदाणे (मालेगाव) | अहमदनगर | नांदुरशी, आठवड |
| धुळे | जामखेल (साक्री), जखाणे | नंदूरबार | कोठडा, होळ तर्फे हवेली |
| जळगाव | कुंभारखोरी, बिलाखेड | औरंगाबाद | पाथ्री (फुलंब्री) |
| जालना | वनसंरक्षक प्रशिक्षण विद्यालय जालना, दहीपुरी (अंबड) | परभणी | मानकेश्वर (जिंतूर) गंगाखेड |
| हिंगोली | एआरपीएफ क्षेत्र हिंगोली, पोतरा (कळमनुरी) | बीड | नारायणगड (बीड), साक्षाळपिंप्री, सेलू आंबा (अंबाजोगाई) |
| लातूर | तांबरवाडी(औसा), नागझरी | उस्मानाबाद | तीर्थ(तुळजापूर),ढोकी (उस्मानाबाद) |
| नांदेड | बोंडार (नांदेड), वडेपुरी (लोहा) | अमरावती | उपातखेडा (अचलपूर), मदलाबाद (अमरावती) |
| बुलढाणा | पिंपळखुटा (सिंदखेडराजा), जनुना (खामगाव) | यवतमाळ | आंबवन (उमरखेड), जोधळणी (कळंब) |
| अकोला | वाशिबां (अकोला), कुरुम (मुर्तिजापूर) | वाशिम | तपोवन (मालेगाव), रामनगर (कारंजा) |
| नागपूर | वेणा(नमजी) कळमेश्वर | वर्धा | एमआयडीसी वर्धा, राजणी (कारंजा) |
| भंडारा | डोंगरला (तुमसर), | गोंदिया | गराडा (तिरोडा), कुडवा (गोंदिया) नवाटोला (देवरी), अर्जुनी मोरगाव |
| चंद्रपूर | चंद्रपूर, गोणाडा, गोंडपिंपरी | गडचिरोली | धानोरा (गडचिरोली) |

# समर्थ हरित सेना

**वृक्षारोपणाच्या** कार्यक्रमात अधिकाधिक लोकसहभाग वाढावा, त्याचे लोकचळवळीत रूपांतर व्हावे म्हणून वन विभागाने महाराष्ट्र हरित सेना स्थापन करण्याचे निश्चित केले. राज्यभरातून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यात ५० लाख १२ हजार ७६६ हरित सेनेची फौज हरित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी सज्ज झाली असून यामध्ये वैयक्तिक नोंदणीसह संस्थात्मक नोंदणीचाही समावेश आहे.

नोंदणी झालेल्या हरित सैनिकांमध्ये १९ लाख ८८ हजार ९३८ वैयक्तिक हरित सैनिक आहेत तर ३० लाख २३ हजार ८२८ हरित सैनिक हे संस्थात्मक स्वरूपातून सदस्य झाले आहेत.

### अग्रेसर मराठवाडा

पाणी टंचाईच्या झळा सोसणाऱ्या मराठवाड्याने हरित सैनिकाच्या नोंदणीत पुढाकार घेतला आहे. लातूर जिल्हा, राज्यात अग्रस्थानी असून, जिल्ह्यात आतापर्यंत ५ लाख १५ हजार २७० जणांनी ग्रीन आर्मीचे सदस्यत्व स्वीकारले आहे. त्यापाठोपाठ उस्मानाबाद दुसऱ्या क्रमांकावर आहे. जिल्ह्यात ४ लाख १ हजार १०५ जणांनी हरित सैनिकांचे सदस्यत्व स्वीकारले आहे. तिसऱ्या क्रमांकावर बीड जिल्हा आहे. येथे ३ लाख ५५ हजार ५७१ हरित सैनिक आहेत. हरित सैनिकांच्या नोंदणीत पहिले तीनही जिल्हे मराठवाड्यातील आहेत. हरित सैनिकांच्या नोंदणीमध्ये नाशिक २ लाख ७९ हजार १११ हरित सैनिकांसह चौथ्या स्थानावर आहे तर २ लाख ३६ हजार ३०४ नोंदणीसह चंद्रपूर राज्यात पाचव्या स्थानावर आहे.

या स्वयंसेवकांची भूमिका स्पष्ट करताना, त्यांचा सहभाग अपेक्षित असलेली क्षेत्रे निश्चित करून दिली आहेत. जसे वृक्षलागवड, वृक्षदिंडी, वनांच्या संरक्षणाकरिता सामूहिक गस्त, वणव्याच्या हंगामात वनवणवा विझवण्याच्या कामात प्रत्यक्ष सहभाग, वन्यप्राण्यांच्या गणनेत सहभाग, वन विभागामार्फत साजऱ्या केल्या जाणाऱ्या वसुंधरा दिन, पर्यावरण दिन, जागतिक वन दिन यासारख्या दिनविशेषांच्या कार्यक्रमात, वनमहोत्सव, वन्यजीव सप्ताहानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात हरित सेनेच्या सदस्यांना सहभागी होता येते. हरित सेनेच्या संकेतस्थळाला भेट दिल्यानंतर या सर्व विषयांची सविस्तर माहिती मिळते. या ठिकाणी वन विभागाची दिनदर्शिका देण्यात आली आहे. याप्रमाणे हरित सेनेचे सदस्य कार्यक्रम घेऊन, पर्यावरण-वन रक्षणात आणि संवर्धनात आपले योगदान देवू शकतात.

या चळवळीत सहभागी होण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध आहे. त्यासाठी http://www.greenarmy.mahaforest.gov.in व http://www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करता येईल.

# टेकड्या करू हिरव्यागार

**रस्त्याच्या** दुतर्फा असलेल्या छोट्यामोठ्या टेकड्यांवर स्वयंसेवी संस्थाकडून सीड बॉल टाकण्यात येत आहेत. शालेय विद्यार्थी टेकड्यांवर जाऊन बीजारोपण करत आहेत. पावसाळ्यात रोपे लावत आहेत. वनविभाग यात मागे नाही. वनविभागाच्या ताब्यातील बारा टेकड्यांवर वृक्षारोपण करण्यात आले आहे. यामध्ये अहमदनगर-इसळक, नाशिक-औंढा, कोल्हापूर- धोंडेवाडी, पुणे- रेटवाडी-मलठण, औरंगाबाद- लंगडातांडा, बीड-गवळवाडी, ठाणे- रायता, रायगड- गालसुरे-कार्ले, नागपूर- वेणा निमजी, गोंदिया- लाहोरा-सुब्रातोला, वर्धा- पिंपरी मेघे या १२ स्थळांचा समावेश आहे. वृक्षलागवडीसोबतच रोपांचे संरक्षण आणि संगोपन केले जाणार आहे. २०१५-१६ साली या कामाला सुरुवात झाली असून, २०२० पर्यंत या १२ टेकड्यांवर हिरवीकंच वनराई फुलून आलेली दिसेल. यामुळे भूसंवर्धनाबरोबर जलसंधारणाच्या कामास वेग देणे शक्य होईल. शासकीय आणि निमशासकीय जमिनीवर होणारे अतिक्रमण थांबण्यास मदत होत आहे.



वृक्षलागवडीसोबतच वन विभागाच्या मालकीच्या जमिनीबरोबर, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड केली जात आहे, शेतबांध, सार्वजनिक मोकळ्या जागा, शाळा- महाविद्यालय परिसर, गावठाणे, रेल्वे- संरक्षण मंत्रालयाच्या जागा अशा वन आणि वनेतर जागांवर ही वृक्षलागवड होत आहे.

टेकड्यांवर वृक्ष वाढले तर माथा ते पायथा पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यास मदत होते. शिवाय विविध प्रजातींचे वृक्ष टेकड्यांवर लावल्याने ते वाढल्यानंतर वन्यजीव तसेच पक्षांना नैसर्गिक अधिवास मिळू शकतो. यातून त्यांच्यासाठी असलेली अन्नसाखळी विकसित होण्यास मदत होते. पर्यावरण संतुलनात वाढते. हरितक्षेत्र मोलाची भूमिका बजावते. यंदा निधीच्या उपलब्धतेनुसार यावर्षी आणखी काही टेकड्यांवर वृक्षलागवड करण्यात येणार आहे.

# निसर्ग पर्यटन स्थळे

८ डिसेंबर २०१५ रोजी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना करण्यात आल्यानंतर, ३२० स्थळांची निवड करण्यात आली. त्यापैकी ११६ स्थळांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास महामंडळाच्या कार्यकारी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. राज्यात वनक्षेत्रालगत असलेल्या निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास करणे, त्या माध्यमातून स्थानिक लोकांसाठी रोजगार निर्मिती करून त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करणे, पर्यटनस्थळाच्या ठिकाणी निसर्गाचे कोणतेही नुकसान होणार नाही, याची काळजी घेत पर्यटकांसाठी सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम; मागील दोन वर्षांपासून या मंडळामार्फत केले जात आहे. या ठिकाणच्या विकास कामांसाठी राज्य पर्यटन विकास निधीमधून अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे.



चिखलदऱ्यातील वनपर्यटन

या स्थळांपैकी वन्यजीवांकरिता संरक्षित क्षेत्रसुद्धा महत्त्वाचे आहे. राज्यात ६ व्याघ्र प्रकल्प, ६ राष्ट्रीय उद्याने, ४८ अभयारण्ये आणि ६ संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत. त्यापैकी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली, मुंबईचा आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याचे नियोजित आहे. याशिवाय मेळघाट व्याघ्र प्रकल्प, (अमरावती) येथे पर्यटकांना सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. वन्यजीवांकरिता असलेल्या संरक्षित वनक्षेत्राशिवाय या भागात येणारे किल्ले, काही देवस्थाने, पाणस्थळे व जैवविविधता संवर्धन उद्याने यांचा निसर्ग पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्यात येत आहे. जैवविविधता संवर्धन उद्यानांमध्ये विसापूर उद्यानाकरिता ४० कोटी रुपयांचा निधी २०१७–१८ करिता नियोजित करण्यात आला आहे. पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर येथे महादेव वनाची महत्त्वाकांक्षी योजना तयार करण्यात आली आहे.

# जलयुक्त वन शिवार

**वन** विभागामार्फत जलयुक्त शिवार अभियानामध्ये मागील तीन वर्षांपासून मोठ्या प्रमाणात कामे करण्यात आल्याने, वनातील जलव्याप्त क्षेत्रात ४३२ चौ.कि.मीची भरीव वाढ झाली आहे. याची नोंद भारतीय वन सर्वेक्षण अहवाल २०१७ मध्ये घेण्यात आली आहे. २०१५ च्या भारतीय वन स्थिती अहवालात एकूण जलव्याप्त क्षेत्र १११६ चौ कि.मी होते ते २०१७ मध्ये १५४८ चौ.कि.मी इतके झाले आहे. जलव्याप्त क्षेत्रातील ही वाढ ४३२ चौ कि.मी इतकी आहे. जलयुक्त शिवार, जलसंधारणाच्या हाती घेतलेल्या कामांमुळे ही वाढ शक्य झाली. यासोबतच जलयुक्त वन कार्यक्रमास वनविभागाने गती दिली आहे त्याचे हे फलित आहे. २०१४–१५ ते २०१६–१७ या मागील तीन वर्षात विभागाने ३३ हजार ७४७ कामे मंजूर केल्याचे व त्यापैकी २८ हजार ७४१ कामे पूर्ण झाली आहेत. पावसाचे पाणी जास्तीत जास्त अडवून ते जमिनीत मुरवणे, भूजल पातळीत वाढ करणे, लोकसहभागातून जलस्रोताचा पाणीसाठा वाढवणे, लोकांमध्ये पाणी वापराबद्दलची जनजागृती करणे; असे अनेक आयाम नजरेसमोर ठेवून जलयुक्त शिवार योजनेची कामे करण्यात येत आहेत. वनविभाग यात मागे नाही. या विभागाने आतापर्यंत नालाबांध, वन तलाव, सीसीटी बांध, गॅबियन बंधारे, खोदतळे, सिमेंट बंधारे, लूज बोल्डर स्ट्रक्चर, जल शोषक खड्डे यासारखी कामे जलयुक्त शिवार कार्यक्रमातून घेतली आहेत. वनविभागाने २०१४–१५ मध्ये ५२०१ कामे मंजूर केली होती. त्यापैकी ४३७६ कामे पूर्ण झाली आहेत. यावर साधारणत: ७५ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. २०१५–१६ मध्ये विभागाने १४ हजार ६३५ कामे मंजूर केली आहेत. त्यापैकी १२ हजार ७६५ कामे पूर्ण झाली आहेत. यासाठी साधारणत: २०२ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. २०१६–१७ साली या विभागाने १३ हजार ९११ कामे मंजूर केली होती. त्यापैकी ११ हजार ६०० कामे पूर्ण झाली आहेत. यावर अंदाजे १९२ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. वनविभागाने जलयुक्त शिवार कार्यक्रमात पुढाकार घेऊन, मोठ्या प्रमाणात कामे केल्याबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत; सलग दोनदा विभागाच्या अभिनंदनाचा ठराव पारित केला आहे.



# चिमणी संवर्धन प्रकल्प

**बदलत्या** परिस्थितीमध्ये आणि विशेषत: हवामानामध्ये होणारा व्यापक बदल, झाडांची कमी होत चाललेली संख्या, चिमण्यांना घरटी बांधण्यासाठी नैसर्गिक जागांचा अभाव आणि जैवविविधता संवर्धनामध्ये येणाऱ्या अडचणी पाहता चिमण्यांचे अस्तित्व गावांतून आणि शहरांतून झपाट्याने कमी होत



असल्याचे दिसते. पर्यावरण संतुलनासाठी चिमण्यांचे अस्तित्व महत्त्वाचे असून, त्यांची कमी होणारी संख्या हे मोठे आव्हान पर्यावरण आणि जैवविविधतेच्या सुरक्षिततेमध्ये आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेऊन, प्रायोगिक तत्त्वावर शासनाने चिमणी संवर्धन प्रकल्प राज्यातील पुणे आणि ठाणे या ठिकाणी घेण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी रु. २२ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

# स्वागत झाडाच्या रोपाने

**निसर्ग** सौंदर्य व संपदेचे रक्षण व्हावे यासाठी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्याऐवजी, झाडाचे रोप किंवा पुस्तके देऊन सन्माननीय व्यक्तींचे स्वागत करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे वनक्षेत्र वाढण्यास हातभार लागेल. तसेच पर्यावरण आणि वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी जनजागृती होण्यास मदत होणार आहे. या योजनेचे अनुकरण इतर अनेक प्रशासकीय विभागांनी केले असून वनविभाग या योजनेचा अग्रगण्य विभाग ठरला आहे.



व्याघ्रदूत म्हणून निवड झाल्यानंतर वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासमवेत ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन.

# वाघ वाढले

**महाराष्ट्र** राज्याचे व्याघ्रदूत म्हणून विख्यात अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या माध्यमातून व्याघ्र संवर्धनासाठी प्रचार, प्रसार मोहीम राबवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्या दृष्टीने आतापर्यंत वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत.

भारत सरकारच्या राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने, मॅनेजमेंट इफेक्टिव्हनेस इव्हॅल्युएशन ऑफ टायगर रिझर्व्ह इन इंडियाबाबत केलेल्या अभ्यासात राज्यातील मेळघाट, पेंच आणि ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाला 'व्हेरी गुड' तर सह्याद्री व्याघ्रप्रकल्पाला 'गुड' असा दर्जा मिळाला आहे. महाराष्ट्रात २०१० मध्ये वाघांची संख्या अंदाजे १६९ होती. राज्य शासनाने सातत्याने केलेल्या प्रयत्नामुळे ही संख्या जवळपास १९० झाली आहे. म्हणजे जवळपास १२.५ टक्के वाढ आहे. चांगल्या प्रतीची कामे झाल्याबद्दल देशातील चार व्याघ्रप्रकल्पांना पुरस्कार देण्यात आले. यापैकी मेळघाट व्याघ्र राखीव क्षेत्रातील गावांच्या पुनर्वसनाबाबत झालेल्या उत्कृष्ट कामासाठी महाराष्ट्राला पारितोषिक मिळाले.



# हायटेक नर्सरी

**'डॉ.** बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय रोपवाटिका आणि हायटेक नर्सरी' या योजनेंतर्गत दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि सुदृढ रोपे मिळण्यासाठी आधुनिक आणि उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून, रोपवाटिका विकसित करण्यात येत आहेत. त्यांची संख्या ३२० इतकी आहे. त्याचा उत्तम परिणाम दिसून येत आहे.

## विक्रमाची नोंद

**वृक्षलागवडीच्या** पायाभरणीच्या उपक्रमाचा भाग म्हणून १ जुलै, २०१६ रोजी एकाच दिवशी २ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात एकंदर २.८१ कोटी वृक्षलागवड करण्यात आली. २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात ५.४३ कोटी वृक्षारोपण झाले. २०१६ आणि २०१७ मध्ये मोठ्या प्रमाणातील वृक्षलागवडीची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'ने घेतली. प्रधानमंत्री यांनी देखील 'मन की बात' या कार्यक्रमात महाराष्ट्रातील वृक्षारोपण कार्यक्रमाचा विशेष उल्लेख केला. त्याचबरोबर ट्विटरद्वारे महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले. राज्याच्या दृष्टीने ही गौरवास्पद आणि भूषणावह बाब आहे.

## जनवन विकास



**वनालगतच्या** गावातील कुटुंबीयांचे वनावरील अवलंबित्व कमी करून त्यांना पर्यायी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, गावातील नैसर्गिक संसाधनाची उत्पादकता वाढवणे इत्यादीद्वारे मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करून; त्यांचे सहजीवन प्रस्थापित करण्याच्या उद्देशातून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना सुरू करण्यात आली आहे. लोकसहभागाद्वारे या योजनेच्या माध्यमातून मानव आणि वन्यप्राणी यांच्यातील संघर्ष मोठ्या प्रमाणात कमी होण्यास हातभार लागत आहे.

या योजनेत खालीलप्रमाणे गावे समाविष्ट करण्यात आली. २०१५-१६ (१६६ गावे), २०१६-१७ (१७६ गावे), २०१७-१८ (१६६ गावे) गावांची एकूण संख्या ५०८ आहे. या योजनेच्या उद्दिष्टानुसार २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये पुढील कामे घेण्यात आली. गावातील कुटुंबांना स्वयंपाक गॅस पुरवठा - २५,०००; गावातील कुटुंबांना सौरऊर्जा उपकरण वाटप - ६,०००; भाकड जनावरांऐवजी दुधाळू जनावरांचे वाटप - ४००; गावातील कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधून देणे - २,५००; गावातील खुल्या विहिरींना कठडे बांधणे - ४००; स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवठा - ५,७००; पाणस्थळांचे खोलीकरण - ८००; कोल्हापुरी / दगडी बंधारे - ६००; युवकांना स्वयं रोजगार प्रशिक्षण - ४३०; जनजागृती कार्यशाळा - ९०; आरोग्य तपासणी शिबीर - ५५.

## माय प्लॅन्ट ॲप




**संकेतस्थळावर** माहिती ठेवण्यासाठी वनविभाग ऑनलाइन आणि ऑफलाइन कार्यपद्धतीचा वापर करत आहे. उदा. वृक्षारोपणाची जिओ टॅगिंगसह स्थळे व क्षेत्र, रोपवाटिकांची संख्या व रोपांची उपलब्धता, जिल्ह्यांना आणि अंमलबजावणी यंत्रणेला दिलेल्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने प्रत्यक्षात तयार खड्डे, मनुष्यबळाची उपलब्धता, विविध वृक्षांच्या प्रजाती, दिलेले उद्दिष्ट विचारात घेऊन प्रत्यक्षात झालेले वृक्षारोपण आणि संरक्षण, संगोपन आणि देखभाल इत्यादी बाबींचे नियोजन व उपाययोजना इत्यादी माहिती वनविभागाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे.

**समृद्ध संकेतस्थळ:** व्यक्तिगतरीत्या आणि संस्थानी केलेल्या वृक्षारोपणाची माहिती वन विभागाच्या संकेतस्थळावर भरण्यासाठी माय प्लॅन्टस् मोबाइल ॲप्लिकेशनची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचा फायदा घेऊन व्यक्ती/ संस्था यांच्यामार्फत जवळपास ६.५२ लाख रोपे लावल्याची नोंद डिजिटल प्लॅटफॉर्मवर झाली आहे.



## राखीव वने व संरक्षित क्षेत्र

**भारतीय** वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ व २० अन्वये राखीव वन म्हणून घोषित करण्याबाबत शासनाकडून मंजुरी दिली जाते. गेल्या अडीच वर्षात कलम ४ खाली एकूण ६०,९९०.५७ हेक्टर क्षेत्रास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. कलम २० अंतर्गत राखीव वन म्हणून अंतिमत: अधिसूचना निर्गमित करण्यासाठी, एकूण ५२,९३२.१२ हेक्टर क्षेत्रास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. येत्या वर्षात १ लाख हेक्टर क्षेत्र राखीव वने म्हणून घोषित करण्याचे नियोजित आहे.



# लावा शेतबांध, शेतजमिनीवर वृक्ष

**जर राष्ट्रीय वननीतीप्रमाणे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्क्यांपर्यंत वनाच्छादन वाढवायचे असेल तर ते एकट्या वन विभागाच्या जमिनीवर शक्य नाही. यासाठी वनेतर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वनाच्छादन वाढणे गरजेचे आहे. हीच बाब लक्षात घेऊन, वन विभागाने नियोजनबद्ध पावले टाकली आहेत.**

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र हे ३.०७ लाख चौ.कि.मी असून राष्ट्रीय वननीतीनुसार राज्यात ९३ हजार २४८ चौ.कि.मीचे क्षेत्र वनाखाली हवे. आजमितीस ते ६१ हजार ५७० चौ.कि.मी इतके म्हणजे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २०.१३ टक्के इतके आहे. म्हणजे राष्ट्रीय वननीतीनुसार आवश्यक वनक्षेत्रापेक्षा ते ३१ हजार २४८ चौ. कि.मीने ते कमी आहे.

महावृक्षलागवड मोहिमेच्या यशामध्ये लोकसहभाग महत्त्वाचा ठरला आहे. राज्यातील अबालवृद्ध या मोहिमेत सहभागी झाले. हा उपक्रम शासनाचा न राहता तो लोकांचा झाला. मोहिमेच्या यशासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. एक महत्त्वाची योजना म्हणजे सामाजिक वनीकरण शाखेच्या सहकार्यातून, महाराष्ट्र राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेतात आणि शेतबांधावर वृक्षलागवड करणे. या योजनेतून, 'ग्रो फॉरेस्ट' या संकल्पनेने गती घ्यावी, यातून शेतकऱ्यांच्या शेतात, शेतबांधावर फळझाड लागवड व्हावी, त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी हाही एक उद्देश आहे. या योजनेची सविस्तर माहिती देणारा शासन निर्णय १२ एप्रिल २०१८ रोजी निर्गमित झाला आहे.

## काय आहे ही योजना?

नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)च्या वतीने हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. याअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी, स्त्रीकर्ता असलेली कुटुंबे, शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तिकर्ता असलेली कुटुंबे यांना लाभ देण्यात येईल. तसेच जमीन सुधारणांचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेखालील लाभार्थी, अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम २००६ (२००७)च्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल. त्यानंतर कृषी कर्जमाफी व कर्ज साहाय्य योजना २००८ यामध्ये व्याख्या केलेले लहान आणि सीमांत भूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीवर या योजनेंतर्गत वृक्षलागवड करता येईल. शासन निर्णयात लाभधारक निवड व त्यासंबंधीची अर्हता निश्चित करून देण्यात आली आहे.

## शेतात आणि शेतबांधावर करावयाची वृक्षलागवड

शेतकऱ्यांच्या बांधावर आणि शेतामध्ये करावयाच्या वृक्षलागवडीमध्ये साग, चंदन, खाया, बांबू, निम, चारोळी, महोगनी, आवळा, हिरडा, बेहडा, अर्जून, सीताफळ, चिंच, जांभूळ, बाभूळ, अंजन, बिबा, खैर, आंबा, काजू (रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी), फणस, ताड, शिंदी, सुरू, शिवण, शेवगा, हादगा, कडिपत्ता, महारूख, मँजियम, मेलिया डुबिया यांसारख्या प्रजातींची वृक्षलागवड करता येणार आहे. रोपांचा दर निश्चित करण्यात आला आहे. वृक्षलागवडीचा कालावधी १ जून ते ३० नोव्हेंबर असा राहणार आहे.

## योजनेतून अनुदान

दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी बागायत वृक्ष पिकांच्या बाबतीत जे लाभार्थी कमीत कमी ९० टक्के आणि कोरडवाहू पिकांच्या बाबतीत ७५ टक्के झाडे जिवंत ठेवतील त्यांनाच फक्त दुसऱ्या व तिसऱ्या वर्षीचे अनुदान देय राहील.

## सल्लागार समिती

तालुकापातळीवर उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती वृक्षलागवडीबाबतची शिफारस करील.

**जल, अन्न आणि पर्यावरण यांची सुरक्षितता ही वनांवर अवलंबून असते. उत्तम वन, वन्यजीव, जैवविविधता, निसर्ग आणि पर्यावरण यांच्या वाढीसाठी आणि त्यातून मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी वन विभाग हा प्राधान्यक्रमावरील विभाग असला पाहिजे, या संकल्पनेतून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली वनविभागाने वाटचाल सुरू ठेवली आहे.**

# वेगळी 'हरित'क्रांती

**डी.एल.थोरात**

राज्यातील पर्यावरण अधिक सुरक्षित आणि उत्तम राहावे, यासाठी वनातील झाडांची संख्या वाढवण्याबरोबरच वनक्षेत्राच्या बाहेर वनेतर क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड आणि संगोपनाचा कार्यक्रम हाती घेण्याची गरज होती. त्याचबरोबर योजना आणि कार्यक्रम तयार करताना आणि त्यांची अंमलबजावणी करताना लोकसहभाग हादेखील अत्यंत महत्त्वाचा आहे.

### योजना आणि कार्यक्रम

वन आणि संलग्न क्षेत्रामध्ये समाजातील सर्व लोकांच्या आशाअपेक्षा आणि आकांक्षांना स्पर्श करणारे अनेक निर्णय गेल्या ३ वर्षात घेण्यात आले.

- वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या शेतपीक आणि फळबागाच्या नुकसानभरपाईच्या रक्कमेत दुप्पट वाढ करण्यात आली आहे.
- प्रधानमंत्र्यांच्या संकल्पनेनुसार देशात वन विभागाच्या सर्व कार्यालयात स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे.
- ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य, विस्तारित कर्नाळा अभयारण्य, तोरणमाळ संवर्धन राखीव क्षेत्र आणि अंजनेरी संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यात आले.
- वर्धा-नागपूर जिल्ह्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाचा बफर झोन तसेच भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा बफर झोन घोषित करण्यात आले.
- रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या टेकड्यांचे हरितीकरण करण्याची योजना कार्यान्वित केली.
- रस्ते, कालवे आणि लोहमार्गाच्या दुतर्फा वृक्षलागवड करण्याच्या योजनेची अंमलबजावणी सुरू.



**वृक्षलागवडीसंदर्भातील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार.**

- वनेतर क्षेत्रातील पाणथळे, सरोवरे इ. ठिकाणच्या जैवविविधतेचे व्यवस्थापन करण्याच्या योजनेची अंमलबजावणी.
- निसर्गसौंदर्य व संपदेचे रक्षण व्हावे यासाठी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्याऐवजी झाडाचे रोप किंवा पुस्तके देऊन सन्माननीय व्यक्तींचे स्वागत करावे, असा महत्त्वपूर्ण निर्णय.
- शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही या

वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याची यापूर्वीची कार्यपद्धती व्यवहार्य ठरत नसल्याने, त्यांची पारध करण्याची पद्धती सुलभ करण्याचा निर्णय.

- महाराष्ट्र लोकसेवा हमी कायद्यांतर्गत वन विभागाच्या ११ सेवा ऑनलाइन.
- नागरी भागात हरित शहर योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय.
- संघटित गुन्हेगारीद्वारे मौल्यवान वनोपज आणि वन्य प्राण्यांच्या अवयवाची तस्करी करण्यास प्रभावी प्रतिबंध व्हावा, म्हणून भारतीय वन अधिनियम, १९२७ मध्ये सुधारणा.
- ईज ऑफ डुईंग बिझनेसअंतर्गत निर्गत पास या अटीतून रबर वूड या प्रजातीस सूट.
- वनोपजाच्या वाहतुकीसाठी निर्गत पास देण्याबाबतची कालमर्यादा ४५ दिवसांवरून कमी करून ३० दिवस करण्यात आली.
- विसापूर (ता. बल्लारशा, जि. चंद्रपूर) येथे बोटॅनिकल गार्डनची निर्मिती प्रगतिपथावर.
- कांदळवन संवर्धनाच्या अधिक परिणामकारक प्रयत्नांसाठी व किनाऱ्यावरील जनतेच्या जीवनमानात सकारात्मक प्रभाव आणण्यासाठी तिवर संवर्धन प्रतिष्ठान स्थापन करण्याचा निर्णय.
- भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ व २० अन्वये राखीव वन म्हणून घोषित करण्याबाबत गेल्या ३ वर्षात जवळपास ८० हजार हेक्टर क्षेत्रास मान्यता.
- राज्यातील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी आणि त्यातून शेतकऱ्यांना शेती उत्पादन वाढवून रोजगार निर्मिती करण्याच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कृषी वानिकी क्षेत्रावर भर देण्याबाबत २०१८ मधील अर्थसंकल्पात घोषणा आणि तरतूद.
- वनक्षेत्रालगतच्या जवळपास १५,५०० गावांमध्ये लोकसहभागाद्वारे वन आणि वन्यजीव यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी आणि वनक्षेत्र व वृक्षाच्छादन वाढवण्याच्या दृष्टीने संयुक्त वन व्यवस्थापन समित्या बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय.
- वनालगतच्या गावातील कुटुंबीयांचे वनावरील अवलंबित्व कमी करून त्यांना पर्यायी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, गावातील नैसर्गिक संसाधनाची उत्पादकता वाढवणे इत्यादींद्वारे मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करून, त्यांचे सहजीवन प्रस्थापित करण्याच्या व्यापक उद्देशातून डॉ. शामप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना सुरू.
- पर्यटन क्षेत्रातील आर्थिक संधी व रोजगार निर्माण क्षमता लक्षात घेता निसर्ग पर्यटन विकास करणे, वनावर अवलंबून असलेल्या स्थानिक ग्रामस्थांच्या परजीविकांची संधी वाढवणे व निसर्ग शिक्षणाचा प्रसार करणे इत्यादी कामांची संतुलित व समन्वयरीत्या करण्यासाठी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची उपरोक्त शासन निर्णयान्वये स्थापना.
- राज्यातील प्राणिसंग्रहालयांचे काम योग्यरीत्या पार पाडण्याकरिता आणि वन्य प्राण्यांच्या कल्याणाकडे पुरेसे लक्ष देण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची स्थापना.
- वन विभागांर्तगत वनरक्षक/रोपवन कोतवाल आणि वनपाल / साहाय्यक लागवड अधिकारी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना वन, वन्यजीव, जैवविविधता, पर्यावरण आणि निसर्ग या क्षेत्रातील दुर्गम, डोंगराळ, अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त भागातील अत्यंत अवघड अशा ठिकाणी दळणवळणापोटी प्रतिमहा १५०० रुपये या दराने कायम प्रवासभत्ता मंजूर.
- **९९ कलमी कार्यक्रम:–** वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण, पर्यावरण आणि निसर्ग या संदर्भातील कार्यक्रम, योजना आणि नवीन संकल्पना ठरवून, इच्छित उद्दिष्ट गाठण्यासाठी वनमंत्र्यांच्या संकल्पनेतून ९९ कलमी कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी.
- जागतिक तापमानात होणारी वाढ, हवामान आणि ऋतुबदल याची तीव्रता व दाहकता कमी करण्याच्या उद्देशाने आणि राज्यातील वनक्षेत्र वृक्षाच्छादन वाढवण्याच्या दृष्टीने १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी २.८१ कोटी वृक्षलागवड करण्यात आली. तसेच या उपक्रमाची 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद घेण्यात आली.
- वन विभागांतर्गत महत्त्वाच्या स्थळांना भेट देणाऱ्या सन्माननीय व्यक्तींना 'वनअतिथी' म्हणून दर्जा.
- **३३ कलमी कार्यक्रम:–** हरित महाराष्ट्र संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणणे आणि सध्याचे वनक्षेत्र २० टक्क्ेवरून ३० टक्क्ेपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट विभागाने नजरेसमोर ठेवून वृक्षलागवड आणि संगोपनासाठी ३३ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) मोठ्या प्रमाणात कामे निर्माण करून, हाती घेण्यात येत आहेत. त्याकरिता मनरेगांतर्गत मजुरीचे दर व कुशल घटकांतर्गत साहित्याचे दर यामध्ये सुधारणा करण्यात आली. त्याचबरोबर मनरेगांतर्गत मस्टर निर्गमित करणे, भरणे आणि मजुरांना मजुरी अदा करणे इत्यादींबाबत देखील वन विभागाच्या अधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले.
- वृक्षारोपणाची गती तुटू न देता त्यामध्ये सातत्य ठेवण्याच्या अनुषंगाने पुढील ३ वर्षामध्ये ५० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.
- मराठवाडा विभागातील दुष्काळी आणि पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या भागात वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम

बांबूची उपलब्धता, उत्पादकता, उपयोगिता, बांबू साहित्याचा दर्जा इत्यादीमध्ये वाढ करणे आणि बांबू उत्पादनाचे मार्केटिंग, संशोधन व प्रशिक्षण आणि संपूर्ण बांबू क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्यासाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापन करण्यात आली.



घेण्यासाठी केंद्रीय संरक्षण मंत्रालयांतर्गत इको-बटालीयन स्थापन करण्याचा निर्णय.

- मराठवाडा विभागातील दुष्काळी आणि पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या भागात वृक्षारोपण व संगोपनाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घेण्यासाठी, महसूल विभागांतर्गत मोकळ्या आणि पडीक जागांचा डेटाबेस तयार करून, त्या ठिकाणी वृक्षलागवड.
- मराठवाडा विभागात प्रमुख जिल्हा मार्ग, राष्ट्रीय महामार्ग आणि इतर जिल्हा महामार्ग यांच्या दुतर्फा जवळपास ३३३० कि.मी. लांबीच्या उपलब्ध जागेत विविध प्रजातींची झाडे लावण्याचा कार्यक्रम.
- वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे गाय, म्हैस, बैल, मेंढी, बकरी व इतर पशुधन यांचा मृत्यू, अपंगत्व किंवा जखमी झाल्यास द्यावयाच्या अर्थसाहाय्यामध्ये सुमारे अडीचपट वाढ.
- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्प, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, कर्नाळा अभयारण्य इत्यादी १४ संरक्षित क्षेत्राचे पर्यावरण संवेदनशील क्षेत्र अधिसूचित.
- वृक्षलागवड आणि संगोपन कार्यक्रमात लोकांना स्वयंस्फूर्तीने सामावून घेणे आणि लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र हरित सेना स्थापन करण्याचा निर्णय.
- **टोल फ्री क्रमांक १९२६ कॉल सेंटरची निर्मिती:-** वन, वन्यजीव, संरक्षण, संवर्धन, व्यवस्थापन, रोपवाटिका, वनीकरण इत्यादी विकास कामात येणाऱ्या अडचणी तसेच निसर्ग पर्यटन, जैवविविधता, अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान, व्याघ्र प्रकल्प, संरक्षित क्षेत्र, प्राणिसंग्रहालय, सामाजिक वनीकरण इत्यादी संबंधी माहिती नागरिकांना कॉल सेंटरमार्फत मिळत आहे.
- रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग योजनेच्या अंमलबजावणीसाठी वैयक्तिक लाभधारकांसाठी, फळबागेच्या क्षेत्राची मर्यादा कोकणात १० हेक्टर व उर्वरित महाराष्ट्रात ४ हेक्टर अशी आहे. उर्वरित महाराष्ट्रासाठी ही मर्यादा ६ हेक्टर करण्याची घोषणादेखील राज्य अर्थसंकल्प २०१८ मध्ये करण्यात आली. यामुळे फळबाग लागवडीसाठी अनेक शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळेल. यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूददेखील करण्यात आली आहे.



राज्याचे नवे मानचिन्ह म्हणून ब्ल्यू मॉरमॉन हे फुलपाखरू घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

### वन व सामाजिक वनीकरण विभागाचे एकत्रीकरण

सामाजिक वनीकरण विभाग वन विभागामध्ये एकत्रीकरण करून एकजिनसी विभागाची भावना निर्माण करण्यात आली.

- वन विभागांतर्गत कांदळवन सहव्यवस्थापन समिती स्थापन करण्यात येत आहे.
- चंद्रपूर वन ॲकेडमी संकुल परिसरात नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन संदर्भात प्रशिक्षण व प्रत्यक्ष कृती दल केंद्राची स्थापना.
- प्रायोगिक तत्त्वावर शासनाने चिमणी संवर्धन प्रकल्प राज्यातील पुणे आणि ठाणे या ठिकाणी राबवणार.
- वन विभागाकडून बांबूच्या सर्व प्रजातींना वाहतूक परवान्यातून सूट.

**विशेष अधिकारी (वने)**

### संवेदनशीलता

मंत्रिमहोदयांनी उत्तम योजना आणि कार्यक्रम देण्याबरोबरच वन विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांना सातत्याने चांगल्या सोयीसुविधा मिळतील याकडे कटाक्ष ठेवला आहे.



**वनशहीद : स्व. सदाशिव त्र्यंबकअप्पा नागठाणे**

अलीकडेच भोर तालुक्यात वनवणवा आटोक्यात आणताना वनरक्षक सदाशिव नागठाणे, यांचा मृत्यू झाला. मंत्रिमहोदयांना हळहळ वाटली. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मृत्यूच्या घटना शासकीय सेवेत असताना कोणत्या ना कोणत्या कारणाने घडत असतात. परंतु नागठाणे यांचा मृत्यू झाल्यानंतर मुख्यमंत्री सहायता निधीतून तत्काळ १० लाख रुपये अर्थसाहाय्य, पत्नीला अनुकंपा तत्त्वावर नोकरी आणि वन विभागातील कर्मचारी/अधिकारी यांना वर्गणीद्वारे, कुटुंबीयास अर्थसाहाय्यासाठी आवाहन; इत्यादी बाबी गतीने मंत्रिमहोदयांनी केल्या. एवढेच नव्हे तर परभणी जिल्ह्यातील अत्यंत दूरवरील खेड्यामध्ये जाऊन त्यांनी कुटुंबीयांना दिलासा दिला. वन विभाग त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे असा संदेश शासकीय सेवकांना दिला. यातूनच कर्मचाऱ्यांप्रति असलेली त्यांची संवेदनशीलता दिसून येते.



**वनशहीद स्व. सदाशिव त्र्यंबकअप्पा नागठाणे यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, सचिव (वने) विकास खारगे.**

**देशातील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादनाबद्दल फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया दर २ वर्षांनी वनस्थिती अहवाल जाहीर करते. हे सर्व्हेक्षण अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने उपग्रहाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे त्यांची अचूकता आणि विश्वासार्हता खपू मोठी असते. फेब्रुवारी, २०१८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'भारतीय वनस्थिती अहवाल २०१७' नुसार बांबूक्षेत्र, वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादन, घनदाट जंगले, कांदळवने व एकूण जलव्याप्त क्षेत्र अशा ४ क्षेत्रांमध्ये राज्याने उल्लेखनीय आघाडी घेतली आहे.**


# पथदर्शी महाराष्ट्र



### बांबूक्षेत्रात वाढ

**भारतीय** वनस्थिती अहवालानुसार राज्यातील बांबूक्षेत्र २०१७ मध्ये ४४६२ चौ.कि.मी.ने वाढून ते १५९२७ चौ.कि.मी. इतके झाले आहे. देशामध्ये बांबू पुनर्निमितीमध्ये राज्याचा दुसरा क्रमांक लागतो तर घनदाट बांबूक्षेत्रामध्ये राज्याचा तिसरा क्रमांक लागतो.


### वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादनात अग्रगण्य



भारतीय वनसर्वेक्षण संस्थेच्या २०१७ च्या अहवालानुसार वनेतर क्षेत्रातील वृक्षाच्छादनात २७३ चौ. कि.मीची वाढ झाल्याचे नोंदवण्यात आले आहे. महाराष्ट्रातील वृक्ष आच्छादनामध्ये २५६ चौ.कि.मीची वाढ झाली आहे. वृक्षाच्छादनाच्या एकूण क्षेत्राचा विचार करता महाराष्ट्र हे देशात अग्रगण्य राज्य आहे.

शासनाने हाती घेतलेल्या ५० कोटी वृक्षारोपण कार्यक्रमासह विशेष वृक्षारोपण योजना, वृक्षसंवर्धनाच्या विशेष उपाययोजना, जलयुक्त शिवार अभियान, कांदळवन क्षेत्रातील विकास कामे, संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे बळकटीकरण इत्यादींमुळे शक्य झाली आहे.

### कांदळवनांमध्ये वाढ



भारतीय वनसर्वेक्षण संस्थेच्या २०१७ च्या अहवालानुसार राज्यामध्ये कांदळवनाच्या क्षेत्रामध्ये ८२ चौ.किमी.ने वाढ होऊन ते ३०४ चौ.किमी. इतके झाले आहे. राज्याने या क्षेत्रात देशात अव्वल स्थान मिळवले आहे. कांदळवन हे समुद्रकिनारा, खाडी आणि नद्या यांच्या परिसरातील उत्तम अशी वृक्षसंपदा आहे.



जलचरांचे पुनरुत्पादन आणि अधिवास कांदळवनामध्ये जोपासले जाते आणि बहरतो. कांदळवन हे त्सुनामी, नदी किनाऱ्यावरील वादळे, लाटा यांपासून जलसृष्टीचे संरक्षण करतात. म्हणून कांदळवन संरक्षण व वाढीवर राज्याने खूप भर दिला. कांदळवनातील उपजीविका, रोजगार निर्मिती आणि आर्थिक वृद्धी करण्यासाठीच्या योजना आणि उपक्रमांना वनविभागाने चालना दिली.



### घनदाट जंगलात वाढ

भारतीय वन सर्वेक्षण संस्थेच्या २०१७ च्या अहवालानुसार राज्यामध्ये घनदाट जंगलांमध्ये (म्हणजे ७० टक्क्यांपेक्षा जास्त घनतेची जंगले) ५१ चौ.कि.मीची वाढ होऊन ते ८,७३६ चौ. कि.मी इतके झाले आहे. ही वाढ शासनाने हाती घेतलेल्या वृक्षलागवड, हरित महाराष्ट्र योजना, संयुक्त वन व्यवस्थापन योजना आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीचे फलित आहे.

### जलव्याप्त क्षेत्रात वाढ

भारतीय वनसर्वेक्षण संस्थेच्या २०१७ च्या अहवालानुसार राज्यातील एकूण जलव्याप्त क्षेत्र २०१७ मध्ये ४३२ चौ कि.मी.ने वाढून १५४८ चौ.कि.मी इतके झाले आहे. जलयुक्त शिवार, जलसंधारणाची कामे यामुळे ही वाढ शक्य झाली आहे. वनयुक्त शिवार करताना जलयुक्त वन कार्यक्रमास या विभागाने गती दिली आहे.

**राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकतेच कांदळवन संरक्षण आणि उपजीविका निर्माण योजनेस मंजुरी देण्यात आली. खेकडाशेती, कालवेशेती, मत्स्यव्यवसाय, मधुमक्षिका पालन यांसारख्या रोजगारांच्या संधी कांदळवन शेतीत दडल्या आहेत. सागरी जैवविविधता सांभाळून स्थानिक जनतेची उपजीविका चालण्यासाठी प्रोत्साहन देणारी ही योजना आहे. कांदळवन पर्यटनाची संकल्पना रुजते आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधन आणि शिक्षणाची आवश्यकता व्यक्त होत असताना, महाराष्ट्राच्या कांदळवन कक्षाने या योजनेद्वारे याचा लाभ किनारी प्रदेशात राहणाऱ्या जनतेला उपलब्ध करून दिला आहे.**

# कांदळवनाचे वरदान

भारतीय वनस्थिती अहवाल २०१५ नुसार राज्याचे कांदळवन क्षेत्र २२२ चौ. कि.मी होते ते २०१७ मध्ये वाढून ३०४ चौ. कि.मी इतके झाले आहे. यामध्ये ८२ चौ कि.मी ची वाढ नोंदवण्यात आली आहे. ही वाढ प्रामुख्याने रायगड, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यात आहे. महाराष्ट्राला ७२० कि.मी लांबीचा भव्य समुद्रकिनारा लाभला आहे. या विस्तृत किनाऱ्याला अनेक प्रकारच्या पर्यावरणीय व्यवस्था वास्तव्याला आहेत. जसे कांदळवने, कोरल्स, खडकाळ क्षेत्र, वाळूचे किनारे, दलदल. इ. किनारी आणि सागरी वातावरण फक्त विविध प्रकारची जैवविविधताच सांभाळत नाही तर अनेक प्रकारच्या पर्यावरणीय व्यवस्थासुद्धा सांभाळते. ज्यावर समुद्रकिनारी राहणाऱ्या अनेक लोकांची उपजीविका अवलंबून आहे. त्यामुळे किनारी आणि सागरी पर्यावरण सांभाळणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कांदळवनाचे महत्त्व ओळखून, महाराष्ट्र शासनाने २०१२ मध्ये सर्व शासकीय कांदळवन जमिनींना राखीव वनांचा दर्जा दिला तसेच वन विभागांतर्गत स्वतंत्र कांदळवन कक्षाची निर्मिती केली.

### संरक्षण आणि उपजीविका

महाराष्ट्रात मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ठाणे जिल्ह्यात मिळून ३०४ चौ.कि.मी ची कांदळवने आहेत. परंतु कांदळवनाचे एकूण क्षेत्र ३० हजार हेक्टरच्या आसपास आहे. आतापर्यंत १५,०८८ हेक्टर शासकीय जमिनीवर तसेच १७७५ हेक्टर खासगी क्षेत्रावरील कांदळवनांना राखीव वने व वने म्हणून दर्जा देण्यात आला आहे. कांदळवनाचे संरक्षण आणि त्यावर अवलंबून असलेल्या लोकांची उपजीविका याचा मेळ घालून, वन विभागाने नुकतीच कांदळवन संरक्षण आणि उपजीविका योजना राबवण्यास सुरुवात केली आहे.

योजनेच्या अंमलबजावणीतून पर्यावरणाचे संरक्षण आणि नैसर्गिक आपदांपासून सागरी किनारपट्टीचे व स्थानिकांचेही रक्षण होईल. न्यायालयाने दिलेल्या निदेशाचे पूर्णत्वाने पालन करत, त्यांना उपजीविकेचे साधन मिळेल. साहजिकच उदरनिर्वाहाचे शाश्वत साधन म्हणून कांदळवनाकडे पाहण्याचा स्थानिकांचा दृष्टिकोन आपोआपच सकारात्मक होईल. त्यांच्याकडून कांदळवनांचे जतन आणि संवर्धन होईल.

राज्यात सध्या कांदळवनाचे काही क्षेत्र शासनाकडे तर काही वैयक्तिक खासगी लाभार्थ्यांकडे आहे. अशा परिस्थितीत योजनेची अंमलबजावणी करताना सागरी आणि खाडीलगतच्या गावांमध्ये कांदळवनांवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती, मच्छीमार समाज आणि इतर सर्वांची कांदळवन सहव्यवस्थापन समिती स्थापन करून; सदस्यांचे वैयक्तिक आणि सामूहिक उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातील.



### कांदळवन संवर्धन

जेव्हा या क्षेत्रातील रोजगारामुळे स्थानिकांना उत्पन्न मिळू लागेल तेव्हा ते स्वत:हून कांदळवन संवर्धन आणि संरक्षणाच्या कामात सहभाग घेतील, हा या योजनेचा गाभा असून यामध्ये खासगी, शासकीय, सामूहिक कांदळवन क्षेत्रास उत्पादनक्षम साधन बनवणे व त्याचा दर्जा उंचावला जाईल. शासकीय कांदळवनाचे नियोजनबद्ध संरक्षण आणि संवर्धन यामध्ये त्यावर अवलंबून असणाऱ्या ग्रामस्थांचे योगदान घेऊन त्यांच्या उपजीविकेच्या साधनांचा विकास केला जाईल. वन विभाग व स्थानिक जनता यांच्यातील सहजीवन वाढवून सहकार्य विकसित केले जाईल. कांदळवनावर अवलंबून असलेल्या व्यक्तींचे समूह तयार करून; अशा संस्थांशी करारनामे केले जातील. योजनेतून प्राप्त होणारे उत्पन्न वनसंवर्धन आणि या समूहांसाठी वापरले जाणार असून, शासनाच्या विविध विभागांच्या योजनेतील तरतुदींची यामध्ये सांगड घातली जाईल.

योजनेची अंमलबजावणी आणि नियंत्रण अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांच्याकडून केली जाणार आहे. योजनेतील वैयक्तिक लाभासाठी ४० आरपेक्षा जास्त क्षेत्र असल्यास संस्थेचे सदस्य असणे अथवा संस्थेमार्फत योजना राबवणे बंधनकारक नाही. कांदळवन कक्षाकडे याची नोंदणी करून योजनेचे लाभार्थी म्हणून नोंदणी करता येऊ शकेल. त्यांना खेकडापालन, मधुमक्षिका पालन, यासारखे पर्यावरणपूरक लघुव्यवसाय तसेच पर्यटन विकास, गृह पर्यटन यासाठी आवश्यक असलेले कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येऊन; त्यांची क्षमता बांधणी केली जाईल. त्यासाठी आवश्यक असणारी तांत्रिक आणि आर्थिक मदत देण्यात येईल.



## पर्यटन विकास व रोजगार

खासगी क्षेत्रातील कांदळवनधारकांकडे ४० आरपेक्षा कमी क्षेत्र असल्यास सामूहिकरीत्या, कांदळवन सहव्यवस्थापन समितीमार्फत खेकडा व कासव पालन, मधुमक्षिका पालन व पर्यटन विकास यासारखे लाभ घेता येतील. पर्यटन विकास, मच्छीमारीसाठी होड्या, जाळी खरेदी, खेकडे व मासे यांची विक्री व्यवस्था, मधुमक्षिका पालन, शिंपले पालन, पिंजऱ्यातील मत्स्यपालन, शोभिवंत मासे निर्मिती यांसारख्या बाबींसाठी त्यांची क्षमताबांधणी केली जाईल. कांदळवनातील पक्षिवैविध्य आणि तेथील जैवविविधता पाहण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. अशा वेळी पक्षी निरीक्षण आणि त्याचबरोबर कांदळवन पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न या योजनेतून होईल. कांदळवन जपण्यासाठी त्यावरील अवलंबित्व कमी करणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन स्थानिकांना स्वंयपाकासाठी गॅसचा पुरवठा तसेच सौर उपकरणांचा पुरवठा करण्याचे धोरणही शासनाने स्वीकारले आहे. कांदळवन क्षेत्रात पुनर्लागवड, संवेदनशील क्षेत्राभोवती संरक्षक भिंत बांधणे, खेकडा उबवणी केंद्र विकसित करणे, स्कूबा डायव्हिंग, स्नार्कलिंग, यांसारख्या प्रयत्नातून पर्यावरणपूरक रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

## वैयक्तिक लाभ


खासगी व्यक्तींसाठी वैयक्तिक लाभाच्या योजनेत शासन आणि व्यक्ती यांचा सहभागाचे प्रमाण ७५:२५ तर सामूहिक स्वरूपाच्या कामासाठी शासन व समिती यांच्या सहभागाचे प्रमाणे ९०:१० असे निश्चित करण्यात आले आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी व्यक्तीचे वय किमान १८ वर्षे असावे. ती व्यक्ती कांदळवन क्षेत्राची कायदेशीर मालक असावी. वैयक्तिकरीत्या योजनेचा लाभ घ्यायचा झाल्यास, तुमच्याकडे किमान ४० आर हेक्टर कांदळवन क्षेत्र असणे आवश्यक आहे. कांदळवन सहव्यवस्थापन समितीतील सदस्यांची कृषी उत्पादकता वाढवून, उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होईल. गांडूळ खत, सेंद्रिय खत, जैविक कीटकनाशक ग्रामस्तरावर तयार करणे, रासायनिक शेतीचे सेंद्रिय शेतीत रूपांतर करणे, एसआरआय/एसआरटी भात उत्पादन करणे, उत्पादित मालाचे मूल्यवर्धन करणे, बांबू लागवड, फलोत्पादनातून विकास साधणे, खासगी, पडीक शेतात तसेच शेतातील बांधांवर वनशेतीसारखे कार्यक्रम राबवणे या गोष्टींनाही चालना देण्यात येईल.

स्थानिकांना उपजीविकेचे साधन विकसित करून देणे एवढाच याचा मर्यादित उद्देश नाही. २०१७–१८ ते २०१९–२० या तीन वर्षात किमान १० लाख कांदळवृक्षाची लागवड करण्याचे उद्दिष्ट योजनेत निश्चित करण्यात आले आहे. योजनेत सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या समूहांनी, मच्छिमार संस्थांनी; हा कार्यक्रम राबवण्यास तयार असल्यास ठराव घ्यावा लागेल. या कार्यक्रमांतर्गत; कुऱ्हाडबंदी, चराई बंदी, डेब्रिज टाकण्यास मनाई आहे. वनवणवा नियंत्रणाच्या कामात सहकार्य करणे आवश्यक करण्यात आल्याने; कांदळवन संरक्षण आणि संवर्धनाच्या कामास गती मिळेल. योजनेचा लाभ घेताना कांदळवन सहव्यवस्थापन समिती, वैयित्तिक लाभार्थी व संबंधित विभागीय वनसंरक्षक यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात येईल.

कांदळवनाचे कोणतेही नुकसान होणार नाही. न्यायालयीन आदेशांचे पालन पूर्णपणे होईल याची काळजी घेत, गावनिहाय तसेच कांदळवननिहाय सूक्ष्म आराखडे तयार केले जातील. निवड केलेल्या गावांची सभोवतालच्या ३ कि.मी परिसरातील कांदळवन आच्छादनाची २००५ ची स्थिती दर्शवणारे, सुरुवातीचे उपग्रह छायाचित्र प्राप्त करून घेतले जाईल. त्या आधारे कांदळवन संरक्षण आणि संवर्धनाच्या कामाला योग्य दिशा आणि गती देताना, दुर्लक्षित खारफुटीचे हे वन स्थानिकांना शाप नाही तर वरदान वाटेल; अशा पद्धतीने योजनेचे नियोजन करण्यात आले आहे. ■■

**वनविभागाची, 'हॅलो फॉरेस्ट १९२६' ही हेल्पलाइन सामान्य जनतेशी संवाद साधणारी आणि वन आणि वन्यजीव संवर्धनाबरोबर पर्यावरण रक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देणारी देशातील पहिली हेल्पलाइन आहे. वृक्षारोपण, वनसंवर्धन, संरक्षण, बेकायदेशीररीत्या चालणारा वन्यजीव व्यापार, वन्यजीवांची हत्या, शिकार, वनवणवे, वन जमिनीवरील अतिक्रमण, या सर्व बाबींची माहिती आणि मार्गदर्शन या २४ तास सुरू असणाऱ्या हेल्पलाइनद्वारे मिळू शकते. वन, वन्यजीव आणि पर्यावरण क्षेत्राशी निगडित कोणतीही माहिती या हेल्पलाइनच्या माध्यमातून मिळवता येते किंवा यासंबंधी काही घटना घडत असेल तर त्याची माहिती किंवा तक्रार सामान्य नागरिक या हेल्पलाइनच्या माध्यमातून करू शकतात. या हेल्पलाइनच्या प्रभावी वापराची ही काही उदाहरणे..**

# फोन करा, मदत मिळवा...




### कोब्रा वाचला

हॅलो फॉरेस्ट १९२६ वर १९ नोव्हेंबर २०१७ रोजी रात्री १ वाजून ३४ मिनिटांनी फोन वाजला. श्री. पवन मेश्राम, राहणार कवठा बहाळे, तालुका भातुकली, अमरावती यांनी त्यांच्या घरी मोठा साप असल्याची माहिती हॅलो फॉरेस्टला दिली. त्यानंतर ही माहिती उप वनसंरक्षक अमरावती यांना देण्यात आली. त्यांनी ती वन विभागाच्या जलद बचावदलाला कळवून रात्री ३ वाजता एक चमू पवन मेश्राम यांच्या घरी पाठवला.

अमोल गावनेर या सर्पमित्राला बोलावण्यात आले. वन विभागाचे कर्मचारी आणि सर्पमित्र यांनी या सापाला जो प्रत्यक्षात कोब्रा होता. त्याला पकडून सुरक्षितरीत्या त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

### थांबली अवैध वृक्षतोड, मिळाले समाधान

मौजे माळधामणी, (जि. हिंगोली) या गावात ही घटना घडली. गावातील चिंचेचे झाड तोडल्याबद्दल हॅलो फॉरेस्ट १९२६ कडे तक्रार प्राप्त झाली. वन विभागीय अधिकारी हिंगोली आणि वनपाल हिंगोली यांनी तक्रारकर्त्यास संपर्क साधून घटनेची माहिती मिळवली. घटनास्थळी जाऊन पाहणी केली. या पाहणीमुळे अवैध स्वरूपात होणारी वृक्षतोड थांबवण्यास मदत झाली. तक्रारदाराचेदेखील समाधान झाले.

निःशुल्क सेवा
हॅलो फॉरेस्ट
१९२६
२४ तास सेवा

### ठाकुर्ली रेल्वेस्टेशन: जखमी माकड वाचले




ही गोष्ट आहे २० ऑक्टोबर २०१७ रोजीची. 'हॅलो फॉरेस्ट १९२६' च्या हेल्पलाइनवर दूरध्वनी खणाणला. ठाणे वन विभागाच्या अधिकार क्षेत्रातली ही घटना आहे. श्री. रानडे नावाच्या व्यक्तीने 'हॅलो फॉरेस्टला' फोन करून, ठाकुर्ली रेल्वेस्थानकावर एक लहान माकड जखमी अवस्थेत असल्याचे कळवले. त्या दिवशी वनकर्मचाऱ्यांचे माकडाला पकडण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरले. कारण त्या लहान माकडाचा एक कुत्रा संरक्षण करत होता. माकडाला पकडायला गेले की कुत्रा वनकर्मचाऱ्यांवर हल्ला करत होता.

दुसऱ्या दिवशी माकडाजवळ एक साप आला. कुत्र्याने विचित्र आवाज काढून ओरडायला सुरुवात केली तसे ते माकड झाडाच्या फांदीवर जाऊन बसले. तिसऱ्या दिवशी वनकर्मचाऱ्यांनी कुत्र्याला खाण्यासाठी चपाती देऊन माकडापासून दूर नेले. मग माकडाला पकडून कात्रज येथील वन्यप्राणी अनाथालयात नेण्यात आले तिथे त्याच्यावर उपचार करण्यात आले. ही सर्व कार्यवाही 'हॅलो फॉरेस्ट १९२६'ला आलेल्या एका फोनमुळे करणे शक्य झाले. एका वन्यजीवाला वाचवण्यात या हेल्पलाइनचे योगदान महत्त्वाचे ठरले.

## शिकारी जाळ्यात

आवळी गावच्या जंगलात १८ ऑगस्ट २०१७ रोजी रात्री दहा वाजता निलेश बेळसकर हे त्यांच्या घरातील गच्चीवर गेले असता बाजूच्या जंगलातील डोंगरावर त्यांना बॅटरीच्या प्रकाशझोत फिरताना दिसला. त्या ठिकाणी वन्यप्राण्याची शिकार तर होत नाही ना असा संशय त्यांच्या मनात आला. त्यांनी दोन मित्रांना बोलावून तिथे काय सुरू आहे, याचा अंदाज घेतला. काही लोक जंगलाच्या आत जाताना दिसले. आता तक्रार कुणाकडे करायची, त्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाला. श्री. निलेश यांना रेडिओवर हॅलो फॉरेस्टबद्दल ऐकल्याचे आठवले. १९२६ क्रमांक ही आठवला. त्यांनी लगेच मोबाइलवरून हेल्पलाइनचा फोन लावला. ती वेळ होती साधारणत: १० वाजून १५ मिनिटांची. कॉल सेंटरला आलेली ही माहिती लगेच उपवनसंरक्षक, कोल्हापूर यांना कळवण्यात आली व सत्वर कारवाईच्या सूचना दिल्या गेल्या. उप वनसंरक्षक, कोल्हापूर यांनी पन्हाळा वनक्षेत्रपाल यांना ही माहिती दिली. जागेवर जाऊन चौकशी करण्याचे आदेश दिले. वनक्षेत्रपाल कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले असता त्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला एक मारुती ओमनी एम.एच.१६ ए.जे. ३०१९ उभी दिसली. तिथे काही लोकांना मोराची शिकार करून घेऊन जाताना अडवण्यात आले. ३ लोक, १ बंदूक, २ सेल बॅटरी, व एक मृत मोर त्यांच्याजवळ आढळून आला. त्या सर्वांना ताब्यात घेऊन गाडी व मुद्देमालासह गुन्ह्याची नोंद करण्यात आली. आरोपींना दुसऱ्या दिवशी न्यायालयात हजर करण्यात आले. या घटनेची न्यायालयीन प्रक्रिया अद्याप सुरू आहे.



शिकारी जाळ्यात

एका फोनमुळे शिकाऱ्यांना पकडता आले, याची माहिती देणारी बातमी श्री. निलेश यांनी दुसऱ्याच दिवशी दैनिकात वाचली आणि त्यांनी उप वनसंरक्षक, कोल्हापूर यांना फोन करून तातडीने केलेल्या कारवाईबद्दल आभार मानले. खरे तर हॅलो फॉरेस्टला फोन केल्याने हे शिकारी पकडले गेले असल्याचे उप वनसंरक्षकांनी सांगितले व त्यांचे अभिनंदन केले.

## फोन आला– अतिक्रमण थांबले

दुसरी घटना होती वन विभागाच्या जमीनीवर होत असलेल्या अतिक्रमणाची. मौजे बैणार, तालुका औढा, जिल्हा हिंगोली येथे सर्व्हे क्रमांक: ८४ गट क्र. ३१८ कंपार्टमेंट क्रमांक ६२५ वर अतिक्रमण होत असल्याची माहिती फोनवरून मिळताच वन परिक्षेत्र अधिकारी औंढा यांनी वनपाल व वनरक्षक यांना घटनास्थळी पाठवले. एका फोनमुळे वनजमिनीवर होत असलेले अतिक्रमण वेळीच थांबवण्यास मदत झाली.

## आग विझली.. रोपवन वाचले

**अमरावती :** प्रशांत काळे यांनी ६ डिसेंबर २०१७ रोजी तळवेल फाटा (चांदूरबाजार, अमरावती) येथे रात्री १० वाजून १४ मिनिटांनी रस्त्याच्या कडेचे झाड जळत असल्याची माहिती हॅलो फॉरेस्टला दिली. त्यानंतर उपवनसंरक्षक अमरावती यांना कळवण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी, परतवाडा यांना घटनास्थळाची पाहणी करण्याची आणि कार्यवाही करण्याची सूचना देण्यात आली. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, त्या क्षेत्रातील पोलीस स्टेशन, अग्निशमन दल या सर्वांना कल्पना देण्यात आली. या सर्वांच्या सहकार्याने झाडाला लागलेली आग विझवण्यात आली. त्यामुळे आग पसरून होणारे इतर नुकसान टाळता आले.

**धुळे:** धुळे वनवृत्तात हॅलो फॉरेस्ट १९२६ वरून ११ मार्च २०१७ रोजी वन वणवा लागल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार उपवनसंरक्षक, धुळे यांना घटनेची माहिती देण्यात आली. या वनवृत्तात येणाऱ्या धुळे वन परिक्षेत्र क्रमांक ९७४ मधील कॅम्पांतर्गत करण्यात आलेल्या २५ हेक्टरवरील ५ वर्षे पूर्ण झालेल्या रोपवनास आग लागल्याचे आढळले. ही आग विझवण्याचे तत्काळ प्रयत्न करण्यात आले. २५ पैकी ३.७ हेक्टर क्षेत्र जळाल्याचे लक्षात आले. त्यानुसार प्रथम वनगुन्हा नोंदवण्यात आला. हॅलो फॉरेस्टला जागरूक नागरिकाने रोपवनाला लागलेली आग कळवल्याने संपूर्ण रोपवन आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्यापासून वाचले.



जंगलातील वणवा

ई-गव्हर्नन्समध्ये अग्रेसर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावीरीत्या वापर करून वन विकास, व्याघ्र संवर्धन, वृक्षारोपण आदी क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करत आहे. ई-गव्हर्नन्सच्या अधिकाधिक वापरामुळे वनविभाग पारदर्शक आणि लोकाभिमुख झाला आहे.

# वृक्षारोपणाला डिजिटल आधार

**प्रवीण श्रीवास्तव**

वन विभागाचा प्रत्येक कक्ष संगणकाद्वारे जोडण्यात आला आहे. त्याचबरोबर मंत्रालयसुद्धा वन विभागाशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क साधून, नवनवीन ध्येयधोरणाची माहिती दिली जाते. त्यामुळे कोणत्याही क्षणी कुठलीही माहिती तत्काळ मिळण्यास मदत होत आहे. भारत सरकारच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेची जोड वनविभागाला देण्यात आली आहे.

### ड्रोनद्वारे चित्रीकरण

देशभर चर्चेचा विषय ठरलेला राज्यातील वृक्षलागवडीचा कार्यक्रम अधिक विश्वासार्ह व्हावा, त्यात पारदर्शकता यावी. तसेच या वृक्षारोपणाच्या यशाची टक्केवारी सामान्य जनतेला वेळोवेळी माहिती व्हावी, यासाठी यंदा प्रथमच ड्रोनचा वापर करण्यात येणार आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरातून वनखाते ही मोहीम लोकाभिमूख करण्याचा पूर्ण प्रयत्न करत आहे.



ड्रेनद्वारे टिपलेले छायाचित्र

मोहीम सुरू झाली तेव्हा याविषयी अनेक शंका व्यक्त केल्या जात होत्या. मात्र, प्रत्येक मोहिमेगणिक अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, ही मोहीम अधिक पारदर्शी करण्यात आली आहे. तिसऱ्या टप्प्यात 'ड्रोन'चा वापर करण्यात येत आहे. ड्रोनच्या वापरामुळे वृक्षारोपणाची ताजी माहिती जाणून घेता येईल.


### कॉल सेंटर

सामान्य जनतेच्या मनातील प्रश्न सोडवण्यासाठी कॉल सेंटर 'हॅलो फॉरेस्ट १९२६'ची निर्मिती करण्यात आली आहे. आतापर्यंत २०३४ आपत्कालीन कॉलची नोंदणी या हेल्पलाइनवर करण्यात आली असून, त्यातील १९४० प्रकरणे २४ तासांच्या आत निकाली काढण्यात आली.

या हेल्पलाइनचा उद्देश वृक्षारोपण, वनसंवर्धन यासह वन्यप्राण्यांची अवैध शिकार, अतिक्रमण, वणवा आदी मुद्द्यांवर नागरिकांशी थेट संपर्क साधणे हा आहे. तसेच वनखात्याविषयीची इतर माहिती या माध्यमातून नागरिकांना घेता येणे शक्य आहे. आपत्कालीन कॉलिंगकरिता याला २४ x ७ अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लोकांशी जोडण्यासाठी वनखात्याचे हे महत्त्वाचे पाऊल आहे. सामान्य माणसाला यापूर्वी वनविभागाकडे मदत मागण्यासाठी व्यासपीठ नव्हते. आता एका कॉलवरून मदत मागता येते आणि वनखात्याला मदतही करता येते. यापूर्वी शिकार, अवैध वृक्षतोड आदीची माहिती देताना नागरिकांमध्ये भीती असायची. या हेल्पलाइनमध्ये नाव आणि नंबर गुप्त ठेवले जातात. त्यामुळे अनेकजण आता माहिती देण्यासाठी समोर येत आहेत. या हेल्पलाइनवर संपर्क साधल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवली जाते. तो अधिकारी माहिती देणाऱ्या व्यक्तीला घटनास्थळ आदी विचारून, लगेच कारवाईसाठी सज्ज होतो. यात वनाधिकारी टाळाटाळ करू शकत नाहीत, कारण या कॉलची वरिष्ठस्तरावर नोंद होते. येणाऱ्या कॉलचा मागोवा घेतला जातो. रात्रीसुद्धा या हेल्पलाइनवर माहिती देता येते. त्यांची नोंद घेऊन कारवाईसुद्धा केली जाते. वनखात्याच्या योजनांची

## सुसज्ज कमांड अ‍ॅण्ड कंट्रोल रुम

राज्याच्या वनखात्यात पारदर्शकता यावी या हेतूने मुख्यालयी ‘कमांड अ‍ॅन्ड कंट्रोल’ रूम तयार करण्यात आली आहे. या नियंत्रण कक्षाद्वारे संपूर्ण भारतभर ज्या ठिकाणी व्हिडिओ कॉन्फरन्सची व्यवस्था असेल त्या ठिकाणी त्वरित संपर्क साधून, तेथील घटनेचा अंदाज घेता येतो. या ठिकाणाहून एकाच वेळेस अनेक ठिकाणची परिस्थिती नेटवर्कच्या माध्यमातून बघता येते. वनविभागाची संपूर्ण माहिती आता ऑनलाइन झाली असून, एका क्लिकवर सर्व नागरिकांसाठी उपलब्ध आहे. जीआयएस (जिओग्राफिकल इन्फर्मेशन सिस्टिम) कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. या माध्यमातून राज्यातील वनक्षेत्र, वन्यप्राणी संरक्षण, वनजमिनीचे संरक्षण आणि सीमांकन कामाचे डिजिटलायझेशन करण्यात आले आहे. डिजिटलाइज नकाशा वनखात्याकडे उपलब्ध आहे. दोन वर्षांपूर्वी या मोहिमेसाठी ठोस यंत्रणा नव्हती, पण आता ती कार्यान्वित झाली असून, त्याद्वारे यंदा वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. या कार्याची दखल कॅम्पुटर सोसायटी ऑफ इंडिया मुंबई चॅप्टरने घेऊन २०१७ सालचा ’आयटी अ‍ॅण्ड एक्सलेन्स अवॉर्ड २०१७’ हा पुरस्कार देऊन महाराष्ट्र वन विभागला गौरवण्यात केले आहे.




**पवनी रेंजमधील जीआयएसद्वारे घेण्यात आलेले छायाचित्र**

माहितीसुद्धा त्यावरून दिली जाते. येथे कॉल करताच तत्काळ संपर्क होऊन, संबंधित माहिती अथवा समस्या लागलीच संबंधित वनाधिकाऱ्यांकडे हस्तांतरित केली जाते. थेट उपनसंरक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे समस्या अथवा माहिती दिली जात असल्याने कारवाई होते.

हेल्पलाइनच्या माध्यमातून वनविभाग लोकाभिमुख होत आहे. तसेच नागरिक आणि स्थानिक वन्यजीवप्रेमी व वनविभागाचे अधिकारी या सर्वांनाच हे सोयीचे ठरत आहे. विविध समाजघटकांना एका क्षणात माहिती मिळत असल्यामुळे, प्रसंगी समस्येचे थेट निराकरण होत आहे. यामुळे वने आणि वन्यजीवांचे महत्त्व वाढले आहे. एका तक्रारीवर नोंदणी होत असल्याने माहिती गोळा होते व समस्या प्राधान्यक्रमाने निश्चित होतात. विशेष म्हणजे मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्यास मदत होते.

### सामाजिक माध्यमांचा वापर

महाराष्ट्र वन विभाग समाज माध्यम हॅण्डलवरही मागे नसून फेसबुकचे १ लक्ष ३ हजार १२ फॉलोअर्स, ट्विटरवर ८५३, इंस्टाग्रामवर ८२५ तसेच युट्युबचे ३२३ दर्शक आहेत. वन विभागाचे अद्ययावत संकेतस्थळही आहे. ज्यावर विभागाची संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. ही सर्व स्थळे वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत असतात. त्याचबरोबर वन विभागातील अधिकारी कर्मचारी यांची सेवापुस्तकेही डिजिटलाईज करून ऑनलाइन करण्यात आली आहे .

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), नागपूर

**शब्दांकन : प्रबुद्ध अजय गणवीर**
माध्यम साहाय्यक, प्रसिद्धी व माहिती अधिकारी
(वने)कार्यालय, नागपूर



बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे संकल्पित छायाचित्र

# बांबू : जीवनदायी कल्पतरू

**वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूर जिल्ह्यामध्ये चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची (बीआरटीसी) स्थापना २०१४ रोजी करण्यात आली. परंपरागत सुपे, टोपल्या, ताटवे या माध्यमातून बुरूड समाजातील लोकांना एक आशेचा किरण भेटला. बांबूवरील आधारित रोजगार निर्मिती करणे, बांबूपासून वस्तू बनवणे या उद्देशाने, या संस्थेची उभारणी करण्यात येत आहे. या संस्थेची वास्तू ही आगळीवेगळी असावी व बीआरटीसीची इमारत ही पूर्णत: बांबूपासून बनवण्यात यावी, या दृष्टीने वनविभागाचे प्रयत्न सुरू आहेत.**

**राहुल पाटील**

वनविभाग व टाटा ट्रस्टच्या सहकार्यातून बीआरटीसीच्या इमारतीचे बांधकाम पूर्णपणे बांबू व माती यापासून बनवण्याचे कार्य सुरू झाले. यामध्ये प्रशासकीय इमारत, शैक्षणिक इमारत, कार्यशाळा, वसतिगृह अशा विविध इमारतींचे बांधकाम प्रगतिपथावर चिचपल्ली येथे सुरू आहे. ही इमारत बांबू व मातीपासून बनवली जाणारी आशिया खंडातील एक आगळीवेगळी पर्यावरणपूरक वास्तू म्हणून साकारली जाणार आहे.

शासनाने वनविभागांतर्गत बांबूच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र बांबू विकास मंडळ (एमबीडीबी)ची स्थापना केली आहे. व्यवस्थापकीय संचालकपदी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक टी. एस. के. रेड्डी यांची नियुक्ती केली आहे.

## बांबूपासून बनवलेल्या कलाकृती








## मुबलक बांबू

चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांमध्ये बांबू पुष्कळ प्रमाणात आढळतो. या बांबूचा योग्य वापर व्हावा व लोकांच्या हाताला रोजगार मिळावा, यासाठी प्रशिक्षण केंद्रातर्फे बांबू बास्केट, बांबू फर्निचर व बांबू टर्निंग अशा बांबूवरील आधारित प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबवण्यात येतात. यात बांबू सोफा सेट, झेंडे, तलवार, टेबल, पलंग, घड्याळ तसेच बांबूची सायकल अशा विविध वस्तू बनवल्या जातात. जवळजवळ अडीचशेहून अधिक तरुणतरुणींना या प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण दिले गेले असून, त्यापैकी शंभरहून अधिक प्रशिक्षणार्थी विविध ठिकाणी स्वयंरोजगार करत आहेत.

जंगलातील चोरीच्या बांबूवर चालणाऱ्या व्यवसायावर मात करण्याकरिता व जंगल संवर्धनाच्या दृष्टीने बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणि ताडोबा व्याघ्र प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण देण्यात येते. या प्रयत्नातून बफर क्षेत्रातील अडेगाव व निंबाळा या गावी एक सामूहिक उपयोगिता केंद्र उभारण्यात आले आहे.

## कलाकुसरीच्या वस्तू

चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये बांबूवरील आधारित कलाकुसरीबाबत महिलांमध्ये वाढणारी उत्सुकता लक्षात घेऊन, 'प्रशिक्षणातून स्वयंरोजगार' हा कार्यक्रम राबवण्यास सुरुवात झाली. या कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात गावांमध्ये जाऊन, बांबूवर आधारित कलाकुसरीचे प्रशिक्षण महिलांना दिले जाते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे याकरिता, तालुक्याच्या ठिकाणी बांबू हँडिक्राफ्ट अॅण्ड आर्ट युनिट म्हणजेच यंत्रसामग्रीसमवेत एक सामूहिक उपयोगिता केंद्र उभारण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर, विसापूर, पोंभुर्णा, मूल येथील जवळजवळ चारशेहून अधिक महिलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे व चंद्रपूर येथे प्रशिक्षण केंद्राची निर्मिती झाली आहे. तसेच विसापूर व पोंभुर्णा येथे केंद्र उभारण्याचे कार्य प्रगतिपथावर आहे. तसेच मूल, चिमूर, नागभीड व महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये महिलांचे प्रशिक्षण व त्या ठिकाणी स्वयंरोजगाराकरिता सामूहिक उपयोगिता केंद्र उभारण्याचे नियोजित आहे.

## बाजारपेठेची उपलब्धता

बीआरटीसीमार्फत प्रशिक्षित झालेल्या बांबू कारागिरांनी बनवलेल्या बांबूच्या वस्तूंना योग्य हमीभाव व रास्त बाजारपेठ मिळण्यासाठी वन विभाग प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून या वस्तूंना महाराष्ट्रातील सर्व जनधन वनधन वस्तू विक्री केंद्रामध्ये ठेवण्यात आले आहे. नागपूर व चंद्रपूर येथे बांबू वस्तू विक्री शॉप सुरू करण्यात आले आहे. फ्लिपकार्ट व अॅमेझॉन त्या दोन्ही ऑनलाइन मार्केटिंग कंपनीमार्फत बांबूच्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

वाढत्या जागतिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या युगामध्ये बांबुची तंत्रज्ञानाशी सांगड घातली गेली पाहिजे, यासाठी बांबूवर आधारित पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रामध्ये सप्टेंबर २०१७ रोजी महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांच्याशी संलग्न असलेला, दोन वर्षीय डिप्लोमा इन बांबू टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. अशा प्रकारचा बांबू पदविका अभ्यासक्रम सुरू करणारी बीआरटीसी ही महाराष्ट्रातील प्रथम व भारतातील दुसऱ्या क्रमांकाची संस्था ठरली. या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांना अगरतळा, बेंगळूर, केरळ, कुडाळ अशा विविध ठिकाणी अभ्यास दौऱ्यासाठी पाठवण्यात येत आहे. बांबूला बांधकामांमध्ये स्टीलऐवजी एक पर्याय म्हणून बघितले जावे, याकरिता बीआरटीसीमार्फत सर्टिफिकेट कोर्स इन बांबू कन्स्ट्रक्शन असा तीन महिन्याचा अभ्यासक्रम सुरू करायचे नियोजित आहे. शेतकऱ्यांनाही बांबूच्या लागवडीकरिता एक अभ्यासक्रमही संस्थेमार्फत लवकरच शिकवला जाणार आहे. बांबूला विद्यापीठाच्या स्तरावर एक अभ्यासक्रम म्हणून बघण्यात यावे म्हणून, राज्यपाल विद्यासागर राव व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून पुणे विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ, राहुरी कृषी विद्यापीठ येथे बांबू हँडिक्राफ्ट व आर्ट युनिट सुरू करण्यात येणार आहेत. ज्यामध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांना व आजूबाजूच्या तरुणतरुणींना बांबूवर आधारित अभ्यासक्रमांबाबत ज्ञान दिले







जाणार आहे.

### ट्रान्सफर परमिटमुक्त

वाढत्या बांबू उद्योगासाठी लागणारा कच्चा माल व एक पर्यायी पीक म्हणून बांबूचा विचार केला जावा या उद्देशाने, बांबूला ट्रान्सफर परमिटमुक्त केले आहे. बांबूच्या विविध जाती आहेत, त्यापैकी बालकोआ, टुलडा या जाती आर्थिक उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जातात. या सर्व जातींचे नमूना भूखंड शेतकऱ्यांना पाहावयास मिळावे याकरिता, बीआरटीसीच्या आवारांमध्ये चिचपल्ली येथे तयार केले जात आहे.

महाराष्ट्र वन विभागामार्फत वृक्षलागवड कार्यक्रमांतर्गत बांबूच्या लागवडीलाही खूप महत्त्व दिले जात आहे. 'गरिबांचे सोने' संबोधले जाणाऱ्या बांबूला वनविभागाच्या प्रयत्नातून अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील या बांबू कारागिरांनी बनवलेले झेंडे प्रधानमंत्री कार्यालयापासून ते मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत सर्वत्र पाहावयास मिळतात तसेच रतन टाटांपासून ते अमिताभ बच्चन यांच्या घरी चंद्रपूरच्या बांबू कलाकृती पाहावयास मिळतात. गतीने व कमी खर्चात येणाऱ्या या बांबूच्या अगदी मुळांपासून ते पानांपर्यंत, सूपे-टोपल्यांपासून ते चहापर्यंत कपडालत्ताही बनवला जातो. पर्यावरणापासून ते रोजगारापर्यंत सर्वच बाबींसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या कल्पतरूला खऱ्या अर्थाने सर्वांचेच सोने असे संबोधायला हरकत नाही.

**संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, आयएफएस.**

# बहुगुणी बहुपर्यायी

**टी.एस.के. रेड्डी**

महाराष्ट्र शासनाने बांबू क्षेत्र हे प्राधान्य क्षेत्र मानले आहे. बांबू क्षेत्राच्या विकासासाठी राज्यस्तरीय धोरणांमध्ये आमूलाग्र बदल केले आहेत. खासगी क्षेत्रावर बांबूंची लागवड व उत्पादनासाठी परवानगी देऊन, बांबूला ट्रान्सफर परमिटमुक्त केले आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना बांबूलागवड अगदी सोयीची होणार आहे. बांबू हे गतीने वाढणारे पीक असून या अनुषंगाने बांबूकडे एक पर्यायी पीक म्हणून बघितले जाऊ शकते. बांबू क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी, महाराष्ट्र वनविभागाने महाराष्ट्र बांबू विकास मंडळाची स्थापना केली आहे. बांबू लागवडीपासून ते बांबू उद्योगांपर्यंत विविध क्षेत्रांना चालना देण्यात आली आहे.

### पर्यावरणपूरक शेती

महाराष्ट्राचा जास्तीत जास्त भूभाग हा वनाच्छादित होण्याच्या दृष्टीने व एक पर्यावरणपूरक शेतीच्या दृष्टीने बांबूची शेती व लागवड हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. सर्वसाधारणपणे बांबूच्या पिकाचे तीन वर्षांनंतर उत्पादन चालू होते. परंतु आर्थिकदृष्ट्या विचार करता बांबूच्या काही विशेष जाती जसे की, बालकोआ, टुलडा या महत्त्वाच्या आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या जाती आहेत. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त बांबू आपल्या शेतावरती लावावा व या बांबूला एक हमीभाव मिळावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या अनुषंगाने बल्लारशा पेपर मिल यांच्याशी बायबॅक गॅरंटी विकत घेण्याची हमी करारबाबत अंतिम टप्प्यावर चर्चा चालू आहे. वनविभागातील तसेच शेतकऱ्याच्या जमिनीवरील बांबू काढल्यानंतर योग्य पद्धतीच्या साठवणीअभावी त्याचा दर्जा कमी होत असतो. या गोष्टींवर मात करण्याकरिता अकरा वनवृत्तांमध्ये बांबू साठवणीकरिता, अद्ययावत बांबू प्रक्रिया केंद्र व बांबू डेपो उभारण्यात येईल.

### रोजगाराचे प्रमुख साधन

महाराष्ट्र बांबू डेव्हलपमेंट बोर्डामार्फत गडचिरोली जिल्ह्यामध्ये ग्रामीण

**बांबूपासून बनवलेल्या कलाकृती**







भागातील महिलांना एक रोजगाराचे प्रमुख साधन ठरलेल्या गडचिरोली अगरबत्ती प्रोजेक्टला (गॅप) पुनर्जीवित करण्याकरिता प्रयत्न करत आहे. हे उत्पादन वाढवण्याकरिता व आंतरराष्ट्रीय



**बांबूपासून कलाकृती बनवणाऱ्या महिला कारागीर.**

बाजारपेठेमधून येणाऱ्या अगरबत्तीपेक्षा स्वस्त दरात, 'गॅप'मधील अगरबत्ती उपलब्ध व्हावी याकरिता, जास्तीत जास्त कामे यांत्रिक स्वरूपाचे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अगरबत्तीला योग्य हमीभाव व रास्त बाजारपेठ मिळावी या अनुषंगाने, 'सायकल अगरबत्ती' सोबत या अगरबत्ती प्रकल्पास जोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

वनांवर आधारित लोकांना स्वयंरोजगाराचे एक साधन उपलब्ध व्हावे, याकरिता बांबूवरील आधारित वस्तू बनवण्याकरिता प्रशिक्षण देऊन; त्या ठिकाणी सामूहिक उपयोगिता केंद्र उभारण्यात येणार आहे. याच धर्तीवर भोर येथील सामूहिक उपयोगिता केंद्राचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे.

## विक्रीस साहाय्य

विदर्भातील सर्व बांबू उद्योगातील बांबू कारागिरांमार्फत बांबूपासून बनवण्यात आलेल्या या वस्तूंना योग्य बाजारपेठ मिळावी यासाठी नागपूर 'सेमिनरी हिल' येथे अद्यावत सोयी सुविधांनी युक्त बांबूच्या वस्तूसाठी एक शोरूम उभारण्यात आली आहे.

महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या मार्गदर्शनाखाली चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यांमध्ये बांबूपासून टुथपिक बनवण्याचा उद्योग महिन्याभरात सुरू होणार आहे. या ठिकाणी बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रातर्फे एक सामूहिक उपयोगिता केंद्र उभारण्यात येणार आहे.

बांबूवरील आधारित अशा वाढत्या उद्योजकतेला वाव मिळावा याकरिता, मोठ्या प्रमाणावर कच्चा माल उपलब्ध होणे गरजेचे आहे. अमरावती वनविभागांतर्गत वडाळी येथील अद्ययावत बांबू नर्सरीमध्ये बांबूच्या विविध जाती पाहावयास मिळतात. अमरावती येथील हे बांबू गार्डन पर्यटकांच्या दृष्टीने एक महत्त्वाचे स्थळ बनले आहे. बांबूवर आधारित विविध उद्योगांसाठी ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रामध्ये रोजगार उपलब्धतेसाठी प्रयत्न सुरू आहेत.

**व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर**







# गाव तिथे वनराई

**वृक्षारोपण हा शिवरायांच्या कृषी धोरणाचा एक वैशिष्टपूर्ण घटक. शिवरायांनी स्वराज्यातील दगड, धोंडे, नदी, नाले, दऱ्या, डोंगर, जंगल या सर्वांचा स्वराज्याच्या उभारणीसाठी उपयोग करून घेतला. जंगलाचे रक्षण आणि वृक्षांची लागवड केल्याशिवाय पाऊस वेळेवर पडणार नाही. पाऊस योग्य प्रमाणात पडायचा असेल तर जंगले जपली पाहिजेत, हे छत्रपती शिवाजी महाराज जाणून होते.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेतीविषयक धोरणामुळे शेतकऱ्याला समृद्धी आली. शेती एवढी समृद्ध झाली की, शेतमालाला देशाची बाजारपेठ पुरेनाशी झाली. म्हणून महाराजांनी निर्यात धोरण ठरवले. आखाती देशातील इराण मस्कत तर युरोपीय देशापर्यंत व्यापार वाढवला.

पडिक जमीन लागवड शेतीला प्रोत्साहन देताना निसर्गाचे शोषण होणार नाही, याचे भान शिवरायांनी ठेवले होते. लढाऊ जहाजांच्या बांधणीसाठी लागणाऱ्या लाकडासाठी सागाची झाडे परवानगी घेवून तोडावीत पण याव्यतिरिक्त एकही जिवंत झाड तोडायचे नाही, फक्त मृत झाडांच्या व मोडून पडलेल्या झाडांच्याच लाकडांचा वापर करायचा. यात कोणीही सापडला तर त्याची गय केली जाणार नाही, असा हुकूम त्यांनी जारी केला.

वृक्ष हे पावसाचे पाणी मुळांद्वारे जमिनीमध्ये खोलवर नेतात. त्याचप्रमाणे पावसाळ्यात पाणी शोषण व उन्हाळ्यामध्ये मुळे पाणी सोडतात. त्यामुळे बारमाही पाण्याचे प्रवाह जिवंत राहतात, याचीही जाण त्यांना होती. म्हणूनच 'गड तेथे आमराई, गाव तेथे वनराई' हा नारा महाराजांनी दिला आणि आपल्या लाडक्या राजाची आज्ञा रयतेने आज्ञाधारकपणे पाळली. जंगल जपणे आणि वृक्षलागवड करणे ही लोकचळवळ झाली. याच डोंगरदऱ्या आणि जंगलांचा शिवरायांनी गनिमीकाव्यासाठी हत्यार म्हणून वापर केला.

जाळपोळ करणे, पीक उद्ध्वस्त करणे, हाताला लागेल ती चीजवस्तू उचलणे ही समकालीन शिपाईगिरीची पद्धत राजांनी मोडून काढली. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकातून घोडी घालायची नाहीत. कोणच्याही धान्याला, भाजीच्या काडीला, पाळीव प्राण्याला हात लावायचा नाही. जे पाहिजे ते रीतसर पैसे देऊन घ्यायचे जोरजबरी करायची नाही. आज्ञापत्राद्वारे या साऱ्या गोष्टी त्यानी लष्करातील अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवल्या.

स्थानिक संसाधनाचा कार्यक्षम उपयोग फक्त आणि फक्त महाराजांनीच केला. स्वराज्यामधल्या जंगलातील गवत, गवताची कुरणे आणि कापलेल्या गवताच्या गंजी व गवताच्या साठ्यासंबंधातही शिवाजी महाराजांनी सुरक्षेसाठी काही मार्गदर्शन केल्याचे जाणवते. शिवाजी महाराज लष्कराच्या व वसुली कारकुनाला लिहितात, 'घोडे ही स्वराज्याची दौलत आहे. त्यांना पोटभर चारा मिळालाच पाहिजे. त्यासाठी साठवलेला चारा काटकसरीने वापरावा तो वाटोळा करू नये. पावसाळ्यात चारा कोठून आणाल. त्याचप्रमाणे चाकर, नोकर, शिपाई गप्पा मारत बसतात. शेकोट्या पेटवतात, चिलीम चुट्टा ओढतात, तेव्हा तो विस्तव पूर्णपणे विझल्याची खात्री करावी. रात्री राहूटीतले दिवे मालवूनी मगच झोपावे विस्तव वाऱ्याने घात होईल. उंदीर वात पळवून नेईल, गंज्या पेटतील. घोडी उपाशी मरतील. स्वराज्याची मोठी हानी होईल. त्याचप्रमाणे गाईला चारा मिळणार नाही. स्वराज्याच्या भावी शिलेदाराला दूध मिळणार नाही. नवी पिढी कुपोषित होईल.' एक राजा कुठल्या पातळीवर रयतेची स्वराज्याची काळजी किती अंगांनी करतो, विविध वस्तूचे अंतरसंबंधाचा किती बारीकसारीक गोष्टी तपशिलवार शिवाजी महाराज करत होते हे अभ्यासण्यासारखे आहे.

शिवरायांनी राबवलेले पाणी धोरण जगाच्या इतिहासातील दखलपात्र धोरण मानले जाते. कुठल्याही नैसर्गिक स्रोताचे शोषण होता



कामा नये. त्याचप्रमाणे 'पाणी वाचवा, माणूस जगवा' हा शिवकालीन नारा होता. शिवकालात जमीन आणि पाणी या गोष्टी स्वराज्याच्या होत्या. त्या उपभोगासाठी रयतेला दिल्या जायच्या त्यावर योग्य तो कर किंवा सारा लावला जायचा. हे काम अत्यंत पारदर्शक व्हावे यासाठी. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वप्रथम सर्व प्रकारच्या जमिनीची मोजणी केली, त्याचे दस्त बनवून दस्तऐवजीकरण केले. त्याची प्रतवारी ठरवून चारभाग पाडले गेले. काळी पांढरी पडीक कोरडवाहू बागायत असे प्रकार लक्षात घेऊन त्यांच्यावर वेगवेगळा सारा रूपी महसूल लावला जायचा. उत्पादित पिकाचा विचार करून अंतिम सारा आकारणी केली जाई.

# शिवरायांचे आज्ञापत्र



छत्रपती शिवाजी महाराज हे जगाच्या इतिहासातले असे राजे आहेत की, ज्यांनी प्रत्येक आघाडीवर अत्यंत नियोजनपूर्वक योजना ठरवल्या आणि अत्यंत परिणामकारक रितीने राबवल्या. हे नियोजन करताना संभाव्य आसमानी सुलतानी अडचणींचा पूर्ण विचार करून अपत्कालीन पूर्व नियोजनावर नेहमीच भर दिला. कृषी असो, पाणी असो, चारा असो, हाताला काम देणे असो, गडकिल्ल्यावरील धान्याची साठवण असो या प्रत्येक बाबतीत त्यांनी अत्यंत दृष्टेपणाने निर्णय घेतले. चोख अंमलबजावणी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यातील ही जंगलसंपत्ती, निसर्गसंपत्ती कमी होऊ नये म्हणून एक आज्ञापत्रच काढले होते. शिवप्रभूंनी निर्माण केलेल्या स्वराज्याचा अर्थ लावण्यासाठीच आज्ञापत्राची निर्मिती झाली आहे. आज्ञापत्राचे अंतरंग म्हणजे शिवकार्याचे हृद्गत.

आपल्या राज्यातील निसर्गदत्त जंगलसंपत्तीची, वृक्षठेव्याची कशी काळजी घ्यावी याविषयी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार स्पष्टपणे या आज्ञापत्रात मांडले आहेत. आधुनिक काळाप्रमाणे प्रदूषण किंवा पर्यावरणाचा असमतोल नसणाऱ्या त्यांच्या काळातही त्यांनी वृक्षसंपत्तीचे मोठेपण जाणून घेतले होते. यावरूनच त्यांची पर्यावरणाबाबतची दूरदृष्टी दिसून येते.

## गडावरील वृक्ष संवर्धनाबाबत आज्ञापत्र

'गडास येण्या-जाण्याचे मार्ग असतील ते सुगम नसावे. सुगम असले तरी ते मोडून, त्यावरील झाडी वाढवून, आणखीकडे परके फौजेस येता कठीण यैसे मार्ग घालावे. याविरहित बलकुबलीस चोरवाटा ठेवाव्या. त्या सार्वकाल चालो देवू नयेत. समयास तेच दिंडी अथवा दरवाजा याचा राबता करून सामान सर्वदा नेत जावे. गडाची राखण म्हणजे कमरग्याची झाडी, ते झाडी प्रयत्नें वाढवावी. त्यामध्यें येक काठी तेही तोडूं न घ्यावी. बलकुबलीस त्या झाडीमध्यें हषम बंदुकी घालावयाकारणें जागे आसो द्यावे. गडासभोंवती नेहमी मेटें आसावी. घेरियाची गस्त करत जावी. गस्तीचा जाब मेटकरी यांणी देत जावा. गडाखालतें इमारतींचे घर किंवा घराभोवती दगडाचे कुसू सर्वथैव आसों न द्यावें. गडावरील झाडें जीं आसतील तीं राखावी. याविरहित झाडें, आंबे, फणस, चिंचा, वड, पिंपल आदिकरून थोर वृक्ष व निंबें, नारिंगे आदिकरून लाहन वृक्ष, तैसेच पुष्पवृक्ष, वल्ली, किंबहुना प्रयोजक-अप्रयोजक जें झाड होत आसेल तें गडावरी लावावें; जतन करावें; समई तितकेंही लांकडे तरी प्रयोजनास पडतील.'

'आरमार तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदीवरून थोट लाकूड असावे लागते. ते आपल्या राज्यामध्ये अरण्यामध्ये सागवानादी वृक्ष आहेत. त्याचे जे अनुकुल पडेल ते हुजुर लेहून हुजूराचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहीत जे लागेल ते परमुकिहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराजयातील आंबे, फणस आदि करून हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची. परंतु त्यांस हात लाऊ न द्यावा. काये म्हणोन की ही झाडें वर्षा दो वर्षांनी होतात यैसें नाही. रयतेने ही झाडें लाऊन लेकरांसारखी बहुकाळ जतन करून वाढवली ती झाडें तोडिलियावरी त्यांचे दु:खास पारावर काये? येकास दु:ख देऊन जे कार्य करीन म्हणेल तें कार्य कराणारासहित स्वल्पकालेच बुडोन नाहिसेंच होते. किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडपणाचा दोष पडतो. या वृक्षच्या आभावें हानीही होते. याकरितां हे गोष्ट सर्वथा होऊं न द्यावी. कदाचित येखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामतून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे न्यावे. बलात्कार सर्वथा न करावा.'

या पत्रावरून छत्रपती शिवाजी महाराजांना आपल्या राज्यातील या निसर्गदत्त जंगलसंत्तीची वृक्षठेव्याची किती काळजी होती हे दिसून येते. प्रदूषण किंवा पर्यावरणाचा असमतोल नसणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही त्यांनी वृक्षसंपत्तीचे हे मोठेपण जाणून घेतले होते. त्या संदर्भात आज्ञापत्र काढले होते, यावरूनच त्यांची पर्यावरणाची दृष्टी स्पष्ट होत आहे.

**(रामचंद्र अमात्य प्रणीत स्वराज्य निती -आज्ञापत्र या श्री रा. चिं.ढेरे यांचे संपादित पुस्तकातून)**



जगातील सगळ्यात मोठा मांजरवर्गीय प्राणी म्हणजे वाघ. एकूण ३६ प्रकारच्या मांजर प्रजातींमधील वाघ हा जंगलाचा राजाच. बुद्धिवान, शक्तिवान. जंगल वास्तव्याला लागणारी सहनशक्ती व उमदेपणात 'या सम हाच' असणाऱ्या वाघाचे गारूड माणसाच्या मनावर कायमच राहिले आहे. वाघाच्या एकूण सहा प्रजाती आहेत. बंगाल टायगर, सुमात्रा टायगर, मलेशियन टायगर, सैबेरिया टायगर, इंडोचायनिज टायगर आणि कॅस्पियन टायगर, बंगाल टायगर भारताबरोबरच बांगलादेश, नेपाळ आणि पश्चिम म्यानमार येथे आहे. पांढरा वाघ बंगाल टायगरच्या रंगहीन प्रजातीत गणला जातो. सुमात्रा वाघ आणि पूर्व- दक्षिण चीनमधिल वाघ नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पूर्व- दक्षिण चीनमधील वाघ फक्त प्राणिसंग्रहालयात शिल्लक आहेत. इतर दोन प्रजाती बाली टायगर, जावा टायगर नामशेष म्हणून घोषित केले आहेत. गेल्या शतकात एक लाख संख्येने असलेले वाघ शतकाअखेर ४० हजारपेक्षाही कमी झाल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यासंबंधी युद्धपातळीवर काही करण्याची गरज भासत होती. त्याचाच एक भाग म्हणून डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी जनवन विकास योजना राबवण्यात येत आहे.



# वन विकास : व्याघ्र संवर्धन

वाघांची संख्या झपाट्याने कमी होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील महत्त्वाची कारणे म्हणजे त्यांची अवैध शिकार विषबाधा, जिवंत विद्युत तारेचा वापर इ. वाघाची हाडे, कातडे व इतर अवयवांपासून बनवलेल्या औषधाचा चीन, इंडोनेशिया व व्हिऐतनाम येथे मोठी मागणी असल्याने मोठ्या आर्थिक फायद्यासाठी तस्करांची साखळी विणली गेली आहे. त्याचप्रमाणे जंगलात शिकाऱ्यांनी इतर प्राणी पकडण्यासाठी रचलेल्या सापळ्यात वाघ अडकून जखमी होतात वा मारले जातात.

या कारणाबरोबरच वाघांचा कमी होत चाललेला अधिवास हेसुद्धा एक कारण आहे. मानवनिर्मित गोष्टीमुळे वाघांचा अधिवास नष्ट होतो. त्यांचे भ्रमणमार्ग कमी होतात. या बाबी वाघांच्या संख्येवर परिणाम करतात. व्याघ्र संवर्धनाची गरज व महत्त्व ओळखून, केंद्र शासनाने १९७२ मध्ये प्रोजेक्ट टायगर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची सुरुवात केली.

व्याघ्र प्रकल्प म्हटला की, त्यामध्ये केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार प्रामुख्याने पुढील कामे करावे लागतात.

■ वनसंवर्धन तसेच शिकार प्रतिबंधक विशेष योजना.
■ अधिवासाचा विकास करून अन्न सुरक्षा वाढवणे. ■ इको विकासच्या माध्यमातून वनांवरील अवलंबन कमी करणे व सहजीवन राबवणे. ■ इको पर्यटन विकास करणे. ■ जनजागृती

करणे. ■ नियतकालिक, मूल्यांकन/लेखा-जोखा करणे.
■ वन्यप्राणी सनियंत्रण करणे.

वरील कामे ही व्याघ्र प्रकल्पाच्या विविध स्तरावर घेतली जातात. परंतु बफर क्षेत्रातील लोकांमध्ये व्याघ्र प्रकल्पाविषयी गैरसमज फार जास्त प्रमाणात असतात. लोकांचे वनांवरील अवलंबत्व कमी झाले तरच कोअर क्षेत्र व वन्यप्राणी सुरक्षित राहू शकतात. हे ध्येय ठेऊन राज्य शासनाने, वरील क्षेत्रापैकी इको विकास क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून; डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना, २०१५ पासून राबवण्याचा निर्णय घेतला.

## योजनेची वैशिष्टे

■ गावांतील जन-जल-जंगल-जमीन या संसाधनांचा विकास साधून उत्पन्न/उत्पादकता, पर्यायी रोजगाराची संधी वाढवणे व संरक्षित क्षेत्रावरील दैनंदिन अवलंबित्व कमी करणे. ■ संरक्षित वनक्षेत्रांच्या संरक्षण व संवर्धनामध्ये ग्रामस्थांचे योगदान घेणे.
■ मानव-वन्यजीव यांच्यामधील संघर्ष कमी करून सहजीवन प्रस्थापित करणे. ■ वन व वन्यजीव संवर्धनातून मिळणारे फायदे ग्राम विकासाकरिता वापरणे. ■ गावनिहाय सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करून, गावांचा परिस्थितीकीय विकास साधण्यासाठी सर्व विभागांच्या योजनेतील तरतुदींची सांगड घालून; एकात्मिक व नियोजनबद्धरीत्या विकास घडवणे.

## ठळक बाबी

■ या योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामीणांचा सक्रिय सहभाग होण्यासाठी, ग्राम परिस्थितीकीय विकास समिती नेमून त्यांच्या माध्यमातून विकास कामे करावयाची आहेत. ■ योजनेच्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने गाव पातळीवरील आधारभूत माहिती संकलित करून सूक्ष्म आराखडा व त्यानुसार कामे करावयाची आहेत.

### एल.पी.जी. पुरवठा

५३० गावातील ३५,५३४ कुटुंबांना एलपीजीचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच चालू वर्षात उर्वरित कुटुंबांना एलपीजी पुरवठा करण्याचा मानस आहे. १०,७२४ कुटुंबांना किचन ओटे बांधून देण्यात आले आहेत. तसेच चालू वर्षांतही किचन ओटे बांधण्याची कामे सुरू आहेत. गावातील कुटुंबांना एल.पी.जी.ची जोडणी दिल्यामुळे खालीलप्रमाणे फायदे झाले.
■ पूर्वीप्रमाणे जंगलामध्ये जाऊन जळाऊ लाकूड गोळा करण्यासाठी लागणारा वेळ व कष्ट वाचल्यामुळे, वेळ व कष्ट घरातील इतर कामांना, शेतीला व रोजगाराकरिता वापरता येत आहे. ■ जळाऊ लाकूड गोळा करण्यासाठी जंगलामध्ये गेल्यामुळे वाघ, बिबट, अस्वल इत्यादी वन्यप्राण्यांबरोबर संपर्क आल्यामुळे मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या होणाऱ्या घटना कमी होत आहेत. ■ चुलीच्या धुरामुळे होणाऱ्या डोळ्यांच्या विकारापासून सुटका झाली. ■ लोकांचे जंगलात येण्याचे प्रमाण कमी झाल्याने आता अधिवासाचा विकास होत आहे.

■ व्याघ्र प्रकल्पस्तरावर प्रकल्पनिहाय कृतीआराखडा तयार करून प्रकल्प स्वरूपात कामाची अंमलबजावणी व संनियंत्रण करावयाचे आहे. ■ योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता व्याघ्र प्रकल्पस्तरावर तज्ज्ञांचे, समन्वयकांचे, डाटा एन्ट्री ऑपरेटरची निवड करण्याची तरतूद करण्यात आली आहे. ■ या योजनेच्या संनियंत्रणासाठी माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे. ■ पूर्वी ही योजना व्याघ्र प्रकल्पाच्या बफर व संरक्षित क्षेत्रापासून २ कि.मी. असलेल्या, गावांचा सहभाग निश्चित करण्यात आला होता. परंतु, या योजनेची लोकप्रियता आणि उपयोगिता तपासून; १७ जुलै २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना आता बफर क्षेत्राबाहेर, वाघांचे भ्रमणमार्ग आणि कोअर क्षेत्रातून पुनर्वसित करण्यात आलेल्या गावांकरिता विस्तारित केली आहे. वाघाचे भ्रमणमार्ग सुरक्षित करण्याकरिता हे फार मोठे पाऊल आहे. ३१ सप्टेंबर २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसयार वनाशेजारील सर्व गावांना १०० टक्के एलपीजी पुरवठा केला जाणार आहे. ■ शासन निर्णय २१ मार्च २०१८ अन्वये या योजनेत ९० टक्के शासन अनुदानाद्वारे लगतच्या १० शेतकरी कुटुंबांच्या समूहास जाळीदार कुंपण उभारण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली.

**जन-वन विकास योजनेंतर्गतची कामे:** जंगलालगतच्या व शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये कठडे नसलेल्या १७३५ विहिरींना कठडे बांधण्यात आले आहेत. गावातील जंगलालगतच्या कठडे नसलेल्या विहिरींना कठडे बांधल्यामुळे अनेक फायदे झाले. विहिरीत पडून वन्यप्राण्यांचे होणारे मृत्यूंचे प्रमाण कमी झाले. यापूर्वी एखादा वन्यप्राणी विहिरीत पडल्यामुळे किंवा विहिरीत पडून मृत्यू पावल्यामुळे शेतकऱ्यांना होणारा अनावश्यक त्रास कमी झाला. विहिरीचे काठ ढासळल्यामुळे होणारे शेतीचे नुकसान कमी झाले.

## व्यक्तिगत शौचालय

५३० गावांमध्ये ३,६३८ व्यक्तिगत शौचालय बांधण्यात आले आहेत. या योजनेसह इतर योजनांशी समन्वय साधून, जंगलाजवळील क्षेत्रातील गावे १०० टक्के हागणदारीमुक्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## शुद्ध पाण्यासाठी फिल्टर आणि जलसंसाधनाचा विकास

या योजनेंतर्गत १८९३५ कुटुंबांना भारत सरकारद्वारे निर्मित वॉटरफिल्टरचे वाटप करण्यात आले. या वॉटरफिल्टरमुळे पाण्यातील आयर्न, फ्लोराइड, पाण्यातील हानिकारक सूक्ष्म जंतू, निर्धारित मानकानुसार राहण्यास मदत मिळाली. या योजनेंतर्गत जंगलामध्ये व जंगलालगतच्या गाव परिसरामध्ये वन्यप्राण्यांकरिता पाणी उपलब्धतेसाठी, तसेच गावांमधील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवण्याकरिता; शास्त्रोक्त निकषानुसार जल व मृदा संधारणाची कामे करण्यात आली आहेत. त्यामध्ये जाळीचे बंधारे, जंगलातील पाणवठे, वनतळी यांचा समावेश आहे.

■■



रानमळा (ता. खेड, जि. पुणे) येथील वृक्षलागवड आणि संगोपनाचा पॅटर्न.

**'बहीण निघाली सासऱ्याला भाऊ उभा वाटेवरी आल्या गेल्याला पुसतो बहीण दिसली कुठवरी' असा बहिणीच्या आठवणीने व्याकूळ झालेला भाऊ आणि सासरी गेलेल्या लेकीच्या वाटेकडे डोळे लावून बसलेले आईवडील असे चित्र आपण नेहमी पाहतो. पण सासरी लेक सुखाने नांदते आहे, याचा आनंददेखील त्यांना असतो. याच आनंदात भर घालणारी आणि मुलीच्या आठवणीची धार थोडी का होईना कमी करणारी गोष्ट म्हणजे माहेरची झाडी.**

# माहेरची झाडी, मायेची गोडी

गावागावात लेक सासरी निघाली की, तिच्या हातून तिच्या नावाने परसातल्या दारात चिंच, आंबा, पेरू अशा झाडांची रोपे लावली जात आहेत. लेकीची आठवण आली की, तिने लावलेल्या हिरव्यागार रोपाकडे पाहायचे.. ते मनाला शांती देते.. लेक सासरी सुखात आनंदात आहे हे सांगताना ती घरात असल्याचा, तिच्या अस्तित्वाचा आभास देते.

खरे तर वृक्षलागवडीचा हा संस्कार घालून दिला तो पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील रानमळा गावाने. आता हा संस्कार गावागावांत आणि शहरात रुजवण्याचे काम होणार आहे, ते ग्रामविकास आणि नगरविकास विभागाच्या 'वृक्षाची जोपासना तीच निसर्गाची उपासना' या योजनेतून. तसा शासननिर्णय ग्रामविकास आणि नगरविकास विभागाने निर्गमित केला आहे.

### रानमळा गावचा वृक्षसंस्कार

रानमळा गावचा हा वृक्षलागवडीचा संस्कार आता राज्यभरातील गाव-शहरांमध्ये शिकवला आणि राबवला जाणार आहे. जन्म, विवाह, यश, घरात होणारे मंगलकार्य एवढच कशाला घरात दुर्दैवाने कुणाचा मृत्यू झाला तर रोप लावून त्याची स्मृती जपण्याचा प्रयत्न रानमळा गावातील प्रत्येक कुटुंबाने केला आहे. घराच्या आजूबाजूला, मोकळ्या जागेत, परसबागेत, शेतीच्या बांधावर त्यांनी प्रत्येक क्षणाची आठवण वृक्षाच्या रूपातून जपली आहे. यामुळे गाव हिरवेगार तर झालेच पण प्रत्येक आठवणही चिरंतन झाली. रोप वाढले वृक्षात रूपांतरित झाले, फळाफुलांनी लगडून गेले.. ज्या कारणांसाठी रोप लावले त्याची स्मृती मनात खोलवर बिंबत गेली. 'वृक्षाची जोपासना हीच निसर्गाची उपासना' या योजनेत अशी रोपे लावली जातील. गावात जन्माला येणाऱ्या बालकाचे स्वागत त्याच्या कुटुंबीयांना रोपटे देऊन केले जाणार आहे. त्याला 'शुभेच्छा वृक्ष' असे नाव देण्यात आले आहे. बाळाचे झाड म्हणून ते रोपही बाळाबरोबर नक्की वाढेल हा त्यामागचा विश्वास आहे. गावात ज्या तरुणतरुणींचे विवाह होतील त्यांना शुभमंगल वृक्ष दिला जाईल. रोपाच्या रूपातून त्यांच्या नव्या आयुष्यासाठी शुभाशीर्वाद मिळतील.

गावातील जे विद्यार्थी- विद्यार्थिनी दहावी- बारावी पास होतील, गावातील ज्या तरुणतरुणींना नोकऱ्या मिळतील, जे युवक-युवती स्वत:चा रोजगार सुरू करतील. त्यांचा आनंद आणखी द्विगुणित व्हावा म्हणून, त्यांना आनंदवृक्ष देऊन गौरवले जाईल. लग्न होऊन सासरी गेलेल्या मुलीच्या हाताने तिच्या माहेरच्या अंगणात माहेरीची झाडी लावली जाईल. एखाद्या घरात व्यक्ती मृत्युमुखी पडली तर त्याच्या नावाने स्मृतीवृक्ष लावला जाईल. यातून त्याच्या स्मृतींचे जतन केले जाईल. म्हणजे थोडक्यात आठवण सुखाची असो की, दु:खाची ती वृक्षाच्या माध्यमातून जिवंत ठेवण्याचे काम या योजनेतून होणार आहे.

पर्यावरणप्रेमी व्यक्ती, उद्योजकांचा सामाजिक दायित्व निधी यातून ही रोपटी मिळवता येतील. वन तसेच सामाजिक वनीकरण शाखा किंवा महाराष्ट्र वन विकास महामंडळ यांच्याकडूनही सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध होऊ शकतील. खासगी रोपवाटिकांमधून ही रोपे मिळवता येतील. ग्रामपंचायतींना त्यांच्या उत्पन्नातून किंवा ग्रामनिधीतून हा खर्च भागवता येईल. १ जुलै ते ३० जून हे वर्ष गृहीत धरून जन्म, विवाह, देवाज्ञा अशा प्रसंगांच्या निमित्ताने झाडांची रोपे वाटता येतील. १ जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमात ज्या कुटुंबांना रोपे वाटायची आहेत, त्यांना टोकन दिले जाईल. वृक्ष संगोपन आणि पर्यावरण रक्षणाची प्रतिज्ञाही त्यानिमित्ताने घेतली जाईल.

**मिलिंद मधुकरराव उमरे**


देशातील विशाल क्षेत्रफळाचे तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य म्हणजे महाराष्ट्र. या राज्यात अतिशय समृद्ध वने आणि अनेक दुर्मीळ वन्यजीव आहेत. महाराष्ट्रात वनांचे ढोबळमानाने ५ प्रकार आहेत. यातील पहिला प्रकार आहे उष्ण प्रदेशीय निम सदाहरित वनांचा. ही वने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे जिल्ह्याचा पूर्व भाग, कोल्हापूर, सातारा, पुणे जिल्ह्याच्या पश्चिम भागात आढळतात. दुसऱ्या प्रकारातील उष्णप्रदेशीय आर्द्र पानझडीची वने भंडारा, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, धुळे, नंदुरबार आदी जिल्ह्यात आढळतात. तिसऱ्या प्रकारातील उष्ण प्रदेशीय शुष्क पानझडीची वने जळगाव, धुळे, बुलढाणा, अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया, अकोला या जिल्ह्यात आढळतात. उष्ण प्रदेशीय काटेरी वने महाराष्ट्राच्या काही भागात आढळतात. या वनांमध्ये बाभूळ, निवडुंग, बोर अशा प्रकारच्या काटेरी वृक्षांचे प्रमाण अधिक असते. पाचव्या प्रकारातील वने आहेत खारफुटीची वने. समुद्रातील भरती–ओहोटीच्या पाण्याच्या पातळीच्या दरम्यान, खाड्यांच्या मुखाशी दलदलयुक्त भूमीवर असलेल्या वनांना खारफुटीची वने म्हणतात. आपल्या महाराष्ट्राला सागरीकिनारा लाभल्याने, ही वनेसुद्धा आपल्याकडे आहेत. एकूण काय, हिमालयाचा बर्फ आणि राजस्थानचे वाळवंट सोडल्यास बहुतांश प्रकारची जंगले, जैवविविधता आणि वन्यजीव आपल्याकडे आहेत.

महाराष्ट्रातील समृद्ध वनात अनेक दुर्मीळ वृक्ष, वनस्पती, वेली आहेत. येथे काही विशेष वृक्ष आणि वनस्पतींची माहिती देत आहे.

**लेंझा किंवा मैदा लकडी:** या वनस्पतीचं शास्त्रीय नाव litsea

# समृद्ध वने आणि वन्यजीव

**महाराष्ट्रात अतिशय समृद्ध वने आणि अनेक दुर्मीळ वन्यजीव आहेत. महाराष्ट्रात वनांचे ढोबळमानाने ५ प्रकार आहेत. वन्यप्राण्यांच्या ८५ हून अधिक, पक्ष्यांच्या ५०० हून अधिक, सरीसृपांच्या १०० हून अधिक, माशांच्या सुमारे ७०० हून अधिक व कीटकांच्या २५००० हून अधिक प्रजाती आढळतात.**



glutinosa आहे. आपल्या सगळ्यांच्या परिचयाच्या असलेल्या च्यवनप्राशमधील हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. हाडांना जोडणारी वनस्पती म्हणूनही लेंझा ओळखली जाते. तसेच सूज, डोक्याची उष्णता, सांधेदुखी, खूप तहान लागणे, घशाचे आजार, वायुविकार अशा अनेक आजारांवर उपयोगी आहे.

**पिटवन:** uraria picta असं शास्त्रीय नाव असलेली ही वनस्पती अतिशय दुर्मीळ आहे. दशमूल, लघुपंचमूल आदी आयुर्वेदिक औषधात वनस्पती वापरतात. पिटवन त्रिदोषनाशक, वीर्यवर्धक, रेचक (पोट साफ करणारी), दाह, ताप, रक्तातिसार, वामननाशक, सर्दी, रक्तार्श (रक्ती मूळव्याध), भगंदर, पिलिया, अशा अनेक आजारांवर प्रभावी आहे.


पिटवन

**दुर्मीळ ऑर्किड :** महाराष्ट्रातील जंगलात ऑर्किडचे अनेक दुर्मीळ प्रकार आहेत. काही ऑर्किडची तर आंतरराष्ट्रीय बाजारात तस्करीसुद्धा होते. यातील nervilia plicata असं शास्त्रीय नाव असलेले एक सुंदर ऑर्किड आपल्या जंगलात आहे. याची एक विलक्षण गंमत म्हणजे याची उगवण्याची उफराटी पद्धत आहे. एरवी कोणतीही वनस्पती उगवते तेव्हा आधी पानं येतात, मग फुल, फळ वगैरे. पण या ऑर्किडच्या कंदातून आधी फूल उगवते. नंतर पाने येतात. याची पानेसुद्धा अतिशय सुंदर असतात.

**तिवस :** या वृक्षाचे शास्त्रीय नाव ougeinia oojeinensis आहे. तिवासाचे लाकूड अतिशय जड आणि मजबूत असते. त्यामुळे सागवाननंतर याचाच नंबर लागतो. हे लाकूड टिकाऊ असल्याने शेतीची औजारे तयार करण्यासाठी तिवसाचे लाकूड वापरतात. तिवस जंगलात कमीच दिसतो. त्याला खूप शोधावे लागते म्हणून 'जिथे निघतो दिवस, तिथे दिसतो तिवस' अशी म्हण प्रचलित आहे. म्हणजे रात्रभर शोध घेतलात तर दिवस उजाडताना तुम्हाला तिवस मिळेल.


वाघ


उंदीरहरीण


हुदाळे/पाणकुत्रे


शशकर्ण


तणमोर

गिधाड



**करू :** प्रचंड गर्दीत एखादी गोरीगोमटी, देखणी व्यक्ती असावी अगदी तसेच जंगलात हा करू वृक्ष असतो. याचे शास्त्रीय नाव Sterculia urens आहे. याला इंग्रजीत indian ghost tree म्हणजे भुताचे झाड म्हणतात. उन्हाळ्यात या वृक्षाची पाने गाळून जातात. संपूर्ण वृक्ष चकचकीत पांढरा होतो. त्यामुळे जंगलात रात्री फिरलात तर हे झाड एखाद्या भुतासारखे दिसते. या वृक्षाबद्दल आणखी विलक्षण बाब म्हणजे हा वृक्ष वर्षभरात तीन रंग बदलतो. पावसाळ्यात हिरवा दिसतो, हिवाळ्यात याच्यावर गुलाबी झाक दिसते, तर उन्हाळ्यात चकचकीत पांढरा दिसतो. काहीशा डोंगराळ भागात हा वृक्ष दिसून येतो. याचा डिंक उच्च दर्जाचा असून अतिशय महाग विकला जातो. या डिंकासाठीच अनेकदा या कोमल बुंध्याच्या वृक्षांवर कुऱ्हाडीने अनेक जखमा केल्या जातात. त्यामुळे या सुंदर वृक्षांचा मृत्यू होतो.


रोहित



**बिबा :** बिब्याला संस्कृतात भल्लातक असं नाव आहे. हा अनेक आजारांचे शमन करून रोग्याचे भले करणारा वृक्ष असला तरी बिब्यातील दाहक तेल प्रत्येकालाच

मानवेल असं नाही. त्यामुळे बिबा जपून वापरावा लागतो. याच्यापासून आयुर्वेदात भल्लातक तेल, भल्लातक हरितकी चूर्ण, भल्लातकासव अशी अनेक औषध तयार केली जातात. पायात चिखल्या होणे, डोक्यात चाई पडणे, शौचास चिकट होणे, फुफ्फुसाचे आजार यावर बिबा गुणकारी आहे.

**कीटकभक्षी वनस्पती :** आपण जीवशास्त्रात शिकलोय की, वनस्पती प्रकाश संस्लेषनाच्या क्रियेद्वारे आपले अन्न तयार करतात. शिवाय मातीतील अनेक अन्नघटक शोषून घेतात. पण काही वनस्पती मांसाहारी विशेषतः छोटे कीटक खाणारे असतात. त्यापैकी drosera indica ही आपल्या जंगलात आढळणारी दुर्मीळ वनस्पती आहे. इंग्रजीत हिला sundew असे एक नाव आहे. याचा अर्थ सूर्याचा दवबिंदू असा होतो. पण मराठीत याला गवती दवबिंदू म्हणतात. यांच्या अंगावर दवबिंदूप्रमाणे एक चिकट द्रव असतो. यांच्या जवळ येणारे कीटक या द्रवाला चिकटून या वनस्पतीच्या भक्ष्यस्थानी पडतात.

आपला महाराष्ट्र देशाच्या मध्यभागी आहे. काही जिल्हे तर उत्तर आणि दक्षिण भारताच्या तंतोतंत सीमारेषेवर आहेत. प्रदेशानुसार प्राणी, पक्षी यांचे अधिवास किंवा विणिचे स्थान ठरतात. म्हणजे उत्तर भारतातले फारसे पक्षी दक्षिण भारतात दिसत नाहीत. तर दक्षिणेतले उत्तर भारतात दिसत नाहीत. पण महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात या सीमारेषेचा संगम होत असल्याने दोन्हीकडचे दुर्मीळ वन्यजीव बघता येतात.

महाराष्ट्रात वन्यप्राण्यांच्या ८५ हून अधिक, पक्ष्यांच्या ५०० हून अधिक, सरीसृपांच्या १०० हून अधिक, माशांच्या सुमारे ७०० हून अधिक व कीटकांच्या २५,००० हून अधिक प्रजाती आढळतात. (संदर्भ : मराठी विश्वकोश). महाराष्ट्राने काही प्राणी, पक्षी, फुले आणि एका फुलपाखरालाही राज्यचिन्हाचा मान दिला आहे. यात महाराष्ट्राचा राज्यप्राणी शेकरू आहे. महाराष्ट्रात प्राण्यांमध्ये जंगलाची शान, अभिमान असलेले वाघ आहेतच. शिवाय बिबट, कोल्हा, चितळ, भेकर, रानडुक्कर, रानमांजर, रानगवे, काळवीट, नीलगाय, लांडगे, रानकुत्रे, चौशिंगा, चिंकारा, उडणारी खार, खवले मांजर आढळते. विशेष म्हणजे कर्नाटक – गोवा – महाराष्ट्र सीमेवर अनेकदा रानटी हत्ती आढळतात. कधीकाळी मध्य प्रदेश, महाराष्ट्रातील नागपूर, गोंदिया, गडचिरोली, आंध्रप्रदेश, बस्तर ते ओडिसा असा हत्तींचा भ्रमणमार्ग अस्तित्वात होता, असे अनेक वन्यजीव अभ्यासकांचे मत आहे. महत्त्वाचे म्हणजे सागरी किनारा लाभलेल्या कोकणात बऱ्याच ठिकाणी किंवा खाडीच्या मध्यावर डॉल्फिन व अनेक अद्‌भुत सागरीजीव हमखास दिसतात. महाराष्ट्रातील नवेगाव – नागझिरा भागात लाजवंती माकड या अनोख्या प्राण्याची नोंद झाली आहे. शिवाय अतिदुर्मीळ रानम्हशी गडचिरोली जिल्ह्याच्या सिरोंचा तालुक्यात आहेत. तसेच छोटे उंदीर, हरिण याच भागात आहे. पक्ष्यांमध्ये हरियल किंवा हरोळी हा महाराष्ट्राचा राज्यपक्षी आहे.

**वाघ :** कधीकाळी संपूर्ण भारतात ही जंगलातील जादूमुक्त विहार करायची. महाराष्ट्रातील प्रत्येक जंगलात वाघांची गगनभेदी डरकाळी घुमायची. वाघ केवळ एक प्राणीच नसून तो आपल्या संस्कृतीचा भाग झालाय. तो मेळघाटातील कोरकू आदिवासींचा लाडका कुलामामा असतो, खानदेशात सद्दुल बोवा अशा विलक्षण नावाने ओळखला जातो. माणूस वाघाला घाबरत असला तरी माणसावर वाघाची मोहिनी असतेच. म्हणून कळत–नकळत अनेक ठिकाणी माणसाने वाघाला स्थान दिले आहे. बहुतांश ठिकाणी वाघ दिसतो त्या ठिकाणाला वाघडोह, वाघनाला, वाघाई अशी नावे असतात. वाघाडे, वाघे, वाघमारे अशी अनेक आडनावेसुद्धा वाघांच्याच सन्मानार्थ असावीत असे वाटते. काहीजण आपल्या मुलाचे नाव शार्दूल ठेवतात. हेसुद्धा वाघाचेच संस्कृत भाषेतले नाव आहे. अतोनात शिकार आणि वृक्षतोडीने आक्रसलेल्या जंगलांमुळे वाघाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. विविध जंगलांना जोडणारे वाघांचे भ्रमणमार्ग कमी झाल्याने, वाघांची संख्याही कमी झाली. ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पासारख्या काही मर्यादित ठिकाणीच वाघ दिसतात. या पार्श्वभूमीवर राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हाती घेतलेला १३ कोटी वृक्षलागवडीचा उपक्रम अतिशय दूरदृष्टीचा आहे. या उपक्रमाला सर्वांनी सहकार्य केल्यास, वाघांसह अनेक दुर्मीळ वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास समृद्ध होतील. त्यांची संख्या निश्चितच वाढू शकेल.

**गिधाड :** सध्या जगभरात दुर्मीळ झालेले आणि जगभराचा चिंतेचा विषय असलेले निसर्गाचे सफाई कामगार अर्थात गिधाड पक्षी महाराष्ट्रात आपले अस्तित्व काही प्रमाणात टिकवून आहेत. महाराष्ट्रात साधारणतः ४ प्रजातीची गिधाडे आढळतात. यात लाल डोक्याचे किंवा राज गिधाड, लांब चोचीचे गिधाड, पांढऱ्या


सारस क्रौंच


काळा बिबट


घुबड


आग्या मण्यार

पाठीचे गिधाड, पांढरे गिधाड या प्रजातींचा समावेश आहे. सध्या गडचिरोली जिल्ह्यात गिधाड संरक्षणाचे कुशल उपक्रम राबवण्यात येत आहेत. गडचिरोलीचे मुख्य वनसंरक्षक डब्ल्यू. आय. यटबॉन यांच्या मार्गदर्शनात व उप वनसंरक्षक शिवाजी फुले यांच्या नेतृत्वात क्षेत्र सहायक मोतीराम चौधरी, क्षेत्र सहायक सालकर यांच्या अथक परिश्रमाने गिधाडांची संख्या २०० पर्यंत पोहोचली आहे. येथे गिधाड संरक्षणाचे अनेक उपक्रम राबवले जात आहेत. गडचिरोली जिल्ह्यात यातील लांब चोचीचे गिधाड, पांढऱ्या पाठीचे गिधाड दिसतात. चंद्रपूर जिल्ह्यात लाल डोक्याचे किंवा राज गिधाड, पांढरे गिधाड या प्रजातींच्या नोंदी आहेत. लांब चोचीचे गिधाड नोव्हेंबर ते मार्च या महिन्यात घरट्यात अंडी देतात. यांचे घरटे उंच पहाडावर कडेकपारीत असतात. मादी एकच अंड देते. पांढऱ्या पाठीच्या गिधाडाचा रंग काळपट तपकिरी असतो. हे गिधाड ऑक्टोबर ते मार्च दरम्यान एकच पांढऱ्या रंगाचे अंडे देते. डायक्लोफेन्याक हे जनावरांना देण्यात येणारी वेदनाशामक औषध, रासायनिक कीटकनाशकयुक्त चारा खाऊन मेलेली जनावरे, एकच अंडे घालणे या प्रकारामुळे या पक्ष्यांची संख्या अतिशय कमी झाली आहे. या पक्ष्याची संख्या वाढवण्यासाठी गडचिरोली वनविभागाच्या जिगरबाज प्रयत्नांना बळ देणे आवश्यक आहे.

**रानपिंगळा :** महाराष्ट्रातील अतिदुर्मीळ पक्षी म्हणजे रानपिंगळा. हा एक प्रदेशनिष्ठ पक्षी असून, जगात हा फक्त मध्यभारतातील सातपुडा पर्वतरांगांमधील पानगळीच्या विरळ जंगलात आढळतो. १८७२ मध्ये पक्षीशास्त्रज्ञ ए. ओ. ह्यूम यांनी या पिंगळ्याचे नामकरण शास्त्रज्ञ एफ. आर.ब्लेविट यांच्या सन्मानार्थ HETEROGLAUX BLEWITTI असे केले. १८७२ ते १८८४ या काळात याचे ७ नमुने गोळा करण्यात आले. १८८४ नंतर मात्र याला कुणीच पाहिले नव्हते. तब्बल ११३ वर्षांनी १९९७ मध्ये हा पक्षी नंदुरबार जिल्ह्यात तोरणमाळच्या जंगलात आढळून आला. याची नोंद सातपुड्यातील मेळघाट, नरनाळा, वान, यावल. तानसा आदी भागात घेण्यात आली आहे. या दुर्मीळ पक्ष्याला राज्यपक्ष्याचा दर्जा देण्याची मागणी होत आहे.

**जेर्डनचा धाविक :** अतिशय दुर्मीळ असलेल्या या पक्ष्याचा नमुना थोमास सी. जेर्डन या ब्रिटिश पक्षीशास्त्रज्ञाने गोदावरी आणि पेन्नार नदीच्या खोऱ्यातून १८४८ मध्ये संकलित केला. या पक्षिशास्त्रज्ञाच्या सन्मानार्थच या पक्ष्याला जेर्डनचा धाविक म्हणतात. जेर्डनच्या मते हा पक्षी आंध्र प्रदेशमधील नेल्लोर, कडप्पा, भद्राचलम, अनंतपूर आणि महाराष्ट्रातील गडचिरोली या जिल्ह्यातील सिरोंचा येथे दिसत असे. या जिल्ह्यांच्या मर्यादित भागातच दिसत असल्याने तो प्रदेशनिष्ठ असावा, असे त्याचे मत होते. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या भारतभूषण यांनी सिरोंचा – आंध्र प्रदेशमधील लंकामलईच्या जंगलात हा पक्षी जवळपास १०० वर्षांनंतर पुन्हा

**शेकरू :** लांब झुपकेदार शेपूट सावरत मोठ्या उंच वृक्षांवर चपळतेनं धावणारी काळसर, लालसर पाठीची, पिंगट पोटाची ही मोठी खार मुंबईपासून १३० किमी अंतरावर असलेल्या फणसाड अभयारण्यापासून; अगदी खाली तळकोकणात तसेच भीमाशंकर, महाबळेश्वर या भागात दिसते. पूर्व विदर्भात केवळ गडचिरोली जिल्ह्यातच ही खार आढळते. या मोठ्या खारीला घनदाट वनाची गरज असते. ती कधीच जमिनीवरून चालत नाही. एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडी मारत हे प्राणी बिनधास्त भटकतात. त्यांची घरटीसुद्धा अतिशय उंच झाडांवर असतात. या प्राण्यांना माणसाबद्दल कमालीची उत्सुकता असावी, कारण आपण शेकरूंच्या रानात त्यांना पाहायला गेलो तर आपण एका शेकरूला बघत असताना उंच झाडाच्या फांदीवर खाली डोके वर पाय करून, अनेक शेकरू आपल्याकडे टक लावून बघत असतात. त्यांच्या डोळ्यात विलक्षण भोळेपणा आणि कुतूहल दिसते.


शेकरू

**माळढोक :** या पक्ष्यासाठी खास नान्नज अभयारण्य आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात या पक्ष्यांची नोंद आहे. माळढोक पक्ष्याचे विणीच्या काळातील नृत्य विलोभनीय असते. एखाद्या बॅले डान्सरसारखे पदन्यास करत, नर त्याच्या मादीचा अनुनय करताना बघितले तर भान हरपते.


माळढोक

शोधला.

**सारस क्रौंच :** महाराष्ट्रात भारतातील सगळ्यात मोठा आणि जगातील सगळ्यात मोठा उडू शकणारा पक्षी सारस क्रौंच आहे. जवळपास ५ फूट उंच आणि १२ किलो वजनाचा हा महाकाय पक्षी हळव्या मनाचा आहे. सारस पक्ष्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची जोडी आयुष्यात एकदाच होते. नर, मादी परस्परांशी आयुष्यभर एकनिष्ठ असतात. समजा, काही कारणाने नर, मादीपैकी एका जोडीदाराचा मृत्यू झाला तर दुसरा जोडीदार अन्न, पाणी सोडून प्राणत्याग करतो. सध्या गोंदिया जिल्ह्यात या पक्षांची जपणूक होत आहे.

**रोहित :** मुंबई, ठाण्याच्या परिसरात मोठा रोहित, छोटा रोहित हे सुंदर पक्षी दिसतात. ते गुजराथ राज्यातून हिवाळ्यात येतात आणि पावसाळ्यापूर्वी परत जातात. हे पक्षी कच्छचे मोठे रण आहे तिथे हजारोच्या संख्येने घरटी करून अंडी घालतात. त्याची वीण तिथेच होते. यांना अग्निपंख असं एक नाव आहे. रोहित पक्ष्याची नोंद औरंगाबाद, नाशिक, पुणे, सोलापूर येथे झाली असून काही प्रमाणात अमरावती, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूरलाही नोंदी आहेत. यांच्या वक्राकार चोचीमुळे यांना समुद्रराघू असे एक गोंडस नाव आहे.

**आग्यामण्यार :** महाराष्ट्रात सापांच्या अनेक प्रजाती आढळतात. यात फण्यावर मोडी लिपीतील दहाचा आकडा असलेला नाग, गायीच्या खुराचे चिन्ह असलेला खुरी नाग, सापच ज्याचे खाद्य आहे असा अतिविषारी व अतिदुर्मीळ आग्यामण्यार हा साप विशेष आहे.




**लाजवंती माकड :** दिवसा झाडांच्या ढोलीत लपून बसणारे आणि रात्रीच्या काळोखात मंद हालचाली करत फिरणारे हे अद्भुत जनावर क्वचितच दिसू शकते. महाराष्ट्राचे जिम कॉर्बेट म्हणून प्रसिद्ध झालेले, अरण्यपुत्र माधवराव पाटील डोंगरवार यांचा नातू भीमसेन डोंगरवार याला हा निरागस टपोर डोळ्यांचा इवलासा जीव बघायला मिळाला. त्याने घेतलेले या प्राण्याचे छायाचित्र नवेगावबांधच्या तलावानजीकच्या उपाहारगृहात आपण बघू शकतो. या विलक्षण दुर्मीळ प्राण्याला लाजवंती माकड हे समर्पक नाव ख्यातनाम निसर्गलेखक मारुती चितमपल्ली यांनी दिले आहे.

**खवले मांजर :** अंगभर खवल्यांचे टणक चिलखत पांघरलेले खवले मांजर विलक्षण प्राणी आहे. याचं तोंड निमुळते आणि लहान असते. त्यामुळे याला मुंग्या, उधळी खायला आवडते. धोक्याची जाणीव होताच शरीराची गुंडाळी करून घेतो. एखाद्या चेंडूसारखा याचा आकार होतो. त्याला पुन्हा उलगडणे वाघालाही शक्य नसते. खवले मांजराच्या खवल्यांमध्ये अन्नात मिसळलेले विष ओळखण्याची क्षमता असते अशी एक अंधश्रद्धा आहे. अशा अनेक अंधश्रद्धामुळे या दुर्मीळ प्राण्याची शिकार होते.




नागापेक्षा अनेक पटीने विषारी असलेला हा साप पिवळ्या, काळ्या चकचकीत रंगानी सजलेला असतो. अतिविषारी असला तरी निसर्गाने त्याला अतिशांत स्वभाव दिला आहे. त्यामुळे या सापांच्या दंशाच्या घटना अतिशय कमी आहेत. गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यात याला ऐरंगबैरंग नावाने ओळखतात. या सापांचे संरक्षण करण्यासोबत त्यांच्यावर अधिक संशोधन करण्याची गरज आहे. उडता सोनसर्प, हा नितांत सुंदर दुर्मीळ साप काही भागांत आढळतो.

**उंदीरहरिण :** उंदीरहरिण नावाप्रमाणेच पिट्टुकले असते. या अतिदुर्मीळ चिमुकल्या हरिणाची लांबी असते २३ इंच म्हणजे दोन फुटसुद्धा नाही. वजन असते अवघे ३ किलो. दिसायला गोंडस असलेले हे हरिण निशाचर असल्यामुळे फार कमी दृष्टीस पडते. गडचिरोली जिल्ह्यात या दुर्मीळ जिवाची नोंद आहे. या प्राण्याचे संशोधन आणि संरक्षण गरजेचे आहे. याला पिसोरी असेही एक नाव आहे.

**रानम्हशी :** आय. यू. सी. एन.च्या लाल यादीत १९८६ पासून समाविष्ट असलेला हा अतिदुर्मीळ वन्यजीव पृथ्वीतलावरून लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. भारतासह नेपाळ, भूतान, थायलंड या देशात हा प्राणी दिसतो. एकशिंगी गेंड्यासाठी प्रसिद्ध असलेले काझीरंगा अभयारण्य, छत्तीसगड राज्यातील इंद्रावती राष्ट्रीय उद्यान आणि उदंती वन्यजीव अभयारण्य इथे हा प्राणी दिसतो. छत्तीसगड राज्याचा हा भाग बस्तर परिसरात येतो. या बस्तरला आपला गडचिरोली जिल्हा लागून आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या या सीमावर्ती जिल्ह्यात या दुर्मीळ रानम्हशी दिसून येतात. सिरोंचातील कोलामर्का परिसरातील जंगल या दुर्मीळ रानम्हशींसाठी संरक्षित करण्यात आले आहे.

**हुदाळे किंवा पाणकुत्रे :** पूर्वी महाराष्ट्रातील नद्यांमध्ये मोठ्या संख्येने असलेले हुदाळे आता दुर्मीळ झाले आहेत. वैनगंगा, गोदावरी नदी परिसरात हे दुर्मीळ प्राणी थोड्या संख्येत आहेत. पण

त्यांना शोधणे खूप कठीण झाले आहे. या प्राण्यांच्या आहारात ७० टक्के प्रमाणात मासे असतात. याशिवाय सरीसृप, बेडूक, कीटक, छोटे प्राणी खायलासुद्धा यांना आवडतात. खाद्य उपलब्ध असेल तर हे प्राणी वर्षभरात कधीही वीण घालतात. एरवी ऑक्टोबर ते फेब्रुवारी हा यांचा विणीचा हंगाम असतो. मिलनानंतर ६० ते ६३ दिवसांमध्ये मादी ५ पिलांना जन्म देते.

**शशकर्ण :** मार्जारकुळातला अतिचपळ व अतिदुर्मीळ असा हा प्राणी आहे. याचे उंच कान काहिसे सशासारखे असतात, म्हणून याला शशकर्ण हे नाव मिळाले आहे. २००६ पासून याचा अतिदुर्मीळ प्राण्यांच्या लाल यादीत समावेश आहे. अतिशय चपळ असलेले हे लांबकानी मांजर विजेच्या चपळाईने जमिनीजवळून उडणाऱ्या पक्ष्यांचीसुद्धा सहज शिकार करते.

**तणमोर :** काहीसा मोरासारखा दिसणारा हा माळरानातील अतिदुर्मीळ पक्षी आहे. याचा आकार अवघा ४५ सेंमी. असतो. महाराष्ट्रात अकोला, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यात या पक्ष्यांच्या नोंदी आहेत. नेपाळच्या तराईच्या प्रदेशातून हा पक्षी उन्हाळ्यात मध्य भारतात येतो. गुजरात, नैऋत्य राजस्थान, वायव्य महाराष्ट्र आणि पश्चिम मध्य प्रदेशाच्या शेतशिवारात हा पक्षी दिसतो. असे म्हणतात की, जिथे पारधी जमातीचे लोक असतात, तिथे हे पक्षी दिसतात. पारधी यांना जिवंत पकडण्यात निष्णात असतात. पण त्यांनाही आता हा पक्षी क्वचितच दिसतो. पारधी या पक्ष्याच्या नराला खलचिडा आणि मादीला भांडेवडी म्हणतात.


**काळा बिबट :** वाघांसाठी जगप्रसिद्ध असलेल्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात नुकतीच काळ्या बिबट्याची नोंद झाली आहे. वाघांना जपणाऱ्या या समृद्ध वनासाठी आणि वन्यजीव अभ्यासक व पर्यटकांसाठी ही आनंदवार्ता आहे. रूडयार्ड किपलिंग यांच्या 'मोगली' या अजरामर कादंबरीत बघिरा नावाचा काळा बिबट आहे. काही वर्षांपूर्वी याच कादंबरीवर बेतलेली मोगली ही मालिका दूरदर्शनवर आली होती. मागील वर्षी याच मोगलीवर एक हॉलीवूडपटही येऊन गेला. त्याचा सिक्वेल काही महिन्यात येणार आहे. त्यामुळे मोगलीला शिस्तीत जपणारा बघिरा सर्वांच्या लक्षात आहे. पण काळा बिबट ही बिबट्यांची वेगळी प्रजाती नाही. ही शरीरातील मेलानिन या रंगद्रव्याची कमाल आहे. रंग निर्धारण करणारे हे रंगद्रव्य अधिक असले की, त्या प्राण्याचा रंग गडद होतो. काही प्राण्यांमध्ये या रंगद्रव्याचा अभाव असतो तेव्हा ते चक्क पांढरे दिसतात. असे पांढरे वाघ, मोर, साप, चितळ आपल्याला माहित असतील. रेवा संस्थानच्या अशाच पांढऱ्या वाघांचा संकर घडवून अनेक पांढरे वाघ निर्माण केले होते. त्यातील काही इंग्लंडच्या राणीला भेट दिले होते. तो एक मोठा इतिहास आहे. असो. असे बघिरा बघणे आणि जपणे अत्यावश्यक आहे.

संपर्क: ०९४२३४२२३४८

महाराष्ट्राला भौगोलिकदृष्ट्या निसर्गाचा वरदहस्त लाभलेला आहे. पूर्वेला घनदाट जंगले, उत्तरेला सातपुड्याच्या पर्वत रांगा, पश्चिमेला सह्याद्री व अरबी समुद्राच्या किनाऱ्यामुळे निसर्ग पर्यटनाला प्रचंड वाव आहे. राज्यातील २० टक्के भौगोलिक क्षेत्र वनक्षेत्र आहे. मध्य भारतातील पानगळीचे जंगल तसेच देशाचेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय व्याघ्र राजधानी म्हणून नागपूर शहर गौरवले जाते. नागपूर शहर व त्यालगत असलेले मेळघाट, ताडोबा, पेंच, नवेगांव-नागझिरा व बोरधरण व्याघ्र प्रकल्प आणि एकूणच विदर्भातील अतिशय संपन्न अशी जंगले, सातपुड्यातील चित्त वेधून घेणारी वनराई, मध्य भारतात आढळणाऱ्या जवळपास सर्वच वन्यप्राण्यांचा आढळ तसेच गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचाजवळ वर्धम येथे विपुल प्रमाणात आढळून येत असलेले जीवाष्म, छत्तीसगडच्या सीमेवरील गडचिरोली जिल्ह्यातील सदाहरित वने यामुळे विदर्भाच्या रूपाने एक निसर्गसंपन्न वारसा या

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना झाली. यामुळे राज्यातील निसर्ग पर्यटन विकासाच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. वन्यजीव क्षेत्र, निसर्गसंपन्न वनक्षेत्र, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे, जैवविविधता उद्याने, निसर्ग पर्यटन केंद्र, सागरी अभयारण्य, पक्षी अभयारण्य, देवराई इत्यादी ३२० निसर्ग पर्यटन स्थळांची यादी तयार करण्यात आली आहे.**

# वन भ्रमंती



पिढीला प्राप्त झाला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर हे उल्कापातामुळे निर्माण झालेले अतिशय महत्त्वाचे व जगप्रसिद्ध सरोवर देशी व विदेशी पर्यटकांचे विशेष आकर्षण आहे.

### पर्यटकांचे पाऊल जंगलाकडे

मराठवाड्यातील वेरूळ, अजिंठा हे जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त पर्यटन स्थळ, सहस्त्रकुंड धबधबा, गौताळा औट्रमघाट अभयारण्य, जायकवाडी पक्षी अभयारण्य, तसेच दौलताबाद यांसारख्या यादवकालीन ऐतिहासिक किल्ल्यांचा निसर्ग पर्यटनस्थळांमध्ये समावेश आहे. धुळे जिल्ह्यातील तोरणमाळ, लळींगकुरण यावल अभयारण्य, जळगाव शहरातील लांडोरखोरी ही स्थळे तर निसर्ग पर्यटकांकरिता पर्वणीच आहेत. पश्चिम महाराष्ट्रात सह्याद्री व त्याचे उंच आकाशाला भिडणारे सुळके आणि पश्चिम घाटातील सदाहरित वने, कोकणचे निसर्गसंपन्न सागरी किनारे व त्यातील अतिशय मनमोहक, चित्तवेधक सागरी जीवाणू, मुंबई, पुणे, नाशिक या काँक्रिटच्या जगतातील नागरिकांकरिता एक मोठे उर्जास्त्रोत आहे. राधानगरी अभयारण्य, चांदोली राष्ट्रीय उद्यान, कोयना अभयारण्य, कोयना धरण यांचा समावेश असलेला सह्याद्री व्याघ्र प्रकल्प निसर्गात आढळणाऱ्या अतिशय दुर्मीळ वन्य जीवांचे माहेरघरच आहे. आता तर डोडामार्ग येथे वन्यहत्ती यांनी आपला कायम निवारा केला आहे. याच सह्याद्री पर्वतराजींमध्ये शिवकालीन ३०० पेक्षा जास्त डोंगरी किल्ल्यांचा समावेश आहे. सह्याद्रीचे उंच आकाशात भिडणारे सुळके, साहसी पर्यटकांना नेहमीच आकर्षित करत असतात. अनेक पर्वतारोहण संस्थांच्या माध्यमातून ते सह्याद्रीच्या खांद्यामाथ्यावर खेळण्यास उत्सुक असतात. येथील वनराजी वर्षभर सातत्याने या ना त्या रानमेव्यांनी भरलेली असते. जांभळाएवढी करवंदे, गोड जांभळे, टेंभरे, रानबोर यांना चाखण्याकरिता हौशी पर्यटकांची पावले आपसुकच या जंगलाकडे वळतात. याशिवाय वनक्षेत्रांमध्ये असलेली रेणुका माता माहुरगड, सप्तश्रृंगी यांसारखी अत्यंत महत्त्वाची अशी धार्मिक स्थळे पर्यटकांचे व भाविकांचे आकर्षण केंद्र आहेत.

### ३२० निसर्ग पर्यटनस्थळे

महाराष्ट्रात एकूण ३२० निसर्ग पर्यटन स्थळांमध्ये ६ व्याघ्र प्रकल्प, ६१ राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये व संवर्धन राखीव आहेत.

वन उद्याने (११४), किल्ले (३७), वारसा स्थळ (१), व्याघ्र राखीव (६), वन्यजीव अभयारण्य (३३), धार्मिक स्थळ (४९), राष्ट्रीय उद्याने (१), निसर्ग पर्यटन स्थळे (५०), हिल स्टेशन (५), पाणथळ क्षेत्र (११), जैवविविधता उद्याने (४), जलाशय (२), संवर्धन राखीव (७), एकूण (३२०).



### जलाशयांची वनक्षेत्रांमध्ये निर्मिती

पाण्यासाठी प्रमुख स्रोत म्हणून मोठमोठ्या जलाशयांची निर्मिती करण्यात आलेली आहे व बहुतांश जलाशये वनक्षेत्रांमध्ये आहेत. तोतलाडोह, नवेगांव खैरी पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये इरई धरण, ताडोबा व्याघ्र प्रकल्प, भातसा–तानसा अभयारण्य, कोयना धरण, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, मुंबई शहराला पाणी पुरवठा करणारा तुळशी तलाव संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात असून; यांसारख्या अनेक लहानमोठ्या जलाशयांची वनक्षेत्रांमध्ये निर्मिती करण्यात आली आहे. कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात जलक्रीडा, नौकाविहार इत्यादीकरिता वाव आहे.

हा निसर्गसंपदेचा वारसा अबाधितपणे पुढील पिढीला हस्तांतरित करणे, स्थानिकांना निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार संधी उपलब्ध करून देणे, पर्यटकांकरिता किमान आवश्यक सोईसुविधा निर्माण करणे व स्थानिकांच्या सहभागाने स्वयंचलित पद्धतीने ही निसर्ग पर्यटनस्थळे विकसित करणे, या उद्देशाने २००८ साली राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण जाहीर केले.

### महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची रचना द्विस्तरीय असून, शासन स्तरावर वनमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ व प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बलप्रमुख) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीद्वारे मंडळाचे कार्यसंचालन करण्यात येते. यामध्ये निसर्ग पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञ, वास्तुशास्त्रज्ञ, निसर्ग पर्यटन क्षेत्रात कामे करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी, वानिकी क्षेत्रातील तज्ज्ञ, इत्यादी अशासकीय व्यक्तींचा समावेश आहे. वन विभागातील क्षेत्रीय अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्राचा विकास करण्याच्या दृष्टीने तज्ज्ञांकडून आराखडे तयार करणे, त्यांचे मंडळाच्या कार्यकारी समितीपुढे सादरीकरण व मान्यता घेऊन; विकासकामे करत असतात. याकरिता आवश्यक अनुदान

राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजना, आदिवासी उपयोजना, उद्योग क्षेत्रातील सामाजिक जबाबदारी (सीएसआर) प्राप्त निधी, याद्वारे प्राप्त निधीतून विकास कामे करण्यात येतात.

### १७२ पर्यटनस्थळांच्या आराखड्यांना मान्यता

सद्य:स्थितीत राज्यातील १७२ पर्यटन स्थळांच्या आराखड्यांना तज्ज्ञ समिती व कार्यकारी समितीद्वारे मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यापैकी १२० स्थळांवर विकासकामे सुरू आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मेळघाट, ताडोबा, पेंच, सह्याद्री या व्याघ्र प्रकल्पांचा व नाशिक, औरंगाबाद, पुणे, ठाणे, कोल्हापूर, धुळे वनवृत्तातील वन्यजीव अभयारण्ये यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे रेणुकामाता आंबेजोगाई, औंढानागनाथ हिंगोली, जिंतूर नेमगिरी, श्रीक्षेत्र पिंपळश्वर देवस्थान मौजे वेरोली, ओझरखेड, चिंतामुनेश्वर पारडसिंगा, कानिफनाथ मंदीर, जेजुरी मार्तंड खंडोबा, भांबुर्डा हनुमान टेकडी पुणे, पोहरादेवी श्रीसंत सेवालाल महाराज समाधी इत्यादी प्रमुख स्थळांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे आशेरीगड व रायगड किल्ला, वेरूळ, दौलताबाद, गुलशन महल, अजिंठा, राजदेर किल्ला, हत्तीचांदोर घोडप किल्ला, राजगड, तोरणगड, रोहिंदा व रायरेश्वर किल्ला, शिवनेरी व इतर किल्ले या ऐतिहासिक स्थळांचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा जवळील वर्धम फॉसील पार्क, महादेव वन भीमाशंकर, तुळशी वृंदावन, पंढरपूर, नागपूर येथील अंबाझरी, सेमिनरी हिल्स वनोद्यान, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, लांडोरखोरी वनोद्यान, जळगांव; बांबू वनोद्यान, अमरावती, चिखलदरा, घोडाझरी तलाव, अवसरीघाट वनोद्यान, हिरडापाडा धबधबा, आहुपे इत्यादी पर्यटनस्थळांचा समावेश आहे.


वन पर्यटनाचा आनंद घेणारी मुले.

### निसर्गानुभव

वनविभागाकडून निसर्गानुभव कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व आश्रमशाळेतील २००० शालेय विद्यार्थ्यांना एक दिवसाकरिता वनक्षेत्रामध्ये सहल घडवून आणण्यात येते. त्यात त्यांना वनांबाबतीत माहिती व वनांचे, वन्यप्राण्यांचे महत्त्व पटवून देण्यात येते. याकरिता अशासकीय संस्था/तज्ज्ञ व वन अधिकारी, कर्मचारी, जिल्हा परिषद व आदिवासी विकास विभागाचा सहभाग घेण्यात येतो. हा कार्यक्रम आतापर्यंत नागपूर वन विभाग, चंद्रपूर वन वृत्त, गडचिरोली वृत्त व गोंदिया वन विभागात राबवण्यात आला असून, त्याला उत्तम प्रतिसाद लाभलेला आहे. २०१७-१८ मध्ये निसर्गानुभव कार्यक्रम राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये राबवण्याचे प्रस्तावित आहे. जेणेकरून अंदाजे ७० हजार विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश करून घेणे शक्य होईल. मंडळाद्वारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे संकेतस्थळ तसेच मोबाइल ॲप विकसित करण्यात येत आहे.

### रोजगार संधी

राज्य वनपर्यटन धोरणाला सुसंगत, निसर्ग पर्यटनस्थळांचा विकास करण्यात येत आहे. स्थानिकांच्या सहभागाने बेरोजगार युवकांसाठी मोठ्या प्रमाणात मार्गदर्शक, चालक, रिसॉर्टमधील विविध स्वरूपाची कामे या माध्यमातून रोजगार निर्मिती तसेच स्थानिक संसाधनांचा वापर करून त्याद्वारे बनवण्यात येणाऱ्या वस्तू, कलाकृती तयार करण्याचे प्रशिक्षण, वनौषधी तयार करणे व विक्री करणे, बांबूवर आधारित उद्योग, त्याचे प्रशिक्षण याद्वारे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यात येत आहे. पर्यटनस्थळांचे संरक्षण करून स्थानिक वनव्यवस्थापन/ग्राम परिसर समितीला उत्पन्नाचे स्रोत, लोकांना रोजगाराच्या संधी, पर्यटकांकरिता नवनवीन दालने, उत्पादने, या बाबी साध्य करण्यात मंडळाला निश्चितपणे यश प्राप्त झाले आहे. ताडोबा; मेळघाट; पेंच या वन्यजीव क्षेत्राव्यतिरिक्त गोंदिया जिल्ह्यातील हाजराफॉल धबधबा, शहापूर विभागातील वाफा निसर्ग पर्यटनस्थळ, बांबू उद्यान अमरावती, गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचाजवळील वर्धम फॉसील पार्क, लांडोरखोरी, जळगाव ही पर्यटकांच्या दृष्टीने आकर्षणाचे केंद्रे आहेत.

### निसर्गभ्रमण योजना

महाराष्ट्रातील अनेक शेतकरी, खासगी उद्योजक तसेच अशासकीय संस्था वनपर्यटनाच्या क्षेत्रामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पर्यटकांना महाराष्ट्राचे वनवैभव तसेच वनपर्यटनाची ओळख करून देणे व वन तथा वन्यजीवविषयक काही बाबींसाठी वेगळा अनुभव घेऊ देण्यास उपयोगी ठरू शकतात. या वनातून पदभ्रमण, पक्ष्यांची ओळख, रोपवाटिका पर्यटन, साहसी खेळ, वनस्पतींची ओळख तसेच वनाशी संबंधित इतर गतिविधी यांचा समावेश केला जाऊ शकतो. वनपर्यटन क्षेत्रात अशा उपक्रमांना एका छत्राखाली आणण्याकरिता, तसेच वनपर्यटनाला चालना देण्याकरिता; इच्छुक शेतकरी, उद्योजक आणि अशासकीय संस्थांना महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडे नोंदणी करण्यास परवानगी दिली आहे.

नोंदी

## खातेधारकांच्या बँक खात्यात १४,९८३ कोटी रक्कम जमा




**छत्रपती** शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत आतापर्यंत ३८ लाख ५२ हजार खातेधारकांच्या बँक खात्यात १४ हजार ९८३ कोटी रक्कम जमा करण्यात आली आहे. या योजनेत सहभागी होण्याची व ऑनलाइन अर्ज करण्याची १५ जून ही अंतिम तारीख होती. राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्यासाठी राज्य सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ जाहीर केली होती. मुख्यमंत्री महोदयांनी यापूर्वी १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००९ या कालावधीत थकबाकीदार असलेल्या परंतु २००८ आणि २००९ च्या कर्जमाफी योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश करण्याची घोषणा केली होती. तसेच २००१ ते २०१६ या कालावधीत इमूपालन, शेडनेट आणि पॉलिहाऊस अशा मध्यम मुदतीचे कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ देण्याचा निर्णय घेतला होता. या योजनेत आतापर्यंत ३८ लाख ५२ हजार खातेधारकांच्या बँक खात्यावर कर्जाची रक्कम जमा करण्यात आली आहे.

## खरीप हंगामासाठी बियाणे आणि खतांची उपलब्धता



**खरीप** हंगामासाठी कृषी विभागाकडे बियाणे आणि खतांची कोणतीही कमतरता नाही. शेतकऱ्यांना गरजेनुसार त्याची पूर्तता केली जाईल. पीक विम्यासाठी नोंदणी सुरू झाली असून, शेतकऱ्यांनी त्याचा वेळेत लाभ घ्यावा, असे आवाहनही शासनामार्फत करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपलं सरकार' केंद्रामार्फत, किंवा कर्ज घेतलेल्या बँकांमार्फत २४ जुलैपर्यंत पीक विम्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी पावसाचा अजूक अंदाज व जमिनीचा ओलावा विचारात घेऊनच, पेरणीची प्रक्रिया सुरू करावी. तसेच, शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त आंतरपिके घेण्याला प्राधान्य द्यावे. शिवाय, खते आणि कीटकनाशकांचा वापर तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसारच करावा, अशी सूचना कृषी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

## तंत्र शिक्षण मंडळाची शैक्षणिक प्रमाणपत्रे आता ऑनलाइन

**महाराष्ट्र** राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व पदविका प्रमाणपत्रप्राप्त विद्यार्थ्यांची अंदाजे ९ लाख शैक्षणिक प्रमाणपत्रे राष्ट्रीय शैक्षणिक डिपॉझिटरीवर डिजीटल पद्धतीने नोंदणी करून जतन करून ठेवण्यात येणार आहेत.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय व विश्वविद्यालय अनुदान आयोग यांच्या डिजीटल इंडियाच्या धोरणानुसार, ही नऊ लाख शैक्षणिक प्रमाणपत्रे राष्ट्रीय शैक्षणिक डिपॉझिटरीवर डिजीटल पद्धतीने नोंदणी करून जतन करून ठेवण्यात येणार आहेत. प्रमाणपत्रातील माहितीची सत्यता, सचोटी, गोपनीयता व सुरक्षतेची पूर्णपणे काळजी घेतली जाईल. या सेवेद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्राची डिजीटल अथवा प्रिंटेड कॉपी विनासायास उपलब्ध होईल.

तसेच सर्व संबंधित भागधारक व सत्यापकांना राष्ट्रीय शैक्षणिक डिपॉझिटरीमार्फत विद्यार्थ्यांच्या संमतीने ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रमाणपत्रांची सत्यता तात्काळ पडताळून पाहणे शक्य होईल.

## हरित इमारत : महाराष्ट्राची आघाडी

**राज्य** शासनाच्या सर्व इमारती हरित इमारत (ग्रीन बिल्डिंग) या संकल्पनेनुसार बांधण्याचा निर्णय दोन वर्षांपूर्वी घेण्यात आला. या संकल्पनेबाबत इमारतींचे मानांकन करण्याबाबतचे प्रशिक्षण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनांतर्गत ग्रीहा कौन्सिल यांच्यात सामंजस्य करार (एम.ओ.यु.) करण्यात आला. देशात प्रथमच अशा कराराचा मान महाराष्ट्राला मिळाला आहे.

केंद्र शासनाने पर्यावरणपूरक हरित इमारतींच्या उभारणीला चालना देण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा (नोडल एजन्सी) म्हणून



राज्य शासनाला पहिला मान दिला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते, वास्तू विशारद यांना प्रशिक्षित केल्यामुळे हरित इमारती उभारणीसाठी चालना मिळणार आहे. हरित इमारतींच्या बांधकामामुळे जागतिक तापमानवाढीला कारणीभूत पर्यावरणास हानी पोहोचवणाऱ्या वायूंचे उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल.

**राज्यातील पायाभूत सुविधांसह इतर क्षेत्रातील महत्त्वाचे उपक्रम व प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कॅनडा व अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यातील महत्त्वपूर्ण घडामोडींचा थोडक्यात आढावा..**


## धारावी पुनर्वसन

**दुबईतील** प्रसिद्ध एमबीएम समूहाने मुंबईतील धारावी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासह, राज्यातील विविध नागरी पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये महाराष्ट्राला सहकार्य करण्यास सहमती दाखवली आहे. तर डीपी वर्ल्ड समूहाने मल्टिमॉडल लॉजिस्टिक पार्कच्या उभारणीत आणि थुम्बे समूहाने आरोग्य क्षेत्रातील उपक्रमांमध्ये सहयोग देण्याची तयारी दाखवली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दुबईत या तिन्ही समूहांशी या संदर्भात सकारात्मक चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांची डीपी वर्ल्डचे समूह अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुलतान अहमद बिन सुलायेम यांच्याशी चर्चा झाली. डीपी वर्ल्डने राज्य सरकारसोबत मल्टिमॉडल लॉजिस्टिक पार्कच्या उभारणीत योगदान देण्याची तयारी दर्शविली. विशेषत: नागपुरात काम करण्यास हा समूह उत्सुक आहे. डीपी वर्ल्ड ही जगातील आघाडीची कंपनी राष्ट्रीय गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निधीमध्ये (एनआयआयएफ) भागीदार असलेली कंपनी आहे. एमबीएम समूहाचे चेअरमन शेख मोहम्मद बिन जुमा अल मक्तुम यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. मुंबईतील धारावी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासह राज्यातील विविध नागरी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी सहकार्य करण्याविषयी शेख मोहम्मद बिन जुमा अल मक्तुम यांनी या भेटीत सहमती दाखवली.

थुम्बे समूहाचे संस्थापक अध्यक्ष थुम्बे मोईदीन यांनी श्री. फडणवीस यांची भेट घेतली. महाराष्ट्र सरकारसोबत आरोग्यसुविधा क्षेत्रात काम करण्याची तसेच यासंदर्भात सामंजस्य करार करण्याचीही तयारी त्यांनी दर्शवली आहे.

## रस्ते सुरक्षिततेसाठी 'ब्लूमबर्ग'चे सहकार्य

**राज्यातील** रस्ते सुरक्षिततेसाठी ब्लूमबर्ग समूहातर्फे देण्यात येत असलेले सहकार्य अधिक व्यापक करण्याचा निर्णय घेण्यात आला. न्यूयॉर्क येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ब्लूमबर्गचे मुख्य कार्यकारी अधिकारी माईक ब्लूमबर्ग यांच्याशी यासंदर्भात नुकतीच महत्त्वपूर्ण चर्चा झाली.



ब्लुमबर्गचे मुख्य कार्यकारी अधिकारी माइक ब्लुमबर्ग यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

राज्यातील रस्ते सुरक्षिततेबाबतच्या उपक्रमांना ब्लूमबर्गचे मोठे पाठबळ लाभले आहे. त्याबाबत या समूहाशी फेब्रुवारी २०१५ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला होता. या करारानुसार झालेल्या उपाययोजनांमुळे रस्ते अपघातांच्या प्रमाणात लक्षणीय घट होण्याबरोबरच अशा घटनांमधील जीवितहानी देखील कमी करण्यात यश आले आहे. महाराष्ट्रासोबतच्या सहकार्याची व्याप्ती वाढवितानाच राज्याच्या फिनटेक क्षेत्रातील स्टार्टअप कंपन्यांसोबत संयुक्तरीत्या काम करण्याचा मनोदय श्री. ब्लूमबर्ग यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राने देशातील अग्रेसरत्व पुन्हा सिद्ध केले असून, देशाच्या विकासयात्रेचा अग्रदूत म्हणून महाराष्ट्र सध्या महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विविध क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पामुळे मुंबई आपली ओळख कायम राखून, अत्यंत गतीने परिवर्तन अनुभवत आहे; असे उद्गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

## महाराष्ट्र-क्युबेकमध्ये आर्थिक सहकार्य करार

**महाराष्ट्र** आणि कॅनडाच्या क्युबेक प्रांतातील आर्थिक सहकार्य अधिक दृढ होणार असून माहिती-तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, एरोनॉटिक्स, ऊर्जा, आर्टिफिशियल इंटिलिजन्स आणि आदिवासी कल्याण आदी क्षेत्रातील व्यापक सहकार्याबाबतच्या महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि क्युबेकचे प्रधानमंत्री फिलिप क्युलार्ड यांनी स्वाक्षरी केली. यासोबतच निधी व्यवस्थापनातील सीडीपीक्यू या संस्थेसह बॉम्बार्डिअर या उद्योगाने महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली आहे. मॉन्ट्रिएल येथे मुख्यमंत्र्यांनी श्री. क्युलार्ड यांची भेट घेतली. सीडीपीक्यूचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मायकेल साबिया यांचीही मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. भारतातील काही संस्थांशी भागीदारी करण्याबरोबरच रिटेल व्यावसायिकांसोबत काम करण्याचा सीडीपीक्यूचा मानस आहे. महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, लॉजिस्टिक पार्क इत्यादी क्षेत्रात असलेल्या गुंतवणुकीच्या अमाप संधींची मुख्यमंत्र्यांनी या वेळी माहिती दिली.


क्युबेकचे प्रधानमंत्री फिलिप क्युलार्ड यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

### राज्य प्रकल्पांना जागतिक बँकेचे साहाय्य

जागतिक बँकेने राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांना आर्थिक सहकार्याची तयारी दर्शविली असून फोर्ड मोबिलिटी कंपनीकडून एकीकृत वाहतूक व्यवस्थेसाठी सेंटर ऑफ एक्सलन्सच्या उभारणीसाठी गुंतवणूक करण्यात येणार आहे.

फोर्ड मोबिलिटीच्या कार्यकारी उपाध्यक्ष आणि अध्यक्षा मर्सी क्लेव्होर्न तसेच मोबिलिटी मार्केटिंग अँण्ड ग्रोथचे उपाध्यक्ष ब्रेट व्हेटली यांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली. राज्यातील एकीकृत वाहतूक व्यवस्थेसाठी सेंटर ऑफ एक्सलन्सच्या उभारणीसाठी ५० दशलक्ष डॉलर्स (सुमारे ३४१ कोटी रुपये) इतक्या गुंतवणुकीचा प्रस्ताव या समूहाने दिला आहे. राज्यात स्मार्ट मोबिलिटी प्लान तयार करण्याच्या दृष्टीने हे सेंटर उपयुक्त ठरणार आहे. यापूर्वी एमएमआरडीए आणि फोर्ड यांच्यात २४ नोव्हेंबर २०१७ रोजी एका करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. त्यानुसार फोर्डने आपल्या निधीतून बसेस, रेल्वे, मेट्रो, ऑटो, टॅक्सी या सर्व वाहतूक साधनांचा समावेश असलेल्या प्रवाशांसाठीच्या सामायिक आराखड्याचा प्राथमिक अभ्यास केला आहे. त्याचप्रमाणे जॉन्सन कंट्रोल्स कंपनीने भारतात इंटिलिजन्ट ट्राफिक कंट्रोल सिस्टिम्ससाठी गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली.



**अमेरिकेतील** जॉर्जटाऊन युनिव्हर्सिटी, इंडिया इनिशिटिव्ह आणि सेंटर फॉर इंटरनॅशनल स्टडीज यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वॉशिंग्टन येथे 'आऊटस्टँडिंग लिडरशिप इन डेव्हलपमेंट' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

### मल्टिमॉडल कॉरिडॉर

मुंबई महानगर क्षेत्रात मल्टिमॉडल ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर निर्माण करण्यासह राज्यातील ग्रामीण उपजीविका प्रकल्प, सौरऊर्जा ग्रीड, दुष्काळ निवारण यांसारख्या उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जागतिक बँक सहकार्य करणार आहे. जागतिक बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी क्रिस्टलिना जॉर्जिव्हा आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वॉशिंग्टन येथे झालेल्या भेटीत या संदर्भातील निर्णय घेण्यात आला.

### महाराष्ट्राची गगनभरारी

यूएस-इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरमतर्फे (यूएसआयएसपीएफ) आयोजित बिझनेस फोरमला मुख्यमंत्री फडणवीस उपस्थित होते. या वेळी उपस्थितांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राची गगनभरारी आणि पायाभूत सुविधांवर आधारित विकासाचे मॉडेल या विषयांवर प्रकाश टाकला.

## मुंबई-पुणे मार्गावर वेगवान रेल्वे प्रकल्प




**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत व्हर्जिन हायपर लूपचे अधिकारी.**

मुंबई-पुणे मार्गावर हायपरलूप तंत्रज्ञानावर आधारित अतिवेगवान रेल्वे प्रकल्पाची उभारणी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जिन हायपूरलूप कंपनीच्या अमेरिकेतील चाचणी केंद्राला भेट देऊन संबंधितांशी चर्चा केली. मुंबई-पुणे या मार्गावर हायपरलूप तंत्रज्ञानावर आधारित अतिवेगवान रेल्वे प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला आहे. या प्रकल्पासाठी पीएमआरडीएने पहिल्या टप्प्यात १५ किलोमीटरचा प्रायोगिक मार्ग (ट्रॅक) निश्चित केला आहे. मुंबई-पुणे अंतर केवळ २० मिनिटांवर आणणाऱ्या या तंत्रज्ञानासाठी, आवश्यक असणारी ७० टक्के सामग्री आणि उपकरण हे महाराष्ट्रातच उपलब्ध होऊ शकणार आहेत. या १०० टक्के इलेक्ट्रिक व कार्यक्षम प्रणालीमुळे दीड लाख टन कार्बनचे उत्सर्जन प्रतिवर्षी कमी होणार असून वेळेची बचत, पर्यावरण रक्षण, अपघातांच्या संख्येत घट, वाहतूक कोंडीतून सुटका असे अनेक सामाजिक व आर्थिक फायदेसुद्धा होणार आहेत.

**सायबर सुरक्षा: सिमॅन्टेकशी करार :** राज्य सरकारचा माहिती-तंत्रज्ञान विभाग आणि 'सिमॅन्टेक' यांच्यात सायबर सुरक्षेसंदर्भात एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सायबर पोलिसिंग संदर्भात 'सिमॅन्टेक' आणि गृहविभाग यांच्यात संयुक्त कृतिदल स्थापन करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. या माध्यमातून यापूर्वीच स्थापन करण्यात आलेल्या सायबर लॅबची क्षमतावृद्धी आणि विकास साध्य होणार आहे.

नोंदी

# येथे कर माझे जुळती...



**जुलै महिन्यात शासकीय व निमशासकीय स्तरावर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि वसंतराव नाईक यांची जयंती साजरी केली जाते. त्यांचे पुण्यस्मरण...**

### लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!' अशी सिंहगर्जना करत स्वराज्यासाठी लढणारे थोर / लढवय्ये नेते लोकमान्य टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी झाला. रत्नागिरीतील चिखलगाव या गावी जन्मलेला 'केशव','बाळ' म्हणूनच ओळखला जाऊ लागला. त्यांच्या वडिलांचे नाव गंगाधरराव तर आईच नाव पार्वताबाई होते. टिळकांनी बी.ए. तसेच एल.एल.बीची पदवी घेतली. महाविद्यालयात असताना त्यांची आगरकरांशी मैत्री झाली. याच दरम्यान निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी सरकारी नोकरी सोडून शाळा सुरू करण्याचा चंग बांधला होता. टिळक आणि आगरकरांनीही त्यात सक्रिय सहभाग घेतला आणि १ जानेवारी १८८० रोजी न्यू इंग्लिश स्कूलची मुहूर्तमेढ रोवली गेली. या त्रयींनी मिळून १८८१ मध्ये केसरी (मराठी) आणि मराठा (इंग्रजी) अशी दोन वृत्तपत्रे सुरू केली. सुरुवातीला टिळक मराठाचे संपादक होते तर केसरीची धुरा आगरकरांनी सांभाळली.



१८८४ मध्ये वेंडरबर्न, वर्डस्वर्थ, मंडलिक, तेलंग, दांडेकर, य. मो. केळकर, भांडारकर आदींच्या मदतीने टिळक व आगरकरांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेतर्फे १८८५ साली फर्ग्युसन महाविद्यालय सुरू करण्यात आले.

स्वातंत्र्यलढ्यात सर्वसामान्यांना सहभागी करून घेण्यासाठी, जनजागृतीचे माध्यम म्हणून गणेशोत्सव आणि शिवजयंती या उत्सवांना सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप देण्याचे श्रेय टिळकांना जाते. मंडालेच्या तुरुंगात शिक्षा भोगत असताना टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. १५ जून १९१४ रोजी ब्रिटिश सरकारने सहा वर्षाच्या कारावासानंतर त्यांची मुक्तता केली.

१९१५ मध्ये ॲनी बेझंट यांनी होमरूल लीग ही संस्था सुरू केली होती. टिळकांनी त्यांना साथ देत १ मे १९१६ रोजी बेळगावला होमरूल लीग व हिंदी स्वराज्य संघाची स्थापना केली. टिळक आणि ॲनी बेझंट यांनी संयुक्तपणे होमरूल चळवळ चालवली. कलकत्ता (सध्याचे कोलकाता) येथे होणाऱ्या ऐतिहासिक काँग्रेस अधिवेशनासाठी पं. मालवीय यांनी अध्यक्ष म्हणून टिळकांचे नाव सुचवले होते. मात्र, तत्पूर्वी त्यांचा मृत्यू झाला.

### वसंतराव नाईक

महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे प्रणेते, दूरदृष्टी असलेले मुख्यमंत्री म्हणून वसंतराव नाईक यांचे नाव आदराने घेतले जाते. १ जुलै १९१३ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली गावात त्यांचा जन्म झाला. त्यांची घरी शेती होती. मात्र त्यांनी बी.ए. तसेच एल.एल.बीची पदवी मिळवून वकिली सुरू केली. हे करत असताना समाजकार्याची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. पुसद तालुक्यातील आदर्शग्राम योजनेत त्यांनी पुढाकार घेतला त्यांच्या प्रयत्नांमुळे गहूली हे गाव 'आदर्श' बनले.

राजकारणातही त्यांची घोडदौड सुरू होती. १९५२ मध्ये मध्यप्रदेश मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर जुन्या मुंबई राज्यात सहकार, कृषी, दुग्धव्यवसाय या खात्यांचे मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. अखिल भारतीय काँग्रेसचे तसेच महाराष्ट्र विभागीय काँग्रेस समिती व कार्यकारिणीचे तेव्हापासूनच ते सदस्य होते. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेत पुसद मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवड, महाराष्ट्र मंत्रिमंडळात कृषिमंत्री म्हणून त्यांची नियुक्ती, १९६० महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळात महसूल मंत्री म्हणून नियुक्ती, १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत तिसऱ्यांदा निवड होऊन पुन्हा महसूल मंत्री म्हणून नियुक्ती, मुख्यमंत्री होईपर्यंत हेच खाते त्यांच्याकडे राहिले. ५ डिसेंबर १९६३ मध्ये ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेवर चौथ्यांदा निवड होऊन ६ मार्च १९६७ ला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर दुसऱ्यांदा निवड. २० फेब्रुवारी १९७५ मध्ये मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. तरीही सर्वात जास्त काळ मुख्यमंत्रिपद भूषवण्याचा मान त्यांना मिळाला. १८ ऑगस्ट १९७९ रोजी सिंगापूर येथे वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



**(संदर्भ– सामान्यांतील असामान्य–वसंतराव नाईक आणि महानायक ग्रंथ / मराठी विश्वकोश)**

**संकलन: गजानन पाटील/सीमा शेळगावकर**

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन
### शालेय शिक्षण विभाग



**श्री. नरेंद्र मोदी**
मा. प्रधानमंत्री

# आनंददायी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रवेशोत्सव..



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री







सन २०१८-१९
## प्रवेशोत्सव

- सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून राज्यात **समग्र शिक्षा**चा प्रारंभ
- अंगणवाडी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मिळणार **समग्र शिक्षा**चा लाभ.
- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या ३ वर्षाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे भारत सरकारच्या शैक्षणिक विकास निर्देशांक अहवालात राज्य भौतिक सुविधांत क्रमांक ४ वरून १ वर आणि निष्पत्तीमध्ये क्रमांक १४ वरून ८ वर.
- सन २०१६ च्या एका अहवालानुसार इ. तिसरी च्या सरासरी संपादणूक मध्ये राज्य देशात **तिसऱ्या क्रमांकावर**
- इ. आठवी भाषा सरासरी संपादणूक मध्ये राज्य देशांत (६३%) **प्रथम क्रमांकावर**
- अध्यापन पद्धतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
- राज्यात शासकीय शाळांमधील डिजिटल युगामुळे ६६,४५८ शाळा झाल्या डिजिटल.
- शिक्षकांच्या मदतीसाठी **'मित्रा ॲप'**ची सुविधा.
- सर्व शासकीय शाळांमध्ये इंग्रजीच्या समृध्दीकरणासाठी **तेजस** कार्यक्रमाची सुरूवात.
- राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ओजस व तेजस शाळा स्थापन करण्याचे नियोजन.
- शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी बालरक्षक चळवळीची राज्यात जोमाने सुरूवात. २६ हजार बालरक्षक शिक्षकांकडून मागील एका वर्षात ७ हजार पेक्षा जास्त मुलांचे स्थलांतरण रोखण्यात यश.
- राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय संपादणूक चाचणीनुसार शासकीय शाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आलेख चढता.
- शैक्षणिक गुणवत्ता उत्कृष्ट असणाऱ्या मराठी शाळांमध्ये इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांचा पुनर्प्रवेश.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

## समग्र शिक्षा
सर्व शिक्षा अभियान +
राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान +
शिक्षक शिक्षण

**श्री. विनोद तावडे**
मा. मंत्री, शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण,
क्रीडा व युवक कल्याण,
अल्पसंख्याक विकास व औकाफ,
मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य,
महाराष्ट्र राज्य

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह